महाराष्ट्री प्राकृत

मरहट्ठी सरिआ

इयत्ता बारावी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३०.०१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्री प्राकृत

मरहट्ठी सरिआ

इयत्ता बारावी

२०२०

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११००४

H9L3F8

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्–श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०

महाराष्ट्री प्राकृत भाषा तज्ज्ञ समिती

डॉ. सदानंद मोरे (अध्यक्ष)
डॉ. कमलकुमार जैन (सदस्य)
डॉ. राजश्री मोहाडीकर (सदस्य)
डॉ. विमल बाफना (सदस्य)
डॉ. आर. टी. पाटील (सदस्य)
डॉ. मैत्रेयी देशपांडे (सदस्य)
डॉ. श्रीनंद बापट (सदस्य)
डॉ. महावीर शास्त्री (सदस्य)
श्री. बाळकृष्ण जोशी (सदस्य)
श्रीमती मेघा कढे (सदस्य)
श्रीमती प्राजक्ता धर्मराव (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य सचिव)

निर्मिती

श्री. सच्चिदानंद आफळे
मुख्य निर्मिती अधिकारी

श्री. राजेंद्र चिंदरकर
निर्मिती अधिकारी

श्री. राजेंद्र पांडलोसकर
सहायक निर्मिती अधिकारी

संयोजन

श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी.
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

प्रकाशक

विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

चित्रकार	:	श्री. तेजस गोगावले
मुखपृष्ठ	:	श्री. तेजस गोगावले
अक्षरजुळणी	:	भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
कागद	:	७० जी. एस. एम. क्रीमवोव्ह
मुद्रणादेश	:	N/PB/2020-21/0.005
मुद्रक	:	M/s. Renuka Binders, Pune

भारहस्स संविहाणं

उद्देसिआ

अम्हे, भारहस्स जणा, भारहं संपुण्ण–पहुत्त–संपण्णं,

समाअवाइं, धम्मणिरवेक्खं, लोअतंतिअं गणरज्जं विहाउं,

तस्स समत्ता णाअरिओ अ

सामाइयं, अत्थिअं, राजणेइअं च णायं,

विआरस्स, अहिवत्तीए, अत्थाए, धम्मस्स, उवासणाए अ सातंतं,

पइट्ठाए, अवसरस्स अ समाणअं पाऊणिउं;

तेसु सव्वेसु अ

वत्तिगारवस्स रट्ठस्स अ एकआए,

अखंडआए अ सुणिच्छाइअं बंधुअं पवड्ढिउं;

कयदढसंकप्पा एआए अम्हाणं संविहाणसहाए

अज्ज, ईसवीए १९४९ तमे वस्से नवंबरमासस्स २६ तमे दिणे

(२००६ – तमे विक्कमसंवच्छरे मग्गसीसमासस्स सुक्कपक्खे सत्तमी–तिहीए)

एएण इणं संविहाणं अंगीकअं, अहिणियमिअं, अप्प–अप्पियं च करेमो।

रट्ठगीअं

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे।।

पइण्णा

भारहो मम देसो अत्थि ।
सव्वे भारहवासिणो मज्झ बंधुणो संति ।
मज्झ देसम्मि मम पेम्ममत्थि ।
मज्झ देसंसि विज्जमाणाणं
समिद्धाणं विविहआए विहूसिआणं च
परंपराणं मे अहिमाणो अत्थि ।
ताणं परंपराणं रक्खओ होउं समत्थो होज्ज त्ति
अहं णिच्चं पअत्तं करिस्सामि ।
अहं मज्झ पालआणं गुरुअणाणं जेट्ठाणं च।
सम्माणं काहिमि, पच्चेकेण सद्धिं
सुअणत्तणेण य आयरिस्सामि।
मम देस–बंधवाणं च णिट्ठारक्खणस्स अहं पइण्णं करेमि।
तेसिं कल्लाणे समिद्धीए अ
मज्झ सोक्खं समाविट्ठं भवइ ।

प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता बारावीच्या वर्गात तुम्हा सर्वांचे स्वागत आहे. महाराष्ट्री प्राकृत भाषेतील 'मरहट्ठी सरिआ' हे इयत्ता बारावीचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देतांना खूप आनंद होत आहे. हे पाठ्यपुस्तक तुम्हांला निश्चितच आवडेल असा विश्वास वाटतो.

इयत्ता अकरावीच्या पाठ्यपुस्तकामध्ये मराठी व महाराष्ट्री प्राकृत यांचा जवळचा संबंध कसा आहे हे आपण पाहिले आहे. 'महाराष्ट्री प्राकृत' हे आधुनिक मराठीचे प्राचीन रूप आहे. त्यामुळेच मराठी भाषेला 'अभिजात भाषा' असे म्हणता येते. 'मरहट्ठी सरिआ' या पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून महाराष्ट्री प्राकृतची ओळख जास्त दृढ होईल, हे निश्चित. ऐच्छिक भाषा या विषयासाठी हे पुस्तक इयत्ता बारावीसाठी तयार केले आहे. हाच धागा पकडून आपण महाराष्ट्री प्राकृतचा पुढील अभ्यास करणार आहोत.

आपले विचार दुसऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे भाषा हे अत्यंत प्रभावी साधन आहे, हे जरी खरे असले तरी त्या त्या भाषेतील विशिष्ट वाक्यरचना, म्हणी, शब्द इत्यादींच्या समर्पक उपयोगामुळे भाषा अजूनच समृद्ध व प्रभावी होते, हे ही तेवढेच खरे. यासाठी प्राकृत भाषेतील विविधअंगी साहित्य अभ्यासण्याने आपल्याला प्राकृत व मराठी दोन्ही भाषांचा समृद्ध व प्रभावी वापर करता येईल.

या पाठ्यपुस्तकामध्ये जे पाठ, कविता निवडल्या आहेत, त्यामध्ये प्राचीन काळातील बुद्धिचातुर्य, व्यवसायकौशल्य, व्यवहारचातुर्य यांच्याशी निगडित कथा निवडल्या आहेत. या कथांच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांमध्ये निश्चितपणे व्यवहार, आर्थिक निर्भरता आणि व्यवसाय यातील खाचाखोचा समजून बुद्धिचातुर्य व व्यवहारचातुर्य वाढीला लागेल, हे नक्की.

प्रत्येक पाठासंबंधी अधिक माहिती देण्यासाठी ॲपच्या माध्यमातून क्यू.आर. कोडद्वारे उपयुक्त दृक्‌श्राव्य साहित्य आपणास उपलब्ध होईल. त्याचा तुम्हांला अभ्यासासाठी निश्चितच उपयोग होईल.

भाषिक विकासाबरोबरच विचारक्षमता, अभिव्यक्ति-कौशल्ये आणि सृजनशीलता यांच्या विकासासाठी उपयुक्त असलेले हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्की आवडेल, असा विश्वास आहे.

विवेक गोसावी
(संचालक)
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२०
भारतीय सौर दिनांक : २ फाल्गुन, १९४१

भाषाविषयक क्षमता : महाराष्ट्री प्राकृत

इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्री प्राकृत भाषाविषयक खालील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.

क्षेत्र	क्षमता
श्रवण	• प्राकृत साहित्यातील संदर्भ, भाव व अर्थ समजून घेता येणे. • प्राकृतांतील विविध साहित्यप्रकारांचे ध्वनिमुद्रित साहित्य ऐकून त्यातील स्वराघात, आरोह-अवरोह इत्यादी वैशिष्ट्यांची जाण होणे. • प्राकृत भाषेतील औपचारिक व अनौपचारिक संभाषण व संवाद ऐकून त्यात सहभागी होता येणे. • परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषांचे ज्ञान आणि त्यांच्या वैशिष्ट्यांची तुलना करता येणे.
भाषण-संभाषण	• उच्चार-विशेषानुसार महाराष्ट्री-प्राकृतांतील योग्य असे गाथांचे पठन आणि संभाषण करता येणे. • कथासाहित्याच्या वैशिष्ट्यानुसार कथा-कथन व प्रबोधन करता येणे. • विषयाला अनुसरून महाराष्ट्री प्राकृत माध्यमातून अनुभव कथन करता येणे. प्राकृतचा अभ्यास करून विविध शब्द, म्हणी अथवा वाक्प्रचार यांच्या भेंड्या सारखे खेळ खेळता येणे. • विविध शब्दांची योजना करून प्राकृत भाषेत चर्चा करता येणे.
वाचन	• विरामचिह्नांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे. • प्राकृत साहित्यातील विविध साहित्यप्रकारांचा आस्वाद घेणे. • भाषेच्या अध्ययनाने प्राचीन महाराष्ट्रीय व भारतीय-संस्कृती समजून घेणे. • संकेतस्थळांवर उपलब्ध असलेल्या 'ई' साहित्याचे वाचन करून त्या माहितीचा उपयोग स्वयंअध्ययनासाठी करता येणे.
लेखन	• लेखनाची पद्धती जाणून शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे. • भाषा नियमांना अनुसरून निबंध/संवाद/वर्णन/लघुपरिच्छेद लिहिता येणे. • माध्यम भाषेतील भाषा नियमाला अनुसरून अनुवाद करता येणे.
अध्ययन कौशल्य	• प्राकृतात होणारे स्वर, मुळाक्षर आणि जोडाक्षरांचे बदलसंबंधी नियम समजून घेणे. • कोणत्याही संदर्भासाठी शब्दाची व्युत्पत्ती करणे व शब्दकोश पाहता येणे. प्राकृत भाषेत शब्दकोडे निर्माण करण्याचा प्रयत्न करणे. • प्राकृत भाषेत कथापूर्ती आणि अनुवाद करता येणे. • अध्ययनाकरिता संगणकीय साहित्याचा उपयोग करता येणे.
भाषाभ्यास	• अकरावीत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे. शब्दसंपत्ती, तत्सम,तद्भव, देशी, समानार्थी, विरुद्धार्थी, विभक्तीप्रत्यय, काल-प्रत्यय. • कर्तरि-कर्मणी प्रयोग, विशेष्य-विशेषण, समास एवं वृत्तज्ञान करून घेऊन त्यांचा उपयोग करता येणे. • प्राकृत आणि देशी व मातृभाषेतील शब्दांचा तुलनात्मक अभ्यास करणे. • महाराष्ट्री-प्राकृत भाषेत संवाद करणे. • एअतीस ते सय/सअअ (३१-१००) अंक (क्रम) जाणून घेणे.

शिक्षकांसाठी

इयत्ता बारावीचे महाराष्ट्री प्राकृतचे 'मरहट्ठी सरिआ' हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपल्या हातात देतांना अतिशय आंनद होत आहे. विद्यार्थ्यांची भाषिक तसेच व्यावहारिक कौशल्ये विकसित होण्यासाठी या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांना रुचतील, आवडतील, उपयुक्त ठरतील अशा पाठांचा, कवितांचा, कृतींचा समावेश केला आहे. पाठांना अनुरूप चित्रांचाही अंतर्भाव केला आहे. या बाबींचा तसेच पाठांचा गाभा समजून घेऊन शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून भाषिक तसेच व्यावहारिक कृती करून घ्याव्यात.

क्षमता विधानातील भाषाभ्यास या घटकाकडे शिक्षकांनी विशेष लक्ष पुरवावे. या घटकाखाली येणाऱ्या व्याकरणाचा सराव विद्यार्थ्यांकडून करून घेण्यासाठी शिक्षकांनी वेगवेगळ्या युक्त्यांचा उपयोग करावा. जसे तक्ते, कोष्टके, चित्रे पूर्ण करणे, भरणे इ. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठातील कठीण शब्दांचे अर्थ समजून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करायला उद्युक्त करावे, जेणेकरून एका शब्दाचे अनेक अर्थ व छटासुद्धा विद्यार्थ्यांच्या लक्षात येतील.

भाषेची आवड व गोडी निर्माण होण्यासाठी रोजच्या व्यवहारातील, वापरातील, उपयोगातील मराठीतील शब्दांशी साम्य असणारे प्राकृत शब्द शोधून काढणे, ते शब्द प्राकृतमधून मराठीत येतांना काय बदल होतात ते सांगितल्याने विद्यार्थ्यांना वेगळीच गंमत वाटेल. उदा. नक्क पासून नाक, तक्क पासून ताक, चक्क पासून चाक.

या पुस्तकातील बहुतेक पाठ मूळ जैन प्राकृत ग्रंथातून घेतले असल्याने तिथे असलेल्या 'य' श्रुती (क, ग, च, ज, त, द, प) च्या ऐवजी बहुतांश ठिकाणी अ ठेवला आहे तसेच न चा ण केला आहे

प्राकृत साहित्यातील ग्रंथसंपदा jain e-library स्वरूपात उपलब्ध आहे.(उदा. https://jainelibrary.org/book-detail/?srno=001669) त्यांच्याही उपयोग अभ्यासकरिता हिताचा ठरेल. ज्या ग्रंथातून पाठ निवडले आहेत, ते मूळ ग्रंथ शिक्षकांनी स्वतः पहावेत तसेच विद्यार्थ्यांनासुद्धा दाखवावेत.

– अनुक्रमणिका –

सुगम प्राकृत

क्रियापदे


कड्ढइ


चलइ


पिवइ


धरइ


उवएसइ


अच्चइ



मारेइ



ठाइ


उवविसइ


सुवइ/सोवइ


हसइ


वियरइ


आमंतेइ


तरइ


देइ


सम्माणेइ


कीलइ


कुप्पइ


पडइ



गायइ



कंडूयइ


जग्गइ


बीहइ


दंसेइ


पासइ


णमइ


धावइ


भमइ


पविसइ


खिवेइ

तीन काळांची वाक्ये


माआ ओअणं पचइ ।


माआ ओअणं पचित्था ।


माआ ओअणं पअइस्सइ ।



सीआ मालं गुंफेइ ।



सीआ मालं गुंफित्था ।




सीआ मालं गुंफिस्सइ ।



तुमे अंबं भक्खेसि ।



तुमे अंबं भक्खित्था ।



तुमे अंबं भक्खिस्ससि ।



वाणरो रुक्खे चडइ ।



वाणरो रुक्खे चडित्था ।



वाणरो रुक्खे चडिस्सइ ।



छत्ता पुत्थआणि पढंति ।



छत्ता पुत्थआणि पढिंसु ।



छत्ता पुत्थआणि पढिस्संति ।




अहं विज्जालअं गच्छामि ।




अहं विज्जालअं गच्छित्था ।




अहं विज्जालअं गमिस्सामि ।



साहू धम्मं कहेइ ।



साहू धम्मं कहित्था ।



साहू धम्मं कहिस्सइ ।

ऋतू (उऊ)



वसंतो



गिम्हो



वरिसा



सरओ





हेमंतो



सिसिरो

दिशा





चित्रमालिका

१) 
सव्वे छत्ता सालं आगच्छंति

→ 
सालाए पत्थणा होइ

→ 
कक्खाए सव्वे छत्ता उवविसंति

→ 
अज्झावओ पाढं पाढेइ

→ 
अज्झयणाणंतरं भोयणावकासो होइ

२) 
अहं णिद्दाए जग्गामि

→ 
अहं भोयणं करेमि

→ 
अहं सालं गच्छामि

→ 
अहं अज्झयणं करेमि

→ 
अहं मित्तेहिं सह कीलामि

३)  →  → 

किसीवलो पभाए घरकज्जं करेइ — खेत्ते गच्छइ — हलं कड्ढइ

→  → 

भोयणं करेइ — गिहं आगच्छिऊण सुवइ

४)  →  → 

रामेण धणुहभंगं कयं — राम-सीयाए विवाहो — रामस्स सीया-लक्खणेहिं सह वणवासो

→  → 

रावणेण सीयाहरणं कयं — रावणवहं

५)  →  → 

कण्हजम्मो — महुराणयरिं गमणं — कंसवहो

→  → 

सिसुवालवहो — महाभारहजुद्धं

सज्झाओ

१) चित्रे पाहून त्यासाठी वापरले जाणारे क्रियापद सांगा.

१) 

४) 

२) 

५) 

३) 

६) 

२) चित्रे पाहून वाक्याचा काळ सांगा.

१) 


३) 

२) 


४) 

३) रेखाजाल पूर्ण करा.


१)




२)



३)




४) दिशा पाहून रिकाम्या जागा भरा.




५) गोलातील सूचनेप्रमाणे रिकाम्या जागा भरून रेखाजाल पूर्ण करा.


१)




२)



३)



४)



६) चित्रांचा अर्थसंगत क्रम लावा.

१)







२)







३)







१) मरहट्ठी भासाए गोरवं

मराठी आणि महाराष्ट्री प्राकृत भाषेचा खूप जवळचा संबंध आहे. आज आपण जी मराठी भाषा बोलतो तिचे महाराष्ट्री प्राकृत हे मूळ रूप आहे. या प्राचीनतेमुळेच आपण मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणू शकतो. एकमेकांशी संवाद साधण्यासाठी, आपले विचार, मते, कल्पना, भावभावना व्यक्तीसमोर योग्य आणि प्रभावीपणे मांडण्यासाठी त्या भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे. या पाठामध्ये याच महाराष्ट्री प्राकृत भाषेची माहिती सांगितली आहे.

महाराष्ट्री प्राकृत भाषा शिकण्यास सोपी असून सर्वांना उपयोगाची आहे असे शिक्षिका विद्यार्थ्यांना सांगत आहेत. प्राचीन काळी महाराष्ट्री प्राकृत भाषा सामान्य लोकांची बोलीभाषा होती. या भाषेमध्ये व्याकरण, कथा, गद्य-पद्यमय चंपू व इतर साहित्यसुद्धा रचले गेले आहे.



राहिआ– आअरिआ ! अम्हे मरहट्ठी पाइअभासा सिक्खिउं इच्छामो। किं मरहट्ठी पाइअभासा कढिणा अत्थि ?

अज्झाविआ– वच्छे राहिआ! णत्थि णत्थि। मरहट्ठी पाइअभासा अच्चंता सुलहा सरला अ।

रोहिओ– आअरिआ! अज्ज मरहट्ठी पाइअभासा ववहारस्स भासा णत्थि, तओ इमाए भासाए अज्झअणस्स किं उवओअं?

अज्झाविआ– आहुणिआ मरहट्ठी भासा णाउं सुलहा। आहुणिअ-संतस्स णाणेसरस्स णाणेसरी वि मरहट्ठी पाइअभासाए रइआ एव। जआ तुमं पाईण-मरहट्ठि-भासा णाउं समत्था तआ तुमं लीलाचरिअं, णाणेसरी, रुप्पिणि-चरिअं च णाउं वि समत्थो होसि।

अणुराहा– आयरिआ! मरहट्ठी पाइअभासा कस्सिं काले वट्टित्था? किं सा जणभासा होत्था?

अज्झाविआ– आम। पाईणे काले मरहट्ठदेसस्स बहुजणाणं जणभासा मरहट्ठी पाइअं एव। 'महा रट्ठो' त्ति मरहट्ठदेसस्स अत्थो। अओ मरहट्ठी पाइअभासा महा-रट्ठस्स भासा आसी। पाईणकाले महा-रट्ठे राअउआणा-मज्झ-पएसाणं समावेसो वि होत्था। अओ मरहट्ठी

भासा पाईणे काले मरहट्ठ–राअउआणा–मज्झपएसाणं जणभासा हूआ।

पडिमा– आयरिआ ! मरहट्ठी पाइअभासाए विसिट्ठं किं ?

अज्झाविआ– ण सा केवला जणभासा, अवि उ गंथस्स भासा वि अत्थि। जइण–सेअंबरेहिं आअरिएहिं जइण–गंथ–लेहणं मरहट्ठी भासाए एव कअं। अओ सा गंथभासा वि जइण–मरहट्ठी पाइअं णामेण पसिद्धा। तहा य आअरिएहिं हेमचंदेहिं पाइअवागरण–रअणासमए पहाणओ मरहट्ठी पाइअभासाए वागरणं एव णिबद्धं अत्थि।

राहिआ– आअरिए ! मरहट्ठी पाइअभासाए पमुहा पसिद्धा अ गंथा के संति ?

अज्झाविआ– इमाए भासाए अणेआ पसिद्धा गंथा गंथआरा अ संति। तेसु कइवआणि णामाणि साहेमि, जहा अ– हालसालिवाहणस्स गाहासत्तसई, पवरसेणस्स सेउबंधो, वप्पइराअस्स गउडवहो, कोऊहलस्स लीलावई, रामपाणिवाअस्स कंसवहो तहा अ विमलसूरीणं पउमचरिअमाइं। एए गंथाणं पढणेण अम्हाणं भासा तहा जीवणं उण्णअं होइ। गंथेसु जे अणुभवा णिबद्धा संति ते अम्हाणं जीवणं समिद्धं करेंति।

रोहिओ– इमेसु गंथेसु केवलं जइण–तच्चणाणं अक्खिअं किं ?

अज्झाविआ– ण छत्ता। इमेसुं गंथेसुं पेमकहा, सुहासिआणि, जुज्झवण्णणं, रामकहा, कण्हकहा अवि वण्णिआ। केवलं तच्चणाणं णत्थि। सव्वाणि गंथाणि णाणवड्ढणं मणोरंजणं च करेंति। गाहासत्तसई तु तक्कालीण–समाअ–सक्किईणं विसालो कोसो एव। वज्जालग्गगंथे विविहविसएसु जीवणोवओगी सुहासिआणि रइआणि कईहिं। तेसिं जणाणं विआरा णाउं एए गंथा अईव महत्तपुण्णा। अओ मरहट्ठी पाइअभासाए अज्झअणं अम्हाणं कए तु बहु आवस्सअं एव।

सव्वे छत्ता– अज्झाविए! धण्णवाओ। अहुणा अम्हे सव्वे तुम्हाणं समीवे उवविसिऊण मरहट्ठिं पाइअभासं पढिस्सामो। तुम्हे पाढिस्सह किं ?

अज्झाविआ– आम। सव्वे छत्ता कल्ले आगच्छंतु मम समीवे। वयं पाढारंभं करिस्सामो।

सद्दत्था

सिक्खिउं – शिकण्याची
मरहट्ठी पाइअभासा – महाराष्ट्री प्राकृत भाषा
कढिणा अत्थि? – कठीण आहे का?
अच्चंता सुलहा सरला अ – अतिशय सोपी आणि सरळ आहे
ववहारस्स भासा – व्यवहाराची भाषा
किं उवओअं? – काय उपयोग ?
णाउं – जाणून घेण्यासाठी, समजण्यासाठी
णाणेसरस्स णाणेसरी – ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी
जणभासा – लोकांची भाषा, बोली भाषा
राअउआणा–मज्झपएसाणं – राजपुताना व मध्यप्रदेशांचा
पाईणे काले – प्राचीन काळी
जइण–सेअंबरेहिं आअरिएहिं – जैन श्वेतांबर आचार्यांनी
पाइअवागरण–रअणासमए – प्राकृत व्याकरण लिहित असताना
णिबद्धं– रचलेले
हालसालिवाहणस्स गाहासत्तसई – राजा हाल सातवाहनाची गाथासप्तशती
पवरसेणस्स सेउबंधो – प्रवरसेनाचे सेतुबंध
वप्पइराअस्स गउडवहो – वाक्पतिराजाचे गौडवध
कोऊहलस्स लीलावई – कुतूहल/कौतूहल याची लीलावती (कथा)
रामपाणिवाअस्स कंसवहो – रामपाणिवाद यांचा कंसवध
उण्णअं – उन्नत/ विकसित
समिद्धं – समृद्ध
जुज्झवण्णणं – युद्धाचे वर्णन

तच्चणाणं – तत्त्वज्ञान (आत्मा व संसार याविषयीचे ज्ञान)
तक्कालीण–समाअ–सक्किईणं – त्याकाळातील समाज आणि संस्कृती यांचा
महत्तपुण्णा – महत्त्वाचे, महत्त्वपूर्ण
आम (अव्यय)– हो, ठीक आहे
पाढारंभं – शिकण्यास सुरुवात (करू)

सज्झाओ

१) माध्यम भाषेत भाषांतर करा.

१) राहिआ– आअरिआ ! ...... अज्झअणस्स किं उवओअं ?
२) रोहिओ– इमे गंथा ...... बहु आवस्सअं एव।
३) पडिमा– आअरिआ ! ...... पसिद्धा अ गंथा के संति ?

२) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) महाराष्ट्री प्राकृत भाषा कोणत्या प्रदेशाची जनभाषा होती?
२) ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी कोणत्या भाषेत लिहिली आहे?
३) हेमचंद्र यांनी कोणत्या भाषेचे व्याकरण लिहिले आहे?

३) थोडक्यात उत्तरे लिहा.

१) महाराष्ट्री प्राकृत ग्रंथांची नावे लिहा.
२) महाराष्ट्री प्राकृत ग्रंथांमधील विषय सांगा.
३) 'महाराष्ट्री प्राकृत भाषा जनभाषा होती', स्पष्ट करा.

४) सविस्तर उत्तरे लिहा.

१) महाराष्ट्री प्राकृत भाषेची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.
२) महाराष्ट्री प्राकृत भाषा शिकण्याचे महत्त्व तुमच्या शब्दांत मांडा.

५) संदर्भासह स्पष्टीकरण करा.

१) जआ तुमं पाईण–मरहट्ठी भासा णाउं समत्था, तआ तुमं लीलाचरिअं, णाणेसरी, रुप्पिणि–चरिअं च णाउं वि समत्थो होसि ।
२) अओ मरहट्ठी पाइअभासा महा–रट्ठस्स भासा आसी।
३) केवलं तच्चणाणं णत्थि ।

६) योग्य शब्द निवडून तक्ता पूर्ण करा.


सिक्खिउं, णाउं, उवविसिऊण, भाविऊण, रइआ, हूआ, होत्था, आसी.

पूर्वकालवाचक	हेत्वर्थक	कर्म.भू. धा. वि.	भूतकाळ


७) जोड्या लावा.

गट अ	गट ब
१) लीलावई	अ) हालसालिवाहणो
२) गाहासत्तसई	ब) विमलसूरी
३) पउमचरिअं	क) वप्पइराओ
४) सेउबंधो	ड) कोऊहलो
५) गउडवहो	इ) पवरसेणो

८) पाठातील महाराष्ट्री प्राकृत ग्रंथांची नावे लिहून रेखाजाल पूर्ण करा.



९) पाठातील महाराष्ट्री प्राकृत ग्रंथाचे विषय निवडून रेखाजाल पूर्ण करा.



२) ववहारकुसलो हालिओ


विजयकस्तूरसूरीश्वरजी यांचा जन्म गुजरातमधील पाटनगर येथे इ.स. १८९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अमीचंदभाई व आईचे नाव चंपाबेन होते. त्यांचे गृहस्थाश्रमातील नाव कांतिलाल होते. इ.स. १९१८ मध्ये त्यांनी दीक्षा घेतली व मुनी श्रीविजयकस्तूरजी या नावाने ते प्रसिद्ध झाले. त्यांनी 'प्राकृत रूपमाला', 'प्राकृतविज्ञानपाठमाला', 'श्री ऋषभनाथचरित्र' इत्यादी अनेक ग्रंथांबरोबर प्राकृतमध्ये श्रीचंद्रराजाचे चरित्र लिहिले. श्री विजयकस्तूरसूरीजी महाराज सतत शास्त्रांच्या चिंतनात मग्न असत. शिकविण्याची त्यांना आवड होती. अध्ययन-अध्यापनात तत्पर असल्यामुळे ते 'गुरुजी' या नावाने देखील प्रसिद्ध झाले. त्यांनी 'पाइअविन्नाणकहा' भाग १ व भाग २ हे कथासंग्रह महाराष्ट्री प्राकृत भाषेत लिहिले.

प्रस्तुत 'ववहारकुसलो हालिओ' हा पाठ 'पाइअविन्नाणकहा' भाग १ या कथासंग्रहातून घेतला आहे. या कथासंग्रहात एकूण पंचावन्न कथा आहेत. त्यापैकी ही कथा पन्नासावी आहे. या कथेत शेतकऱ्याच्या प्रभावी बुद्धीचे वर्णन आले आहे. शेतकरी आपल्या बुद्धिचातुर्याने राजाला कोड्यात टाकतो. आपल्या बुद्धिप्रभावाने शेतकरी राजाचा सन्मान कसा प्राप्त करतो, याचे रसाळ वर्णन या कथेत आले आहे.

णीए वि सुहकम्मेहिं, धीमंतो जायए कुले।
हालिएणावि बुद्धीए, रंजिओ भूमिपालओ।।१।।



को वि णरिंदो चित्तविणोयणत्थं णयराओ बाहिं विविहवणराइं पासंतो बहुदूरं गओ। तत्थ एगंमि खेत्ते किसिकम्मं कुणंतं हालियं पेक्खेइ, तं दट्ठूण पुच्छेइ- 'पइदिणं कियंतदव्वं अज्जेसि?', सो कहेइ- 'एगं रूवगं लहेमि'। तया णरिंदो कहेइ- 'तेण दव्वेण कहं णिव्वहेसि'? तेण वुत्तं 'तस्स रूवगस्स चउरो भागे करेमि, तत्तो एगं भागं अहं भक्खेमि, बीअं भागं उद्धारए देमि, तइअं अंसं रिणमोक्खत्थं वावरेमि, चउत्थं भागं कूवंमि पक्खिवामि।' एवं सुणिऊण तब्भावत्थं अजाणमाणो पुणो वि णरिंदो 'किं एयस्स रहस्सं' ति पुच्छेइ।



सो हालिओ वएइ- 'पढमेण भागेण अहं अप्पाणं णियभज्जं च पोसेमि। बीयभागेण पुत्ताणं भरणं कुणेमि, जओ ते वि पुत्ता वुड्ढत्तणंमि अम्हे पालिस्संति, तओ वुत्तं उद्धारगे देमि त्ति। तइअभागं मायपियराणमट्ठं वएमि, जओ हं बालत्तणे तेहिं पालिओ, तओ उत्तं रिणमोक्खत्थं वावरेमि। चउत्थं भागं परलोगसुहाय दाणे देमि, तेणुत्तं कूवंसि खिवेमि त्ति, जओ तं दव्वं परलोगंमि सुहाय होस्सइ'। एवं तस्स

अणुभवजुअं इहलोग-अच्चंतहियकारिणिं पर-लोगसुहावहं वायं सुणिऊण णरिंदो अईव तूसीओ। पुणो वि सो वएइ- 'हे करिसअ! तुम्हारिसेहिं मइमंतपुरिसेहिं च्चिय मम रज्जं विराएइ। अओ तुमं कहेमि- 'जाव सयहुत्तं मम मुहं दिट्ठं ण सिया, ताव तुमए एसा वट्टा कासइ ण कहियव्व' त्ति कहिऊण णरिंदो णियावासे गओ।

एगया सहाए वरसीहासणसंठिओ णरवरिंदो णिय-पहाणपुरिसाणमग्गओ हालिअस्स गूढवक्कस्स रहस्सं पुच्छेइ- 'जं एगं भागं भुंजइ, बीअं उद्धारके देइ, तइअं रिणमोक्खाय अप्पेइ, चउत्थं कूवंमि णिक्खिवेइ' 'तस्स को भावत्थो?'। एवं सुणिऊण सव्वे पहाणा पच्चुत्तरं दाउं असमत्था परुप्परं पेक्खेइरे। तया णरिंदेण कहियं- 'पण्णरसदिवसाणमब्भिंतरम्मि तुम्हेहिं एयस्स उत्तरं दायव्वं, अण्णह तुम्हे सव्वे दंडिस्सं' ति कहिऊण सहा विसज्जिआ।



ताणं पहाणाणं मज्झे एगो वियक्खणो पहाणो जणपरंपराओ णरिंदकिसीवलाणं मिलणपसंगं णाऊण तस्स करिसगस्स घरंमि गओ। तं किसीवलं तस्स वयणस्स रहस्सं पुच्छइ। बुद्धिमंतो हालिओ तं कहेइ- 'हे पहाणवर! सयहुत्तं णरिंदस्स मुहं जाव ण पासेज्जा, ताव इमस्स वयणस्स रहस्सं कस्स वि मए ण कहिअव्वं' 'एवं णरिंद-वयण-पासपडिबद्धो म्हि, तओ हं कहिउं कहं पारेमि?'। पहाणो वि तस्स वयणजुत्तिं इंगियागारेण णच्चा हालिअस्स पुरओ णरिंदपडिगिइ-अंकियसुवण्ण-मुद्दासयं ठवेइ। तया णरिंदागिइवंत-मुद्दासयं दट्ठूण तेण हालिएण तस्स वयणस्स रहस्सं जाणाविअं।

पक्खदिवसंते सहामज्झंमि पुणरवि णरिंदेण सो च्चिय पण्हो पुच्छिओ, तया सेसपहाणेसु मउणेण ठिएसु णरिंदस्स पुरओ तेण मंतिणा पच्चुत्तरं दिण्णं। तं सुणिऊण णरवरिंदो कहेइ 'तुमए अवस्सं हालिआओ एयं जाणियं सिया'। णरिंदो हालिअं बोल्लाविऊणं सक्कोहं पुच्छइ- 'कहं वयणभंगो कओ?' तेण वुत्तं 'मए वयणभंगो ण कओ, जओ पुव्वं मए सयहुत्तं सिरिमंताणं मुहं पासिऊण तस्स वयणस्स रहस्सं कहियं'। णरिंदो कहेइ- 'कया कत्थ वा मम मुहं दिट्ठं?' तया तेण णरिंदमुहंकियसुवण्णमुद्दासयं दंसिऊण कहियं 'एआसु सुवण्णमुद्दासु मुहं दिट्ठं' त्ति। तओ तस्स पच्चुत्तरदाणकुसलाए पण्णाए तुट्ठो णरिंदो तं मुद्दासयं तस्स च्चिअ देइ। एवं एसो हालिओ बुद्धिप्पहावेण रायमाणणिज्जो जाओ।।

उवएसो -

हालियस्स कह एयं, परत्थेह य सोक्खयं।
सुणिऊण 'भविया! तुम्हे, पयत्तेह जहासुहं'।।



सद्दत्था

हालिओ- शेतकरी
णीए वि - स्वतःच्याच
सुहकम्मेहिं - शुभ किंवा चांगल्या कर्मांनी
धीमंतो - हुशार, बुद्धिमान
जायए कुले - (चांगल्या) कुळात जन्म घेतलेला
हालिएणावि - शेतकऱ्याने सुद्धा

रंजिओ – प्रसन्न केले
भूमिपालओ /भूमिपालगो – भूमिपालक, राजा
चित्तविणोयणत्थं – मन रमविण्यासाठी, मनोरंजनासाठी
अज्जेसि – मिळवतोस
रूवगं – रुपया
लहेमि – (मला) मिळतो
णिव्वहेसि – निर्वाह/चरितार्थ/उपजीविका करतोस
उद्धारए – उद्धार करणाऱ्याला
अंसं – अंश, भाग
रिणमोक्खत्थं – कर्जातून मुक्त होण्यासाठी
कूवंमि/कूवंसि – विहिरीमध्ये
सुणिऊण – ऐकून
तब्भावत्थं – त्याच्या भावार्थाला
णियभज्जं – स्वतःच्या पत्नीला
पोसेमि – (मी) पोसतो
वएमि – (मी) खर्च करतो, वापरतो
इहलोगअच्चंतहियकारिणिं – या लोकासाठी/इहलोकासाठी अतिशय लाभदायक
परलोगसुहावहं – परलोकासाठी सुखकर
तूसीओ – संतुष्ट झाला
वएइ – म्हणाला, बोलला
सयहुत्तं – शंभरवेळा
वट्टा – बातमी
कासइ – कोणालाही
णियावासे – णिय + आवासे- स्वगृही, स्वतःच्या घरी
सहाए – सभेमध्ये
वरसीहासणसंठिओ – उत्कृष्ट सिंहासनावर बसलेला
गूढवक्कस्स – गूढ किंवा रहस्यमय वाक्याचा
णियपहाणपुरिसाणमग्गओ–णियपहाणपुरिसाणं+अग्गओ- आपल्या मुख्य/महत्त्वाच्या मंत्र्यांसमोर
भुंजइ – उपभोग घेतो
णिक्खिवेइ – फेकतो
पच्चुत्तरं – प्रत्युत्तर, उत्तर
परुप्परं – पर + उप्परं- एकमेकांना/एकमेकांकडे
पेक्खेइरे – बघू लागले
दायव्वं – द्यायला हवे
पण्णरसदिवसाणमब्भिंतरम्मि – पण्णरसदिवसाणं + अब्भिंतरम्मि- पंधरा दिवसांच्या आत
विसज्जिआ – विसर्जित केली
वियक्खणो – हुशार, विद्वान, चतुर
जणपरंपराओ – लोकांकडून (एकाकडून दुसऱ्याला, दुसऱ्याकडून तिसऱ्याला, अशा पद्धतीने)
णरिंदकिसीवलाणं मिलणपसंगं – राजा आणि शेतकऱ्याच्या भेटीचा प्रसंग
णाऊण / णच्चा – जाणून
ण कहिअव्व – सांगू नये
णरिंदवयणपासपडिबद्धो – राजाच्या वचनरूपी पाशामध्ये अडकलेला
वयणजुत्तिं – बोलण्यातला गर्भितार्थ
इंगियागारेण – इशाऱ्याने/हावभावाने
णरिंदपडिगिइअंकिय-सुवण्णमुद्दासयं– राजाची प्रतिकृति/आकृती कोरलेल्या १०० सोन्याच्या मुद्रा/नाणी
ठवेइ – ठेवतो
जाणाविअं – जाणवून दिले, समजावून सांगितले
पक्खदिवसंते – पंधराव्या दिवसाच्या शेवटी
सिया – असणार/असेल
बोल्लाविऊण – बोलावून
सक्कोहं – रागाने, क्रोधपूर्वक
रायमाणणिज्जो – राजाने मान द्यावा असा
परत्थेह – परत्थ + इह- तिथे आणि इथे/परलोकात व इहलोकात

सज्झाओ

१) माध्यम भाषेत भाषांतर करा.

१) को वि णरिंदो ...... 'एगं रूवगं लहेमि'।
२) ताणं पहाणाणं ...... कहिउं कहं पारेमि?।
३) णरिंदो हालिअं ...... रायमाणणिज्जो जाओ।

२) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) शेतकऱ्याने प्रधानाला दिलेले उत्तर सांगा.
२) राजा शेतकऱ्यावर प्रसन्न झाला ते कारण सांगा.
३) राजा फिरत फिरत जिथे गेला ते ठिकाण सांगा.

३) थोडक्यात उत्तरे द्या.

१) राजा व शेतकरी यांचा संवाद लिहा.

२) शेतकऱ्याने धनाच्या/रुपयाच्या दुसऱ्या भागाचा केलेला वापर स्पष्ट करा.

३) प्रधानाने शेतकऱ्याकडून उत्तर जाणून घेण्यासाठी वापरलेली युक्ती स्पष्ट करा.

४) सविस्तर उत्तरे लिहा.

१) शेतकऱ्याने सांगितलेल्या धनाच्या भागांची विभागणी स्पष्ट करा.

२) 'ववहारकुसलो हालिओ' या पाठाचे सार सांगा.

३) राजाने सभेला विचारलेल्या प्रश्नाचे विवेचन करा.

५) संदर्भासह स्पष्टीकरण करा.

१) 'सयहुत्तं णरिंदस्स मुहं जाव ण पासेज्जा, ताव इमस्स वयणस्स रहस्सं कस्स वि मए ण कहिअव्वं ?'

२) 'हे करिसअ ! तुम्हारिसेहिं मइमंतपुरिसेहिं च्चिय मम रज्जं विराएइ।'

३) एआसु सुवण्णमुद्दासु मुहं दिट्ठं ।

६) पाठातून योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.

१) एगंमि खेत्ते .... कुणंतं हालियं .... ।

२) .... भागेण अहं अप्पाणं णियभज्जं पोसेमि ।

३) सुणिऊण 'भविया!........,पयत्तेह........'।

४) पहाणो वि तस्स वयणजुत्तिं........णच्चा हालिअस्स पुरओ .... ठवेइ ।

५) एसो हालिओ........रायमाणणिज्जो जाओ ।

७) समास सोडवा.

१) भूमिपालओ –

२) परलोगसुहावहं –

३) जणपरंपराओ –

४) णरिंदपडिगिई –

५) सुवण्णमुद्दा –

८) प्राकृत समानार्थी शब्द द्या.

१) हालिअ –

२) धीमंत –

३) घर –

४) णरिंद –

५) मुह –

६) खेत्त –

९) प्राकृत विरुद्धार्थी शब्द लिहा.

१) सुह –

२) हिय –

३) दिट्ठं –

४) पच्चुत्तर –

५) परलोय –

६) जाणमाण –


१०) विभक्त्यांप्रमाणे शब्द भरून तक्ता पूर्ण करा.

सुहकम्मेहिं, किसिकम्मं, हालिएण, विविहवणराइं, एगंमि, णरिंदेहिं, कूवंसि, परलोगंमि, णरिंदस्स, घरंमि


तृतीया	सप्तमी	द्वितीया

११) पाठातील योग्य विशेषणे निवडून रेखाजालचित्र पूर्ण करा.


१)



२)



३)



१२) शेतकऱ्याने रुपयाचे चार भाग करण्याची कारणे.

३) अभयदाणं

हा उतारा हरिभद्रसूरींच्या ‘समराइच्चकहा’ या ग्रंथातून घेतला आहे. आचार्य हरिभद्रसूरी हे जैन आगमग्रंथांचे प्रसिद्ध टीकाकार असून ते इ.स. ८ व्या शतकात होऊन गेले. त्यांनी संस्कृत व प्राकृत अशा दोन्ही भाषांमध्ये ग्रंथ रचले. चित्तोड येथे राहणाऱ्या हरिभद्र यांनी जिनदत्तांजवळ दीक्षा घेतली. ‘समराइच्चकहा’ (समरादित्यकथा) ही त्यांची उत्कृष्ट धर्मकथा आहे. यामध्ये राजा समरादित्य आणि प्रतिनायक अग्निशर्मा यांच्या नऊ जन्मांची (भवांची) कथा आहे.

साहित्यकारांनी प्राकृत ग्रंथांमध्ये श्रावक किंवा गृहस्थांसाठी आहारदान, औषधदान, ज्ञानदान, अभयदान अशी चार प्रकारची महत्त्वाची दाने सांगितली असून त्यापैकी अभयदान हे सर्वात श्रेष्ठ आहे, हे या वेच्यात सांगितले आहे. फाशीसाठी नेल्या जात असणाऱ्या चोराला पाहून राणीला वाईट वाटते. राणी, चोराला अभयदान देण्याची, राजाला विनंती करते व तिच्या विनंतीमुळे पुढे काय घडले हे या कथेमध्ये दिले आहेत.

अत्थि इहेव बंभउरं णयरं। तत्थ कुसद्धओ राया रज्जं करेइ। तस्स कमलुया महादेवी, तारावलि-प्पमुहाओ अण्ण-देवीओ। अण्णया राया वायायणोवविट्ठो समं कमलुया-पमुहाहिं चउहिं अग्गमहिसीहिं अक्ख-जूय-विणोएण चिट्ठइ। तओ अणेय-कसा-घाय-दूमिय-देहो बद्धो रज्जूए दंडवासिएण आणिओ तक्करो। भणियं च णेण-‘देव, कयमणेण परदव्वावहरणं।’



राइणा भणियं- ‘वावाएहि एयं।’

पयट्टाविओ दंडवासिएण वज्झ-भूमिं। तओ पाण-वल्लहयाए अवलोइऊण दीण-वयणेण तीए दिसाए अक्कंदियमणेण- ‘अहो, पढम-चोरकारी असंपत्त-मणोरहो वावाइज्जामि अहण्णो।’

एयमायण्णिऊण सोगियाओ देवीओ। विण्णत्तो ताहिं राया- ‘अज्जउत्त, मा असंपत्त-मणोरहो वावाइज्जउ। अज्जउत्त-पसाएण किं पि करेमो एयस्स।’

अणुमअं राइणा, भणियं- ‘करेह।’

तओ एगीए मोयाविऊण अब्भंगाविओ सहस्सपागेण, मद्दाविओ सप्पओयं, ण्हावाविओ गंधोयगाहिं, दिण्णं च खोम-जुयलं। लग्गा दस-सहस्सा। भणिओ य तीए- ‘एत्तियगो मे विहवो।’

अण्णाए काराविओ आसव-पाणं, भक्खाविओ विलंके, विलिंपाविओ जक्ख-कद्दमेणं, दिण्णं च कडि-सुत्तयं। परिच्चाओ वीसं सहस्साइं। भणिओ य तीए- ‘एत्तियगो मे विहवो।’

अण्णाए भुंजाविओ कामियं, पायाविओ दक्खा-पाणगाइं, भूसाविओ दिव्वाहरणेहिं, दिण्णं च तंबोलं । लग्गो एत्थ लक्खो । भणिओ य तीए- ‘एत्तियगो च्चिय मे विहवो’ ।

मउलिया कमलुया। भणिया णरिंदेण- ‘ण देसि तुमं किं चि?’



तीए भणियं 'अज्जउत्त, णत्थि मे विहवो एयस्स सुंदरयर-दाणे।'

राइणा भणियं- 'जीवलोय-सार-भूया मे तुमं। पहवसि ममं पाणाणं पि। ता कहं णत्थि?'

तीए भणियं- 'अज्जउत्त, महा-पसाओ। जइ एवं, ता देमि किंचि अहं अज्जउत्ताणुमईए।'

राइणा भणियं- 'एवं करेहि।'

भणिओ य कमलुया-देवीए चोरो- 'भद्द, दिट्ठो तए अकज्ज-बीय-तरु-कुसुमुग्गमो।'

तेण भणियं- 'सामिणि, सुट्ठु दिट्ठो। अओ चेव संजाय-पच्छायावो विरओ अहं जावज्जीवमेवाकज्जायरणस्स।'

देवीए भणियं- 'जइ एवं, ता दिण्णं मए इमस्स अभयं।'

राइणा भणियं - 'सुदिण्णं।'

हरिसिओ चोरो, मोइयं सुंदरयरं ति।

परितुट्ठा कमलुया। हसिअं सेस-देवीहिं। महादेवीए भणियं- 'किमिमिणा हसिएण?' एयं चेव पुच्छह 'किमेत्थ सुंदरयरं?' ति।

पुट्ठो चोरो। भणियं च णेण- 'मरण-भयाहिभूएण ण णायं मए सेसं ति ण याणामि विसेसं। संपयं पुण सुहिओ म्हि।'

'एवमेयं' ति पडिवण्णं सेस-देवीहिं।

सद्दत्था

तारावलिप्पमुहाओ – तारावली ज्यात मुख्य आहे (अशा राण्या)

अण्णदेवीओ – इतर राण्या

अण्णया – एकदा

वायायणोवविट्ठो – खिडकीपाशी बसलेला

अग्गमहिसीहिं (समं)– पट्टराण्यांसह

अक्खजूयविणोएण – फाशांनी द्यूत खेळून मनोरंजन करीत असताना

अणेयकसाघायदूमियदेहो – चाबकाच्या (कसा) अनेक तडाख्यांनी (आघात) ज्याच्या शरीराला दुखापत (दूमिय) झाली आहे असा (देह असलेला चोर)

दंडवासिएण – कोतवालाने, फौजदाराने

तक्करो – चोर

पयट्टाविओ– वळविले, प्रवृत्त केले

पाणवल्लहयाए – प्राण/जीव प्रिय असल्याने

अक्कंदियं – आक्रोश केला, हंबरडा फोडला

असंपत्तमणोरहो – ज्याच्या इच्छा पूर्ण झालेल्या नाहीत असा

वावाइज्जामि – मी ठार मारला जात आहे

वावाएहि – ठार करा

वज्झभूमिं – फाशी देण्याची जागा

अहण्णो – कमनशिबी, हतभागी, दुर्दैवी

आयण्णिऊण – ऐकून

सोगियाओ – दु:खी झाल्या

विण्णत्तो – विनविले

अज्जउत्तपसाएण – आर्यपुत्रांच्या कृपेने, प्राचीनकाळी स्त्रिया पतीला संबोधून 'अज्जउत्त' असे म्हणत असत

अणुमअं – परवानगी दिली

मोयाविऊण – मुक्तता करून

अब्भंगाविओ सहस्सपागेण – हजार औषधींनी तयार केलेले तेल त्याला चोपडवून घेतले.

मद्दाविओ सप्पओयं – शास्त्रशुद्ध पद्धतीने मालीश करविले

ण्हाविओ – स्नान घालायला लावले

गंधोयगाइहिं – सुगंधी पाणी इत्यादीने

खोमजुयलं – रेशमी वस्त्रांची जोडी, उत्तरीय व अधोवस्त्र अशी जोडी

लग्गा दससहस्सा – दहा हजार (नाणी) लागले / खर्च झाला, 'लग्ग'चा प्रयोग मराठी प्रमाणे आहे

एत्तियग्गो – एवढा, एवढे, एवढी

विहवो – वैभव, ऐश्वर्य

काराविओ – करविले

आसवपाणं – फळांचा रस इत्यादी, कदाचित् या ठिकाणी औषधी काढा असाही 'आसव'चा अर्थ असू शकेल

विलंके– औषधीगुणयुक्त भोजन

विलिंपाविओ – लेप लावविला

जक्खकद्दमेण – एक प्रकारच्या औषधी सुगंधी लेपाने - कापूर, अगरू, कस्तूरी आणि कंकोल हे समभाग घेऊन तयार केलेला लेप किंवा मलम

कडिसुत्तयं – कडदोरा, करदोटा, करदोडा
परिच्चाओ – व्यय केले, खर्च केले
भुंजाविओ – जेवण/भोजन करविले
पायाविओ – प्यायला दिले, पिण्यास द्यायला लावले.
दक्खापाणगाइं – शक्तिवर्धक पेये इ.(द्राक्षे इ. पासून तयार केलेले)
भूसाविओ – अलंकृत केले, सजविले, सजवायला लावले (सांगितले)
दिव्वाहरणेहिं – उत्तम दागिन्यांनी
लक्खो – एक लाख (नाणी)
पहवसि – अधिकार गाजवतेस
अणुमईए – परवानगीने
अकज्जबीयतरुकुसुमुग्गमो – अयोग्य कृत्यरूपी बीजातून उगवलेल्या झाडावर उत्पन्न झालेले फूल
सुट्ठु – चांगल्या प्रकारे
संजायपच्छायावो – ज्याला पश्चात्ताप झालेला आहे असा तो
विरओ – परावृत्त झाला आहे असा
जावज्जीवं – जिवंत असेपर्यंत, तहहयात
मोइयं सुंदरयरं ति – चांगल्या प्रकारे सुटका झाली म्हणून
परितुट्ठा – संतुष्ट झाली
याणामि – जाणतो
सुहिओ – सुखी, समाधानी
पडिवण्णं – कबूल केले, मान्य केले

सज्झाओ

१) माध्यम भाषेत भाषांतर करा.

१) अत्थि इहेव ...... परदव्वावहरणं।'
२) अण्णाए भुंजाविओ ...... एयस्स सुंदरयर-दाणे।'
३) परितुट्ठा कमलुया ...... सुहिओ म्हि।'

२) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) राजाच्या नगरीचे नाव सांगा.
२) चोराची विशेषणे सांगा.

३) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

१) 'भद्द, दिट्ठो तए अकज्ज-बीय-तरु-कुसुमुग्गमो।'
२) कयमणेण परदव्वावहरणं ।
३) ता देमि किंचि अहं अज्जउत्ताणुमईए।

४) कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा पूर्ण करा.

१) बंभउरं णयरं, तत्थ ..... राया रज्जं करइ। (कुसद्धओ, पालओ)
२) पयट्टाविओ ..... वज्झ-भूमिं। (दंडवासिएण, रक्खएण)
३) तओ एगीए मोयाविऊण .... सहस्सपागेण । (अब्भंगाविओ, ण्हाविओ)
४) अज्जउत्त, णत्थि मे विहवो एयस्स सुंदरयर-.....। (दाणे, आसणे)

५) कारणे लिहा.

१) फौजदाराने चोराला पकडले –
२) दु:खी राण्यांनी चोराला न मारण्याची विनंती केली–

६) एका शब्दात उत्तरे लिहा.

१) राजाला ज्यांनी विनंती केली त्या –
२) ज्याच्या इच्छा पूर्ण झाल्या नव्हत्या तो –

७) समास सोडवा.

१) अणेयकसाघायदूमियदेहो –
२) परदव्वावहरणं –
३) वज्झभूमिं –
४) अकज्जबीयतरुकुसुमुग्गमो –

८) प्रत्येकी दोन प्राकृत समानार्थी शब्द द्या.

१) राया –
२) तक्करो –
३) वल्लहो –
४) कुसुमं –
५) साहू –
६) अग्गमहिसी –
७) तुट्ठ –
८) विरओ –

https://www.ncertbooks.guru/

९) प्राकृत विरुद्धार्थी शब्द द्या.

१) सुंदर –
२) मलिण –
३) इत्थि –
४) कज्ज –
५) भय –
६) सुगंध –

१०) रूपे द्या.

१) बंभउर – प्रथमा बहुवचन –
२) राया – तृतीया एकवचन –
३) एग – स्त्रीलिंगी पंचमी एकवचन –
४) कद्दम – सप्तमी एकवचन –
५) महादेवी – षष्ठी एकवचन –
६) चोर – सप्तमी बहुवचन –
७) मणोरह – तृतीया बहुवचन –
८) रज्जु – द्वितीया एकवचन –

११) खालील कोष्टक पूर्ण करा.

शब्द	मूळशब्द	लिंग	वचन	विभक्ती
णयरं				
कुसद्धओ				
देवीओ				
अग्गमहिसीहिं				
रज्जूए				
ताहिं				
खोमजुयलं				
मे				
तुमं				
पाणाणं				
अहं				
सामिणि				
चउहिं				
देवीहिं				

शब्द	मूळधातू	पुरुष	वचन	व्याकरण
करइ				
अत्थि				
पयट्टाविओ				
वावाएहि				
मोयाविऊण				
अवलोइऊण				
वावाइज्जउ				
ण्हावाविओ				
काराविओ				
देसि				
पहवसि				
करेहि				
भणियं				
दिट्ठो				
परितुट्ठा				

१२) संधी सोडवा.

एयमायण्णिऊण	
अक्कंदियमणेण	
अज्जउत्ताणुमईए	
कुसुमुग्गमो	
जावज्जीवमेवा–कज्जायरणस्स	
किमिमिणा	
किमेत्थ	
सुहिओम्हि	
मरणभयाहिभूएण	
वायायणोवविट्ठो	

४) णाअसीलो मेहरो

'मणोरमाकहा' हा धर्मोपदेश-कथांचा संग्रह ग्रंथ आहे. हा ग्रंथ श्रीवर्धमानसूरींनी गुजरातमधील धंधुका या गावामध्ये इ.स. १३८३ मध्ये लिहिला. या ग्रंथामध्ये मनोरमेच्या चार जन्मांचे (भवांचे) वर्णन केले आहे. हे चार भवांचे वर्णन चार अध्यायांमध्ये (अवसरांमध्ये) केले आहे. यामध्ये एकूण ८० कथा आल्या आहेत.

प्रस्तुत उतारा धनगुप्ताच्या चार मुलांबद्दलचा आहे. या उताऱ्यामध्ये धनगुप्ताच्या मृत्यूनंतर त्याच्या चार मुलांमध्ये मालमत्तेवरून भांडणे होऊ लागली. हे भांडण एक अशिक्षित गवळी आपल्या बुद्धिचातुर्याने कसे मिटवतो ? ही हकीकत आपल्याला प्रस्तुत उताऱ्यातून दिसते.

अत्थि वंग-विसय-सारा मुत्तिवई णाम णअरी। तीए णअरीए लोग-ववहार-कुसलो पच्छिम-वए वट्टमाणो धण-धणदत्त-धणमित्त-धणचंदाभिहाणाणं चउण्हं पुत्ताणं पिआ धणगुत्तो सेट्ठी। सो जरा-जज्जरिअ-काओ, सूलाइ-तिव्व-रोगाभिभूओ पाण-संसए वट्टइ। मिलिआ सुहि-सयणा। भणिओ तेहिं सेट्ठी- 'धरमाणो चेव तहा करेहि जहा पुत्ताणं पच्छा विरोहो ण हवइ'। तेण भणिअं- 'तुम्हे साहेज्जेण एअं सिज्झइ'। तेहिं भणियं- 'सहाया वयमेत्थ पओयणे'। सेट्ठिणा भणिअं- 'जइ तो, संति अणेण चउसु वि कोणेसु मंदिरस्स चत्तारि कलसा। किज्जंतु पत्तेयं धणाइ-णामंकिआ। जस्स जत्थ णामयं सो चेव तेण लेअव्वो विसंवाए भवंतो सक्खिआ'। तहेव कअं। गआ सट्ठाणं सयणाइया।



अण्णया उवरओ सेट्ठी। कइवय-दिणेहिं कय-मय-किच्चा, विगय-सोगा, घर-कज्जाणि विचिंतिउमाढत्ता तणया। वच्चंति वासरा। कलहंति परोप्परं तेसिं जायाओ। तण्णिमित्तं ताण वि जायइ चित्त-खंडणा। अण्णम्मि दिणे भणिआ धणेण धणदत्ताइया- 'संपयं जइ पुढो हविज्जइ तो सोहणं'।

पडिवण्णं सव्वेहिं। सोहण-दिणे सुहि-सयण-समक्खं उक्खणिओ धणेण णिअ-णामंकिय-कलसो, जाव तत्थ धूली चेव केवलं। ठिओ अहो-मुहो लज्जाए। धणदत्तेण वि उक्खणिओ णिय-कलसो। तस्स पुण अट्ठीणि चेव केवलाणि। सो वि विलक्ख-वयणो सयण-जण-मुहाणि जोइउमाढत्तो। धणमित्तेण वि उक्खणिओ णिअ-कलसो। तत्थ वि वहियाओ चेव केवलाओ। सो वि संजाअ-विलक्खो ठिओ अहो-मुहो। धणचंदेण वि कड्ढिओ णियकलसो। सो पुण रुप्प-सुवण्ण-मणि-मोत्तिएहिं पडिपुण्णो दिट्ठो।

हरिसिअ-हिअओ, विअसिय-वअण-णअणो, कलसं गहाय गच्छंतो भणिओ धणचंदो धणाईहिं- 'वच्छ! कहिं गम्मइ ? मुंच कलसं। सअल-साहारणो एस अत्थो। समभागेहिं कीरउ। किं ण अम्हे ताय-तणआ ?' सो कहेइ- 'ताएण जं दिण्णं तं गिण्हह'। एवं तेसिं विसम-वयंताण जाअं भंडणं। णिवारिआ सुहि-सयण-वग्गेण धणाइणो- 'ण एत्थ तुब्भेहिं किं पि लहेयव्वं जीवंतेण वि सेट्ठिणा छिण्णो तुब्भाण ववहारो'।

परिभूयं अत्ताणं मण्णमाणा ते पंचउलमुवट्ठिआ। तेण वि विण्णाय-वुत्तंतेण णिवारिया। अमच्च-सामंत-रण्णा


वि 'जुत्तमेअं' ति णिवारिआ। 'ण एत्थ छिण्णो ववहारो' त्ति भणिऊण संचलिआ चउरो वि वसंतपुराभिमुहं। मग्गे समासण्ण-गोउले सव्वे ठिआ। दिट्ठो मेहरो णाम गोउलाहिवई। तेण पुच्छिआ, 'के तुब्भे? किं णिमित्तं वा इहागआ?' कहिओ तेहिं सव्वो वइयरो।

साहाविअ-मइ-विहवेण मेहरेण जंपिअं- 'ण तुम्हाण पिउणो एगस्स वि परिभवो कओ। णवरं जो जत्थ कुसलो, सो तस्स सामिओ समाइट्ठो। पढमो खेत्त-घर-हट्टाण। बीओ गवाइ-चउप्पयाण। तइओ कलंतराइ-दिण्ण-दविणस्स। चउत्थो 'बालो' त्ति काऊण रुप्प-सुवण्णाईण सामी कओ'।

संजाय-पच्चएण भणियं धणेण- 'घडइ ते वयणं। जओ कुसलो अहं घराइ-कज्जेसु'। बीएण भणिअं- 'अहं पुण चउप्पय-विसएसु'। तइएण भणियं- 'अहं उग्गाहणियाए'। 'अओ चेव ताएण एवंविहा कलसा कय' त्ति हरिसिय-मणसा समागया स-णअरं। समीव-संठिएण सुओ एस वइयरो पुरिसेण।

कहियं रण्णो। बीय-दिणे सद्दाविओ मेहरो।

संभंत-चित्तो समागओ गहिऊण दहि-दुद्धाइ-पाहुडं। पणमिऊण णराहिवं णिविट्ठो। पुच्छिओ राइणा- 'कहिं तए एरिसो विवाअ-परिच्छेओ सिक्खिओ?' तेण भणिअं- 'महाराअ! रण्णे जायाणं, रण्णे चेव संवड्ढियाणं, कत्तो



सिक्खागमो अम्हारिस-पुरिसाण? साहाविआ मे मई।' सम्माणिऊण वत्थाईहि विसज्जिओ मेहरो।



सद्दत्था

वंगविसयसारा – वंग प्रांतातील प्रमुख (नगरी)
मुत्तिवई – नगरीचे नाव
पच्छिमवए – उतारवयात, म्हातारपणी
सूलाइ – शूल इत्यादी. शूल हे रोगाचे नाव, पोटशूळ इत्यादी
पाणसंसए – आसन्न मरण अवस्थेत
सुहिसयणा – जवळचे स्वत:चे लोक / नातेवाईक (मित्र इत्यादी)
किज्जंतु – केला जावा
लेअव्वो – घ्यावा
सक्खिआ – साक्षीदार
उवरओ – निधन पावला
कय-मय-किच्चा – मृत्यूचे संस्कार (अंत्य-संस्कार) केलेले (ते)
विगयसोगा – शोक / दु:ख दूर झाले आहे असे ते
जायाओ – पत्नी (बहुवचनी शब्द)
संपयं जइ पुढो हविज्जइ तो सोहणं – आता आपण वेगळे झाल्यास उत्तम होईल
पुढो – वेगळे
पडिवण्णं सव्वेहिं – सर्वांनी त्याचा स्वीकार केला
उक्खणिओ – खणले
अट्ठीणि – अस्थि, हाडे
विलक्खो – लज्जित
जोइउमाढत्तो – जोइउं + आढत्तो- पाहण्यास सुरुवात केली
वहियाओ (दे.) – हिशोब लिहिण्याच्या वह्या
साहारणा – साधारण (बहुवचन)
परिभूयं – अपमानित
मण्णमाणा – मानणारे
विण्णायवुत्तंतेण – वृत्तांत/हकीकत जाणल्याने/जाणून घेतल्याने
ववहारो – तंटा, कलह, भांडण
समासण्ण – जवळच्या असलेल्या
गोउलाहिवई – गवळी-वाड्याचा प्रमुख
वइयरो – प्रसंग
साहाविअमइविहवेण– नैसर्गिक/उपजत बुद्धीच्या वैभवाने, अत्यंत हुशारीने
परिभवो – अपमान
णवरं (अव्यय)**–** केवळ
हट्ट – बाजार, दुकान
गवाइचउप्पयाण – गाय इ. चतुष्पाद प्राण्यांचा
कलंतराइ – व्याज इत्यादी
दविणस्स – संपत्ती, पैसे यांचा
संजाय-पच्चएण – योग्य काय आहे ते कळल्यामुळे
उग्गाहणियाए – वसुली, तगादा यांमध्ये
पाहुडं – भेट, उपहार

सज्झाओ

१) माध्यम भाषेत भाषांतर करा.

१) अत्थि वंग-विसय-सारा ..... वयमेत्थ पओयणे’।

२) सोहण-दिणे ...... ठिओ अहो-मुहो।

३) परिभूयं अत्ताणं ...... वइयरो ।

४) संभंत-चित्तो ...... विसज्जिओ मेहरो।

५) हरिसिय-हियओ ...... तुब्भाण ववहारो’।

२) एका वाक्यात उत्तरे द्या.

१) ‘मुत्तिवई’ नगरीतील व्यवहारकुशल श्रेष्ठीचे नाव सांगा.

२) श्रेष्ठीने आपल्या मुलांच्या नावाचे कलश तयार करण्याचे कारण सांगा.

३) संदर्भासह स्पष्टीकरण करा.

१) ‘ताएण जं दिण्णं तं गिण्हह।’

२) ‘तुम्ह साहेज्जेण एअं सिज्झइ।’

३) ‘घडइ ते वयणं। जओ कुसलो अहं घराइ-कज्जेसु’

४) समास ओळखा.

१) ववहारकुसलो –
२) पंचउलं –
३) गोउलाहिवई –

५) जोड्या लावा.

अ गट	ब गट
१) पिआ	अ) गोउलाहिवई
२) धणं	ब) अट्ठिकलसो
३) मेहरो	क) रुप्प-सुवण्ण-कलसो
४) धणदत्तो	ड) पढमो पुत्तो
५) धणचंदो	इ) धणगुत्तो


६) मराठी प्रतिशब्द द्या.

१) रुप्प – .....
२) ववहार – .....
३) सेट्ठी – .....
४) कलस – .....
५) वहिया – .....
६) दविण – .....

७) खालील शब्दांतून तीन अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.

पिआ, गंतुं, ण्हाणं, पुप्फाइं, गिण्हिऊण, देवयापूयाणं, मालाओ, करेइ, सो, सा, आवणे(हट्टे), घराओ, य, णिग्गओ, गुंफेइ।

८) धनगुप्ताच्या मुलांची नावे लिहून रेखाजाल पूर्ण करा.



९) या धड्यातील उपसर्गासहित शब्द शोधून उपसर्ग व धातू वेगळे करून लिहा.

१०) रूपे द्या.

१) विलक्ख – पुलिंगी षष्ठी बहुवचन
२) उवरम – कर्मणि भूतकालवाचक धातुसाधित विशेषण, स्त्रीलिंगी तृतीया एकवचन –
३) भण – वर्तमानकाळ द्वितीय पुरुष बहुवचन –
४) लह – विध्यर्थक विशेषण –
५) कर – भविष्यकाळ तृतीय पुरुष एकवचन –
६) दिण – सप्तमी एकवचन –
७) मंदिर – षष्ठी एकवचन –
८) लज्जा – सप्तमी बहुवचन –
९) मोत्तिय – तृतीया बहुवचन –

११) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) जह, तहा, जहा, वयण
२) वयणं, णयणं, कमलं, सीया
३) भट्टो, हरिसिओ, लज्जिओ, हसित्था
४) कमला, णेहा, भाणुमई, धणदत्तो

❀❀❀


५) चंडचूडस्स णियमो

देवेंद्रगणी ऊर्फ आचार्य नेमिचंद्रसूरी यांनी अकराव्या शतकात महाराष्ट्री प्राकृत भाषेमध्ये 'आख्यानकमणिकोश' या नावाचा त्रेपन्न गाथांचा छोटा पण महत्त्वाचा ग्रंथ लिहिला. आचार्य आम्रदेवसूरींनी या ग्रंथावर इ.स. ११३४ मध्ये चौदा हजार श्लोकप्रमाणाचा प्रचंड टीकाग्रंथ रचला. यात लोकव्यवहार, धर्म व उपदेशप्रधान अशा अनेक कथा समाविष्ट केल्या आहेत. सर्व कथा पद्यात असल्या तरी त्यामध्ये ही चंडचूडाची एकच कथा गद्यात आहे. या ग्रंथामध्ये १२७ आख्यानके (कथा) असून बहुतांश कथा प्राकृत भाषेत आहेत. काही कथा संस्कृत व अपभ्रंश भाषेतही रचल्या आहेत.

आम्रदेवसूरींनी या कथेच्या माध्यमातून जीवनातील व्रत किंवा नियम ह्यांचे महत्त्व पटवून दिले आहे.

अत्थि इहेव भारहे वासे सुहत्थलाभिहाणो णाम गामो। तम्मि अ एगो कुलपुत्तओ परोवहसणसीलो सहावकुडिलो चंडचूडाभिहाणो परिवसइ। अवरो वि तग्गिह-समीवे दुग्गयाभिहाणो कुंभआरो खल्लिहडओ। सो अ चंडचूडो पइदिणं पेच्छइ रविकिरणेसु झलझलायंतं तस्स खल्लिं। तं दट्ठूण सो दुग्गयं उवहसइ।

अण्णया एगो महामुणी सुहत्थलम्मि समागओ। चंडचूडो पासइ साहुसमीवे सावयाइजणं मज्ज-मंसाइ-णियमे गिण्हंतं। उवहासपरो सो तत्थागंतूणं पभणइ 'भो!




जइ एयारिसेहिं णियमेहिं धम्मो भवइ ता अहमवि एअस्स दुग्गयकुंभारस्स खल्लिं ण पेच्छामि ताव ण भुंजामि, मज्झ वि होउ एस णिअमो'। मुणिणा भणिअं 'जइ णिच्छएण परिपालेसि ता अत्थि फलं'। गहिओ अ अवण्णाए णिअमो, पालेइ अ तं तहा कल्लाणभायणत्तणेण सम्ममेसो।

अण्णया अ गओ सो कुंभयारो अणुग्गए चेव दिवसअरे मट्टियाखणणत्थं। जायमवरण्हं। सुइरं णिरिक्खिओ वि ण दिट्ठो कुंभआरो। दढपइण्णत्तणओ ण भुंजए एसो। पुच्छिओ भारिआए- 'किं ण भुंजसि?' भणियं च णेण- 'मए एरिसो णियमो अंगीकओ'। तीए पणयपुव्वमुवहसिओ- 'तुज्झ वि केरिसो णियमो?' तेण भणियं- 'भद्दे! मा भणसु एवं। पडिवण्णाणिव्वहणे केरिसं पुरिसत्तणं?' तओ तीए तस्स णिच्छअं जाणिऊण पुच्छियाणि दुग्गयमाणुसाणि। भणियं च तेहिं गओ मट्टिया-णिमित्तं खाणीए। तत्थेव गओ चंडचूडो तद्दंसणत्थं।

एत्थंतरे दुग्गओ मट्टियाखणणत्थं कुद्दालिआए पहारे देइ। एगप्पहारेण अ णिहाणभायणं खणक्खणेइ। 'दिट्ठो दिट्ठो' त्ति भणिऊण वलिओ चंडचूडो। दुग्गएण संकिएण 'णायमणेण' ति वालिओ। तेण वि चंडचूडेण भिउडिं वंकं काऊण भेसिऊण कुंभआरो भणिओ- 'मम पुव्विल्लएहिं एत्थ दव्वं णिहाणीकयासि'। तहवि कुंभारस्स दीणारसहस्सं दाऊण वसीकयं दविणजायं। जाओ य चंडचूडो दव्वपहावेण जणपूयणिज्जो। कुणइ अ चाय-भोग-विलासाइयं। सव्वजणा तस्स बहुमाणं देंति।

चिंतियं च तेण चंडचूडेण अणुभूय-णियमफलेण- 'अहो! मे पयइकुडिलत्तणं। अहो! मे पुरिसाहमत्तणं।



अहो! मे परलोयणिरवेक्खत्तणं। जेण मए सुतिक्खतुंडेण परमम्मवेहिणा सव्वजणा संताविआ। परोवआरणिरआ, समसत्तुमित्ता तारिसा साहुणो वि 'एए सुवड्डुया, असंबद्धभासिणो, भोगंतरायकारय' त्ति पावकम्मुणा णिंदिआ। एए वि सावआ जीव-दयापरायणा, असच्चवावारविरया, पर-दव्वावहारभीरुणो, सकलत्तसंतुट्ठा अपरिमिअ-परिग्गह-राइभोयण-मज्ज-मंसाइ-परिभोयणियत्त-चित्ता अयाणमाणेण मए उवहसिया। पेच्छ, मम उवहासपरस्स वि एरिसं, एत्तिअं णिअमफलं जाअं।'

तओ तेण तक्काले चेव दुवालसविहो सावयधम्मो गहिओ। अणंतरं मुणी होऊण मुणिधम्मं सम्मं पालेइ। आउक्खए पत्तो सो सग्गं। तओ चुओ कमेण पाविही परमपयं।

सद्दत्था

सुहत्थलाभिहाणो – शुभस्थल नावाचे (गाव)
परोवहसणसीलो – दुसऱ्याची थट्टा करण्याचा स्वभाव असणारा
सहावकुडिलो – स्वभावाने दुष्ट असणारा
खल्लिहडओ – टक्कल असलेला
झलझलायंतं – झळाळणारे
मज्जमंसाइणियमे – मद्यमांस इत्यादी त्यागासंबंधीचे नियम
गिण्हंतं – घेत असताना
परिपालेसि – पाळशील, पालन करशील
अवण्णाए – तिरस्काराने, उपहासाने
कल्लाणभायणत्तणेण – कल्याणासाठी पात्र होऊ या हेतूने
मट्टियाखणणत्थं – माती खणण्यासाठी
दढपइण्णत्तणओ – कठोर प्रतिज्ञा घेतल्यामुळे
तीए पणयपुव्वमुवहसिओ – ती नम्रपणे खोचक हसली. (नम्रपणे उपहासाने तिच्याकडून (तो) हसला गेला) (कर्मणी रचना)
पडिवण्णाणिव्वहणे –पडिवण्ण+अणिव्वहणे–स्वीकारलेले पार न पाडण्यात/पालन न करण्यात
कुद्दालिआए – कुदळीने
णिहाणभायणं – खजिन्याचे पात्र/भांडे
खणक्खणेइ – खणखणले, वाजले
वलिओ – वळला, मागे फिरला
वालिओ – वळविले, परत बोलावले
भेसिऊण – घाबरवून/ भीती दाखवून
पुव्विल्लएहिं – पूर्वजांनी
चायभोगविलासाइयं – त्याग-भोग-विलास इत्यादी
पयइकुडिलत्तणं – स्वभावत: असणारा कुटिलपणा
सुतिक्खतुंडेण – धारदार मुखाने (वाणीने), दुखावणाऱ्या शब्दांनी
परमम्मवेहिणा – दुसऱ्याच्या मर्मावर (दुखऱ्या नसेवर) घाव घालणाऱ्या
सुवड्डुया – गलेलठ्ठ, जाडजूड
भोगंतरायकारय – भोग/विलास यामध्ये विघ्न निर्माण करणारे
अयाणमाणेण – न जाणता, अजाणतेपणाने
दुवालसविहो – बारा प्रकारची व्रते : (१) अहिंसा, (२) सत्य, (३) अचौर्य, (४) ब्रह्मचर्य, (५) अपरिग्रह, (६) दिग्व्रत, (७) देशावकाशिक, (८) अनर्थदंडत्याग, (९) भोगोपभोगपरिमाण, (१०) सामायिक, (११) प्रोषधोपवास, (१२) अतिथिसंविभाग
सम्मं – चांगल्या प्रकारे
आउक्खए – आयुक्षय, आयुष्य संपल्यावर
चुओ – च्युत झाला, इथे च्युत होवून असा अर्थ आहे
पाविही – प्राप्त करेल, मिळवेल

सज्झाओ

१) माध्यम भाषेत भाषांतर करा.

१) अण्णया एगो ...... सम्ममेसो।
२) पुच्छिओ भारिआए ...... चंडचूडो तद्दंसणत्थं।
३) चिंतियं च तेण ...... मए उवहसिया।

२) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) चंडचूडाच्या गावाचे नाव सांगा.
२) चंडचूडाने घेतलेले व्रत सांगा.
३) कुंभार कुदळ घेऊन कोठे गेला.
४) पाठात आलेले कुंभाराचे विशेषण सांगा.
५) चंडचूडाला नियमपालनाचे मिळालेले फळ सांगा.

३) थोडक्यात उत्तरे लिहा.

१) चंडचूडाने व्रत घेतले ती परिस्थिती स्पष्ट करा.
२) चंडचूड आणि त्याची पत्नी यांच्यातील संवाद मांडा.
३) चंडचूडाचा कुंभाराशी झालेला संवाद आपल्या भाषेत लिहा.

४) सविस्तर उत्तरे लिहा.

१) पाठाचा सारांश सांगा.
२) चंडचूडाने केलेले नियमपालन सांगा.
३) नियमपालनाचे फळ मिळाल्यामुळे चंडचूडाने केलेला विचार स्पष्ट करा.

५) संदर्भासह स्पष्टीकरण करा.

१) 'जइ णिच्छएण परिपालेसि ता अत्थि फलं' ।
२) दढपइण्णत्तणओ ण भुंजए एसो ।
३) 'मम पुव्विल्लएहिं एत्थ दव्वं णिहाणीकयासि' ।
४) मम उवहासपरस्स वि एरिसं णिअमफलं जाअं ।

६) संधी सोडवा.

१) सुहत्थलाभिहाणो –
२) तद्दंसणत्थं –
३) तत्थागंतूणं –
४) जायमवरण्हे –

७) रूपे ओळखा.

१) समागओ –
२) उवहसिओ–
३) झलझलायंतं –
४) खणक्खणेइ –
५) काऊण –
६) पूयणिज्जो –

८) समास सोडवा.

१) पइदिणं –	
२) सहावकुडिलो –	
३) णिहाणभायणं –	
४) दव्वपहावेण –	
५) जणपूयणिज्जो –	
६) दुवालसविहो–	

९) खालील शब्दांचे तक्त्यामध्ये सूचनेप्रमाणे वर्गीकरण करा.

भेसिऊण, चिंतियं, दट्ठूण, गिण्हंतं, होऊण, णिरिक्खिओ, पुच्छियाणि, विज्जमाणो, करंतो

कर्म.भू.धा.वि.	पूर्वकालवाचक	व.का.धा.वि.

१०) कोण कोणास म्हणाले ते लिहा.

१) किं ण भुंजसि ?
२) 'भद्दे! मा भणसु एवं। पडिवण्णाणिव्वहणे केरिसं पुरिसत्तणं?'।
३) 'जइ णिच्छएण परिपालेसि ता अत्थि फलं' ।

६) कम्म-परिणामो

'वसुदेवहिंडी' या ग्रंथाला जगभरातील कथासाहित्यामध्ये महत्त्वपूर्ण स्थान आहे. इ.स.च्या सहाव्या शतकात संघदासगणी यांनी श्रीकृष्णाचे वडील वसुदेवाच्या प्रवासाचे वर्णन प्राकृत भाषेमध्ये केले आहे. हिंडी म्हणजे हिंडणे, प्रवास. म्हणून या ग्रंथाचे नाव वसुदेवहिंडी होय. या ग्रंथात वसुदेवाच्या प्रवासासोबत कौरव-पांडव यांची कथासुद्धा संक्षिप्त स्वरूपात दिलेली आहे. हा ग्रंथ २ खंडांमध्ये विभागला असून या ग्रंथाचा दुसरा खंड धर्मदासगणी यांनी रचला आहे. या ग्रंथामध्ये मोठ्या प्रमाणात तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. याचसोबत या ग्रंथामध्ये विविध विषयांवरील अनेक कथा आलेल्या असून या कथा अत्यंत रोचक आणि उपदेशप्रद आहेत.

कर्मांचा परिणाम दाखवणारी प्रस्तुत कथा देखील या कथांप्रमाणेच रोचक आणि उपदेशप्रद आहे. माणसाला त्याच्या आसक्तीचे कसे फळ मिळते हे या कथेत मांडलेले आहे.

४) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

१) रक्खइ धीराण मणं आसण्णभयाउलो दइवो।
२) जं बंभहरिहराण वि लग्गइ चित्ते चमक्कारो।
३) जं भाविऊण दिव्वो परंमुहो धुणइ णियसीसं।
४) हिअआइ सुपुरिसाणं महातरूणं व सिहराइं।

५) मराठी समानार्थी शब्द भरून रेखाजाल पूर्ण करा.



६) खालील शब्दामधील उपसर्ग, धातू आणि प्रत्यय वेगळे करून लिहा.

शब्द	उपसर्ग	धातू	प्रत्यय
सुपुरिसाणं			
समोणयाइ			
समुच्छाहो			
आरुहंतं			
णिप्फला			

७) पाठातील योग्य शब्द निवडून गाथेतील रिकाम्या जागा भरा.

१) फलसंपत्तीइ ..... तुंगाइ फलविपत्तीए।
२) ववसायपायवो सुपुरिसाणं लक्खिज्जइ .....।
३) ण ..... वच्छे मज्झे कमलाण णेय खीरहरे।

८) समास ओळखा व सोडवा.

१) हियइच्छिअं
२) साहससहावा
३) बंभहरिहराण
४) आसण्णभयाउलो
५) कज्जपरिणामो
६) फलसंपत्ती
७) सुपुरिसाण
८) ववसायपायवो

९) रूपे द्या.

१) वच्छ – सप्तमी बहुवचन –
२) सुपुरिस – तृतीया बहुवचन –
३) वड्ढ – कर्मणी भूतकालवाचक धातुसाधित विशेषण, स्त्रीलिंगी द्वितीया बहुवचन –
४) आ+रभ – कर्म भू.धा.वि. नपुंसकलिंगी पंचमी बहुवचन –
५) महातरु – प्रथमा बहुवचन –

१०) रूपे ओळखा.

१) सिहराइ
२) विहवो
३) जाओ
४) चित्ते
५) राहुणा
६) साहसं
७) वसइ
८) होहिंति
९) धीराणं
१०) फिट्टिहिइ
११) भाविऊण
१२) संदेहो

व्याकरण विवेचन

१) विध्यर्थकाचे प्रत्यय आणि क्रियापदाची रूपे

१) हे करावे, हे केले पाहिजे, कर्तव्याचा उपदेश यासाठी विध्यर्थक क्रियापदांचा उपयोग केला जातो.
२) एखादे काम करण्यासाठी प्रेरणा, इच्छा, काही वेळा नकार दर्शवण्यासाठी विध्यर्थक क्रियापदांचा उपयोग केला जातो.
३) शंका किंवा शक्यता दर्शवण्यासाठी सुद्धा विध्यर्थक क्रियापदांचा उपयोग केला जातो.

प्रत्यय

पुरुष	एकवचन	अनेकवचन
प्रथम पुरुष	एज्जा, एज्जामि	एज्जाम
द्वितीय पुरुष	एज्जा, एज्जासि, एज्जाहि	एज्जाह
तृतीय पुरुष	ए, एज्जा	एज्जा

रूपे

'पास' – पाहणे

पुरुष	एकवचन	अनेकवचन
प्रथम पुरुष	पासेज्जा, पासेज्जामि	पासेज्जाम
द्वितीय पुरुष	पासेज्जा, पासेज्जासि, पासेज्जाहि	पासेज्जाह
तृतीय पुरुष	पासे, पासेज्जा	पासेज्जा

'गा' – गाणे

पुरुष	एकवचन	अनेकवचन
प्रथम पुरुष	गाएज्जा, गाएज्जामि	गाएज्जाम
द्वितीय पुरुष	गाएज्जा, गाएज्जासि, गाएज्जाहि	गाएज्जाह
तृतीय पुरुष	गाए, गाएज्जा	गाएज्जा

'णे' – नेणे

पुरुष	एकवचन	अनेकवचन
प्रथम पुरुष	णेज्जामि	णेज्जाम
द्वितीय पुरुष	णेज्जासि	णेज्जाह
तृतीय पुरुष	णेज्जा	णेज्जा

'हो' – असणे

पुरुष	एकवचन	अनेकवचन
प्रथम पुरुष	होज्जा, होज्जामि	होज्जाम
द्वितीय पुरुष	होज्जा, होज्जासि, होज्जाहि	होज्जाह
तृतीय पुरुष	होज्जा	होज्जा

विकरणासहित हो धातूची रूपे –

पुरुष	एकवचन	अनेकवचन
प्रथम पुरुष	होइज्जामि, होएज्जामि	होइज्जाम, होएज्जाम
द्वितीय पुरुष	होइज्जासि, होएज्जासि, होइज्जाहि, होएज्जाहि	होइज्जाह, होएज्जाह
तृतीय पुरुष	होइज्जा, होएज्जा	होइज्जा, होएज्जा

सर्वनामे

दर्शक, संबंधदर्शक व प्रश्नार्थक या तीनही सर्वनामांची पुल्लिंगी व स्त्रीलिंगी रूपे इयत्ता अकरावी मध्ये आपण शिकलो आहोत. आता त्याच सर्वनामांची नपुंसकलिंगी रूपे पाहू.

दर्शक सर्वनामे– १) एय (एतद्) २) इम (इदम्) ३) अमु (अदस्)

एय (एतद्) नपुं.

कारक	एकवचन	अनेकवचन
कर्ता (प्र.)	एयं, एअं, एस, इणं, इणामो	एआइं, एयाइं, एयाणि, एआइँ, एयाइ
कर्म (द्वि.)	एयं	एआइं, एयाइं, एयाणि, एआइँ, एयाइ
करण (तृ.)	एएण, एएणं	एएहि, एएहिं
संप्रदान (च./ष.)	एअस्स, से	एएसिं, एआण, एयाणं
अपादान (पं.)	एआओ, एअत्तो	एएहिन्तो
संबंध (ष.)	एअस्स, से	एएसिं, एआण, एयाणं
अधिकरण (स.)	एअंसि, एयंसि, एयम्मि	एएसु, एएसुं

इम (इदम्) नपुं.

कारक	एकवचन	अनेकवचन
कर्ता (प्र.)	इमं, इदं, इणं	इमाइं, इमाणि
कर्म (द्वि.)	इमं, इदं, इणं	इमाइं, इमाणि
करण (तृ.)	इमेण, इमेणं, इमिणा, णेण	इमेहि, इमेहिं
संप्रदान (च./ष.)	इमस्स, अस्स, से	इमेसिं, एसिं
अपादान (पं.)	इमाओ, इमत्तो	इमेहिंतो
संबंध (ष.)	इमस्स, अस्स, से	इमेसिं, एसिं, इमाण, इमाणं
अधिकरण (स.)	इमंसि, अस्सिं	इमेसुं, इमेसु

अमु (अदस्) नपुं.

कारक	एकवचन	अनेकवचन
कर्ता (प्र.)	अह, अमुं	अमूइं, अमूइँ, अमूणि
कर्म (द्वि.)	अमुं	अमूइं, अमूइँ, अमूणि
करण (तृ.)	अमुणा	अमूहि, अमूहिं, अमूहिँ
संप्रदान (च./ष.)	अमुणो, अमुस्स	अमूण, अमूणं
अपादान (पं.)	अमुणो, अमुत्तो, अमूओ	अमुत्तो, अमूओ, अमूउ,

	अमूउ, अमूहिन्तो	अमूहिंतो, अमूसुंतो
संबंध (ष.)	अमुणो, अमुस्स	अमूण, अमूणं
अधिकरण (स.)	अयम्मि, इअम्मि, अमुम्मि	अमूसु, अमुसुं

('साहु' या उकारान्त पुल्लिंगी नामाप्रमाणे पुल्लिंगी 'अमु'ची रूपे होतात)

संबंधदर्शक सर्वनाम
ज (यद्) नपुं.

कारक	एकवचन	अनेकवचन
कर्ता (प्र.)	जं	जाइं, जाणि
कर्म (द्वि.)	जं	जाइं, जाणि
करण (तृ.)	जेण, जेणं	जेहिं, जेहि
संप्रदान (च./ष.)	जस्स	जेसिं, जाण, जाणं
अपादान (पं.)	जाओ, जत्तो, जा, जम्हा	जेहिंतो, जेसुंतो
संबंध (ष.)	जस्स	जेसिं, जाण, जाणं
अधिकरण (स.)	जंसि, जम्मि	जेसुं, जेसु

प्रश्नार्थक सर्वनाम
क (किं) न. पुं.

कारक	एकवचन	अनेकवचन
कर्ता (प्र.)	किं	काइं, काणि
कर्म (द्वि.)	किं	काइं, काणि
करण (तृ.)	केण, केणं	केहि, केहिं
संप्रदान (च./ष.)	कस्स	केसिं, काण, काणं
अपादान (पं.)	काओ, कत्तो, कम्हा	केहिंतो, कासुंतो, केसुंतो, काहिंतो
संबंध (ष.)	कस्स	केसिं, काण, काणं
अधिकरण (स.)	कंसि, कस्सिं, कम्मि	केसु, केसुं
	कत्थ, कहिं	

तृतीयपुरुषी सर्वनाम
स (तद्) तो, ती, ते
स (तद्) पुं.

कारक	एकवचन	अनेकवचन
कर्ता (प्र.)	सो, से, स	ते
कर्म (द्वि.)	तं	ते, ता
करण (तृ.)	तेण, तेणं	तेहि, तेहिं
संप्रदान (च./ष.)	तस्स	तेसिं, ताण, ताणं
अपादान (पं.)	ताओ, ता, तम्हा	तेहिंतो, ताहिंतो, तेसुंतो
संबंध (ष.)	तस्स	तेसिं, ताण, ताणं
अधिकरण (स.)	तंसि, तम्मि	तेसु, तेसुं

सा (तद्) स्त्री.

कारक	एकवचन	अनेकवचन
कर्ता (प्र.)	सा	ताओ, तीओ
कर्म (द्वि.)	तं	ताओ, तीओ
करण (तृ.)	ताए, तीए	ताहिं
संप्रदान (च./ष.)	ताए, तीए, तीसे	ताणं, ताण
अपादान (पं.)	ताओ	ताहिंतो, तासुंतो, ताओ
संबंध (ष.)	ताए, तीए, तीसे	ताणं, ताण
अधिकरण (स.)	तीए, तीसे	तासुं, तासु

स (तद्) नपुं.

कारक	एकवचन	अनेकवचन
कर्ता (प्र.)	तं	ताइं, ताणि
कर्म (द्वि.)	तं	ताइं, ताणि
करण (तृ.)	तेण, तेणं	तेहिं, तेहि
संप्रदान (च./ष.)	तस्स	तेसिं, ताणं, ताण
अपादान (पं.)	ताओ	तेहिंतो, तासुंतो, ताओ
संबंध (ष.)	तस्स	तेसिं, ताण, ताणं
अधिकरण (स.)	तंसि, तम्मि	तेसुं, तेसु

२) क्रियापदांची कर्मणी रूपे व प्रयोग

कर्मणी प्रयोगामध्ये धातूचे कर्मणी रूप वापरतात. सर्व वर्गातील धातूंना 'इज्ज' प्रत्यय लावून कर्मणी रूपे तयार करतात. मूळ धातूंना इज्ज प्रत्यय लागल्यावर तयार होणाऱ्या रूपाला 'कर्मणी अंग' म्हणतात.

उदा. पास + इज्ज = पासिज्ज गच्छ + इज्ज = गच्छिज्ज

गा + इज्ज = गाइज्ज णे + इज्ज = णेइज्ज हो + इज्ज = होइज्ज

ह्या कर्मणी अंगाला काळाचे किंवा अर्थाचे प्रत्यय लावतात. जसे - वर्तमानकाळी (वंदिज्जामि), भूतकाळी (वंदिज्जित्था), भविष्यकाळी (वंदिज्जिस्सामि), आज्ञार्थी (वंदिज्जामु), विध्यर्थी (वंदिज्जिज्जामि) अशी रूपे होतात.

सर्व कर्मणी अंगे अकारांत असल्यामुळे ती पहिल्या प्रकारातील 'पास' धातूप्रमाणे चालतात.

	पास – कर्मणी वर्तमानकाळ		**णे – कर्मणी वर्तमानकाळ**	
	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन
प्र.पु.	पासिज्जामि	पासिज्जामो	णेइज्जामि	णेइज्जामो
द्वि.पु.	पासिज्जसि	पासिज्जह	णेइज्जसि	णेइज्जह
तृ.पु.	पासिज्जइ	पासिज्जंति	णेइज्जइ	णेइज्जंति

महाराष्ट्री प्राकृतमध्ये काही कर्मणी अंगे (रूपे) संस्कृतमधून आली असून त्यांना सिद्ध रूपे म्हटले जाते. त्यांना अनियमित कर्मणी अंगे (रूपे) म्हणतात. उदा. –

कर – कीर, किज्ज (कीरइ / किज्जइ)	पा – पिज्ज (पिज्जइ)	दे – दिज्ज (दिज्जइ)
पास – पासिज्ज/दीस (पासिज्जइ/दीसइ)	णे – णिज्ज (णिज्जइ)	लह – लब्भ (लब्भइ)
सुण – सुव्व, सुम्म (सुव्वइ/सुम्मइ)	भण – भण्ण (भण्णइ)	जाण – णज्ज (णज्जइ)
हण – हम्म (हम्मइ)	तर – तीर (तीरइ)	वय – वुच्च (वुच्चइ)
बंध – बज्झ (बज्झइ)	मुंच – मुच्च (मुच्चइ)	खा – खज्ज (खज्जइ)
डह – डज्झ (डज्झइ)	णट्ट – णच्च (णच्चइ)	थुण – थुव्व (थुव्वइ)

२.१ प्रयोग विचार

मराठी व संस्कृतप्रमाणे महाराष्ट्री प्राकृतमध्ये तीन प्रयोग आहेत. – (१) कर्तरी, (२) कर्मणी व (३) भावे.

कर्तरी प्रयोग – या प्रयोगात कर्ता प्रथमेत, कर्म द्वितीयेत व क्रियापद कर्त्याप्रमाणे असते. वाक्यात कर्म असल्यास त्याला सकर्मक कर्तरी प्रयोग म्हणतात.

उदा. णरिंदो रज्जं पालेइ। **मेहा जलं वरिसंति।**
सीया रामं पेक्खइ। **चेडा भारं गेण्हंति।**
अहं विउलं धणं लहिस्सामि।

वाक्यात कर्म नसल्यास त्याला अकर्मक कर्तरी प्रयोग म्हणतात.

उदा. सा हसिऊण उवविसइ। णट्टियाओ णच्चंति। किंकरो गाढं पसुत्तो। चोरा आगच्छंति।

क्रियापद सकर्मक असून सुद्धा कर्म अध्याहृत असते त्याला 'अध्याहृत-कर्म कर्तरी प्रयोग' म्हणतात.

उदा. रामो भक्खइ। णिवो भणइ। रावणो पासइ।

कर्मणी प्रयोग – कर्मणी प्रयोगात कर्ता तृतीयेत, कर्म प्रथमेत व क्रियापद कर्माप्रमाणे असते.

उदा. णरिंदेण रज्जं पालिज्जइ। मए धणं लहिज्जिस्सइ। समणेण धम्मो सुणिज्जइ।

भावे प्रयोग – भावे प्रयोगात कर्ता तृतीयेत व क्रियापद नेहमी तृतीय पुरुषी एकवचनी असते. भावे प्रयोगाचा क्वचितच वापर केला जातो.

उदा. देवयाए हसिज्जइ। **चोरेहिं आगच्छिज्जइ।**

कर्म अध्याहृत असेल तर 'रामेण भक्खिज्जइ।' असे वरील प्रमाणेच बदल होतील.

प्रयोग खालीलप्रमाणे बदलता येतात.

सकर्मक कर्तरी	**कर्मणी**
समणो मोक्खं लहइ।	समणेण मोक्खो लब्भइ। (लहिज्जइ)
मेहा जलं वरिसंतु।	मेहेहिं जलं वरिसिज्जउ।
रावणो तवं करेइ।	रावणेण तवो कीरइ।
अहं मउडं देमि।	मए मउडो दिज्जइ।
अणगारो सच्चं जंपेज्जा।	अणगारेण सच्चं जंपिज्जिज्जा।
अध्याहृत-कर्म कर्तरी	**अध्याहृत-कर्म भावे**
रामो भक्खइ।	रामेण भक्खिज्जइ।
अमच्चा भणंति।	अमच्चेहिं भणिज्जंति।
णिवो जाणिस्सइ।	णिवेण जाणिज्जिस्सइ।

कर्मणी व भावे प्रयोगाचा कर्तरी प्रयोग करताना नियम उलट लावावेत (म्हणजेच कर्ता प्रथमेत, कर्म द्वितीयेत

व क्रियापद कर्त्याप्रमाणे करावे) मात्र कर्मणी प्रयोगात कर्मणी भूतकाळवाचक धातुसाधित विशेषण (कर्मणी भू.धा. वि.) अगर कर्मणी विध्यर्थक धातुसाधित विशेषण (कर्म.विध्य.धा.वि.) वापरले असल्यास त्याबद्दल अनुक्रमे कर्तरी भूतकाळवाचक धातुसाधित विशेषण (कर्त.भू.धा.वि.) व विध्यर्थ योजावे.

उदा. –

कर्मणी प्रयोग	कर्तरी प्रयोग
वग्घेण वाणरो हओ।	वग्घो वाणरं हयवंतो। (हणित्था)
सियालेण मओ हत्थी दिट्ठो।	सियालो मयं हत्थिं दिट्ठवंतो। (पासित्था)
समणेहिं धम्मो कहिअव्वो।	समणा धम्मं कहेज्जा।
णिवेण पआ पालिअव्वा।	णिवो पअं पालेज्जा।

कर्मणी अंगाचा उपयोग ज्यामध्ये झाला आहे. अशा काही गाथांचे उदाहरण

खंडिज्जइ विहिणा ससहरो वि सूरस्स होइ अत्थमणं ।
हा दिव्व–परिणइए **कवलिज्जइ** को ण कालेण ।।
मणहरवण्णं पि हु कण्णियार–कुसुमं ण एइ भमराली ।
रूवेण किं व **कीरइ** गुणेण छेया **हरिज्जंति** ।।
हद्धी ! कह ण **मरिज्जइ** मरालकीला विलासगोज्जाए ।
तवणलिणीए **खंडेइ** वायसो जत्थ अहरदलं ।।
णिद्दं च्चिय **वंदिज्जइ** किं **कीरइ** देवयाहिं अण्णाहिं ।
जीए पसाएण पिओ **दीसइ** दूरे वि णिवसंतो ।।
गुणसंगेण वि गुरुया जयम्मि सव्वत्थ होंति गारविया ।
ठाणभट्ठं भट्ठं **वंदिज्जइ** चंदणं, उयह ।।

२.२ धातुसाधिते

- **‘च्वि’रूप–**

अगोदर अस्तित्वात नसलेली एखादी गोष्ट ‘अस्तित्वात येणे’ किंवा ‘आणणे’ असा अर्थ असताना वाक्यात ‘च्वि’रूप वापरतात. तसेच जे नाही ते करणे किंवा तसे होणे असा अर्थ देखील या रूपांमधून व्यक्त होतो. नाम किंवा विशेषणे यांना कृ(कर) व भू/हू (भव/हव) या धातूंची रूपे जोडून ‘च्वि’रूप तयार केले जाते. त्याचप्रमाणे धातुसाधित विशेषण वापरूनही ‘च्वि’रूपे तयार केली जातात. उदा. –

वसीकरेमि – ‘कर’ ‘च्वि’रूप, वर्तमानकाळ प्रथम पुरुष एकवचन
वसीकरेइ – ‘कर’ ‘च्वि’रूप, वर्तमानकाळ तृतीय पुरुष एकवचन
विरलीहूआ – ‘भू–हू’‘च्वि’रूप, कर्मणी भूतकालवाचक धातुसाधित विशेषण
लक्खीकआ – ‘कर’ ‘च्वि’रूप, कर्मणी भूतकाळवाचक धातुसाधित विशेषण
किंकिरीकआ – ‘कर’ ‘च्वि’रूप, कर्मणी भूतकाळवाचक धातुसाधित विशेषण.

- **कर्मणी भूतकालवाचक धातुसाधित विशेषणे (कर्म.भू.धा.वि.)–**

कर्मणी भूतकालवाचक धातुसाधित विशेषणांद्वारे भूतकाळी अर्थ सांगितला जातो. विशेषण आणि क्रियापद अशा दोनही अर्थी ही विशेषणे वापरली जातात. महाराष्ट्री प्राकृत भाषेमध्ये भूतकालवाचक विशेषणांसाठी मुख्यत्वे **इअ/इय** हा प्रत्यय वापरला जातो. पण य आणि क्त=त हे प्रत्यय देखील वापरले जातात. शिवाय प्रयोजक भूतकालवाचक

विशेषणे देखील वापरलेली दिसून येतात. त्याची पुल्लिंगी रूपे पुढीलप्रमाणे –

१) इअ/इय – गम – गमिओ / गच्छिओ, हस – हसिओ, चिंत – चिंतिआ (ब.व.)
वल – वलिओ, वर – वरिओ, फुर – फुरिओ
णिवेस– णिवेसिओ, चल – चलिओ, कर – करिओ

२) संस्कृतमध्ये क्त प्रत्यय लागून कर्म.भू.धा.वि. होते. त्या रूपांना 'सिद्ध रूपे' म्हणतात. ही रूपे वर्णविकाराने जशीच्या तशी महाराष्ट्री प्राकृत मध्ये वापरली जातात.

जात: = जाओ/जातो, अवनत: = ओणओ/ओणतो, आगत: = आगओ
प्रणत: = पणओ, समागत: = समागओ, संजात: = संजाओ

३) क्त प्रत्ययाशिवाय संस्कृतमध्ये सिद्ध असणारी रूपे महाराष्ट्री प्राकृतमध्ये वर्णविकाराने येतात.

उक्तं = वुत्तं, प्रवृत्तः = पयट्टो, मृतं = मडं
कृतं = कडं, दृष्ट: = दिट्ठो, तुष्टा = तुट्ठा

४) प्रयोजक – हस – हसाविओ / हासिओ, कर – कराविओ /कारिओ
पढ – पढाविओ / पाढिओ, पास – पासाविओ

- **कर्तरी व कर्मणी वर्तमानकालवाचक धातुसाधित विशेषणे (कर्त/कर्म. व. का. धा. वि.)–**

एखादी क्रिया करत असताना अन्य क्रिया दाखवण्यासाठी व.का.धा. विशेषणांचा वापर केला जातो. त्यासाठी **अंत** व **माण** हे दोन प्रत्यय वापरले जातात. कर्तरी विशेषणे तयार करताना हे प्रत्यय प्रत्यक्ष धातूला लावले जातात. पण कर्मणी विशेषणे तयार करताना धातूचे प्रथम कर्मणी रूप तयार करून घ्यावे लागते. वर्तमानकालवाचक अर्थ या विशेषणाने सांगितला जातो. प्राकृत साहित्यात या विशेषणांचा भरपूर वापर केलेला दिसतो. विशेषणे कर्त्याच्या लिंग, वचन, विभक्तीप्रमाणे चालतात.

१) कर्तरी विशेषणे –

कीर – कीर + अंत – कीरंत = कीरंतो, पहर – पहर + अंत – पहरंत = पहरंतो
कील – कील + अंत – कीलंत = कीलंतो, पड – पड + अंत – पडंत = पडंतो
गच्छ – गच्छ + माण– गच्छमाण = गच्छमाणा, कह – कह + माण – कहमाण = कहमाणा
कड्ढ – कड्ढ + माण– कड्ढमाण = कड्ढमाणं, विहर – विहर + माण – विहरमाण = विहरमाणं

२) कर्मणी विशेषणे –

गा – गाइज्ज = गाइज्जंतो, ताड – ताडिज्ज = ताडिज्जंतो
पढ – पढिज्ज = पढिज्जंतो, हस – हसिज्ज = हसिज्जमाणा
कर = करिज्ज/कीर = करिज्जमाणा/कीरमाणा

- **कर्मणी विध्यर्थक धातुसाधित विशेषण –**

हे करावे, हे केले पाहिजे, हे करण्यास योग्य आहे असा अर्थ कर्म. विध्य. धा. विशेषणांमधून सांगितला जातो. संस्कृतमध्ये या विशेषणांसाठी य, तव्य आणि अनीय हे प्रत्यय वापरले जातात. महाराष्ट्री प्राकृतमध्ये णिज्ज, इयव्व/इअव्व आणि यव्व/अव्व हे प्रत्यय वापरले जातात. अकारांत धातूंना णिज्ज आणि इयव्व/इअव्व हे प्रत्यय लागतात. आ, ए व ओकारांत धातूंना यव्व/अव्व प्रत्यय लागतो. त्याची रूपे पुढीलप्रमाणे –

परि + हर + इयव्व = परिहरियव्व/परिहरिअव्व, दट्ठ + यव्व = दट्ठव्व

पूय + णिज्ज = पूयणिज्ज/पूअणिज्ज
ज्ञा = जा + इयव्व = जाणियव्व/जाणिअव्व
सिक्ख + आव + इयव्व = सिक्खावियव्व (प्रयोजक)
चिंत + इयव्व = चिंतियव्व/चिंतिअव्व
हो + यव्व = होयव्व/होअव्व
हस + आव + इयव्व = हसावियव्व

अभ्यास

१. मराठीत भाषांतर करा –

१) चंदो धवलिज्जइ पुण्णिमाए ।
२) ण णज्जइ भीसणे वणे किं हवइ।

२. प्रयोग ओळखून नाव लिहा –

१) एक्ककुसुमंसि बे तिण्णि गुणा ण लब्भंति।
२) जूए पराइया पंडवा वणं गच्छिंसु।
३) तओ रण्णा भणियं।

३. प्रयोग बदला –

१) महावीरो णिवेहिं वि वंदिज्जइ।
२) वग्घो सीहं दिट्ठवंतो।
३) चोरो वत्थाणि हरइ।
४) देवी आगच्छइ।

४. पुढील सुभाषितांचे मराठीत भाषांतर करा –

१) जंपिज्जइ पियवयणं किज्जइ विणओ, दिज्जइ दाणं।
परगुणगहणं किज्जइ आमूलमंतं वसीकरणं ।।
२) कोवि ण अब्भत्थिज्जइ, किज्जइ कस्स वि ण पत्थणाभंगो।
दिण्णं च ण जंपिज्जइ, जीविज्जइ जाव इहलोए।।
३) अभिहाणमभणंती वि हु होइ पयडो गुणेहिं सप्पुरिसो।
छिण्णो वि चंदणतरू किं ण कहिज्जइ परिमलेणं।।

५. पुढील वाक्यात गाळलेले शब्द भरा –

(कायव्वो, खमीयउ, दिज्जउ, थुव्वइ, कवलिज्जइ)

१) राया बंदिजणेण ....।
२) ण उण ..... पमाओ।
३) ..... को ण कालेण?
४) देव, मम एस अवराहो ......।
५) ताय, ... रज्जं महापउमस्स।

३) प्रयोजक विचार

एखादी क्रिया आपण स्वतः न करता, जेव्हा दुसऱ्याकडून करवून घेतो, त्यावेळी धातूचे प्रयोजक रूप वापरतात.

उदा. –

राया परिणेइ। (राजा विवाह करतो)

राया अभयकुमारं परिणावेइ। (राजा अभयकुमाराला लग्न करायला लावतो)

मराठीतही सामान्यतः 'वि' प्रत्यय लावून प्रयोजके बनवितात. उदा. करणे – करविणे, हसणे – हसविणे, रडणे–रडविणे. महाराष्ट्री प्राकृतमध्येसुद्धा मूळ धातूला प्रत्यय लावून प्रयोजक धातू तयार करतात.

३.१ प्रयोजकाचे प्रत्यय

१) अकारान्त धातूंना 'आवे' प्रत्यय लावतात.

उदा. पास - पास+आवे - पासावे = पासावेइ, कर - करावे = करावेइ, गच्छ - गच्छावे = गच्छावेइ.

२) आकारान्त धातूंना 'वे' प्रत्यय लावतात.

उदा. गा - गावे = गावेइ, ठा - ठावे = ठावेइ, ण्हा - ण्हावे = ण्हावेइ.

३) एकारान्त व ओकारान्त धातूंना 'आवे' हा प्रत्यय लागताना 'आ' चा 'या' होतो व 'यावे' असा प्रत्यय तयार होतो.

उदा. णे - णेयावे = णेयावेइ, बे - बेयाव = बेयावेइ, हो - होयावे = होयावेइ.

४) काही विशिष्ट धातूंना 'ए' प्रत्यय लावून व उपांत्य स्वर ऱ्हस्व असल्यास दीर्घ करून प्रयोजक बनवितात.

उदा. मर-मारे = मारेइ, कर-कारे = कारेइ, पड-पाडे = पाडेइ, लभ-लाभे = लाभेइ.

३.२ काही अनियमित प्रयोजके

ठा(स्था) ठावे, दक्ख(दृश्) दरिसे, दक्खावे, पव्वय(प्र+व्रज्) पव्वावे, भम(भ्रम) भमावे, विण्णव(वि+ज्ञा) विण्णवे, णास(नश्) णासे, णासवे.

प्रयोजके सुद्धा क्रियापदेच असल्यामुळे ती सर्व काळात चालतात व इतर धातुसाधित रूपेही तयार होतात.

सर्व प्रयोजक क्रियापदे एकारांत असल्यामुळे ती दुसऱ्या वर्गातील 'कर' धातूप्रमाणे चालतात.

उदा. पासावेमि, पासावेत्था, पासाविस्सइ, पासावेमु, पासावेज्जा, पासावेऊण, पासावेउं.

अभ्यास

१. अकारांत व एकारांत धातूंना प्रयोजकांचे जे प्रत्यय जोडले जातात ते सांगा.

२. प्रयोजक वाक्ये तयार करा.

१) णिवो हसइ।
२) किंकरो भारं णेइ।
३) माया भुंजइ।
४) पुरिसो कम्मं करेइ।
५) बालो पडइ।
६) पिआ हसइ।

३. भाषांतर करा.

१) अहं हिंसं ण करेमि, ण अ करावेमि।
२) कणयमंजरी पढमं जणअं भुंजावेइ।
३) तवस्सी ण छिंदे, ण छिंदावए, ण पए, ण पयावए। (पय-(पच्)शिजवणे)
४) समणा अदिण्णं ण गेण्हंति, परं ण गेण्हावेंति ।
५) माणवो हिंसगं मुसं च ण वएज्जा, ण अण्णं वयावेज्जा (मुसा - खोटे, वय - बोलणे)

४) तर-तम-भाव दर्शक विशेषणे

महाराष्ट्री प्राकृतमध्ये विशेषणांना **तर** किंवा **अर/यर** हे प्रत्यय लावले असता **तर** - भाव दर्शक विशेषण बनते; **तम** किंवा **अम/यम** हे प्रत्यय लावले असता **तम** - भावदर्शक विशेषण बनते. तर- भावदर्शक विशेषणाने 'हून, पेक्षा, अधिक' असा अर्थ होतो; तम- भावदर्शक विशेषणाने 'सर्वात अधिक' असा अर्थ होतो. **उदा. -**

विशेषण	तर-भावदर्शक	तम-भावदर्शक
कढिण (कठीण)	कढिणअर, कढिणयर, कढिणतर	कढिणअम, कढिणयम, कढिणतम
गोर (गौर)	गोरअर, गोरयर, गोरयतर	गोरअम, गोरयम, गोरतम

सामान्यतः दोन व्यक्ती किंवा वस्तू यांमध्ये तुलना करावयाची असल्यास **तर** हे भावदर्शक विशेषण वापरतात आणि ज्यापेक्षा जास्त असे सांगायचे त्याची पंचमी विभक्ती केली जाते. तसेच दोनपेक्षा अधिक व्यक्तींमध्ये श्रेष्ठता दाखविताना **तम** हे भावदर्शक विशेषण वापरतात. **तम** प्रत्ययान्त विशेषणे ही बहुधा षष्ठी किंवा सप्तमीच्या अनेकवचनांबरोबर वापरतात.

याच विशेषणांची महाराष्ट्री प्राकृतमध्ये काही संस्कृतप्रमाणे तयार झालेली रूपे दिसून येतात.

उदा. – जेट्ठ (ज्येष्ठ – सर्वात मोठा), सेयं (श्रेयस्–चांगले), सेट्ठ (श्रेष्ठ – सर्वोत्तम), कणीयस (कनीयस् – धाकटा), पाविट्ठ (पापिष्ठ – अत्यंत पापी)

अभ्यास

१. तर–तम–भाव याचा अर्थ सांगा.

२. पुढील विशेषणांची तर–तम–भावदर्शक रूपे तयार करा.

धवल, अहिअ, उत्तुंग, कसिण, कट्ठ, कणिट्ठ

३. भाषांतर करा.

१) कण्हेण भणिअं – 'मुंच, मुंच, मम सुट्ठयरं/सुट्ठअरं दुक्खं समुप्पज्जइ।'

२) जरकुमारेण चिंतिअं – 'अहो कट्ठं कट्ठयरं/कट्ठअरं' त्ति। 'कहमहं वसुदेवपुत्तो होऊण सयमेव कणीयसं भायरं विणासेहामि।'

५) उपसर्ग

उपसर्ग म्हणजे मूळची अव्यये. उपसर्ग धातूंच्या आधी जोडले जातात. नेहमी उपयोगात येणारे उपसर्ग त्यांच्या विशिष्ट अर्थासह खाली दिले आहेत.

अइ – (अति) – पलीकडे	अइक्कम – पलीकडे जाणे
अणु – (अनु) – मागाहून	अणुसर – मागाहून जाणे
अव – (अप) – बाजूला	अवसर – बाजूला होणे
अव – (अव) – खाली	अवअर, अवतर – खाली उतरणे
वि – (वि) – विशिष्ट	विकुव्व – विशिष्ट प्रकारे करणे, बनविणे
णिस – (निस्) – बाहेर	णिक्खम – बाहेर जाणे
सम – (सम्) – समान	संगम – समान जाणे = एकत्र येणे

उपसर्गांमुळे धातूंचा मूळ अर्थ बदलतो पण काही वेळा अर्थात फारसा फरक पडत नाही.

उदा. विसइ – पविसइ चिंतेइ – विचिंतेइ

काही वेळा मूळ अर्थावर जास्त जोर येतो.

उदा.

णास – नाश पावणे	विणास – पूर्ण नाश करणे
लस – चमकणे	विलस – विशेष चमकणे
राअ, राय – शोभणे	विराअ, विराय – विशेष शोभणे
चअ, चय – त्याग करणे	परिच्चअ, परिच्चय – सर्वस्वी त्याग करणे

मूळ अर्थात बदल होणारी काही उदाहरणे –

तर – तरणे
हर – नेणे
वाहर – बोलणे
विहर – क्रीडा करणे
संहर – नाश करणे
भव – असणे, होणे
गच्छ – जाणे
अणुगच्छ – पाठोपाठ जाणे
अवगच्छ – जाणणे
उवागच्छ – जवळ जाणे
संगच्छ – मिळून एकत्र जाणे
पडिगच्छ – परत जाणे
वितर – देणे
आहर – आणणे
पहर – प्रहार करणे
परिहर – टाळणे
उवसंहर – आवरणे
अणुहव – अनुभवणे
आगच्छ – येणे
अभिगच्छ/अहिगच्छ – सामोरे जाणे
णिग्गच्छ – बाहेर जाणे
अइगच्छ – पलीकडे जाणे
अहिगच्छ – मिळविणे
पच्चुत्तर – प्रत्युत्तर देणे

अभ्यास

माध्यम भाषेत भाषांतर करा.

१) चंपाणअरीए एगो माणुसो परिवसइ।
२) तस्स पुत्तो छगलअं आणेउं गओ।
३) राया वणे जं लहइ तं आहारेइ।
४) भो णागसेट्ठि, उवसंहरसु संरंभं, खमसु अवराहं।
५) कत्तारं एव अणुजाइ कम्मं।
६) घरमहत्तरेहिं भणिअं – 'छगलओ उवणिज्जउ'।
७) बलदेवो तत्थ सिग्घं समागओ।
८) णायदत्तो भारिआविरहेण विलवइ।
९) अम्मो णिव्विण्णकामो हं पडिणिक्खमामि।

(पडिणिक्खम – दीक्षा घेणे, णिव्विण्ण – त्रस्त, अणुजाइ – अनुसरणे, उवसंहर – आवरणे, संरंभ – क्रोध)

६) समास-विवेचन

दंदो दिगुरवि चाहं, मग्गेहे णिच्चमव्वईभावो ।
तप्पुरिस-कम्म-धारे, होज्जं एण बहुव्वीही ।।

दोन किंवा अधिक शब्दांतील विभक्ति-प्रत्यय गाळून तयार झालेल्या शब्दांना **समास** म्हणतात. अर्थातच समासात कमीत कमी दोन शब्द असतात. समासातील शब्दांना **पदे** म्हणतात. प्रत्येक पदाचा अर्थ स्वतंत्र असला तरी संपूर्ण सामासिक शब्दाचा अर्थ वेगळा असतो. विभक्ती प्रत्यय लावून किंवा स्वत:चे शब्द वापरून समासातील दोन पदांमधील संबंध दाखविण्याच्या क्रियेला **विग्रह करणे** असे म्हणतात. सामान्यतः नाम, विशेषण, क्रियाविशेषण, अव्यय आणि शब्दयोगी अव्यय या जातीचे शब्द समासांची पदे होऊ शकतात. समासाच्या पदांचे **प्रधानपद (मुख्यपद)** व **गौणपद** असे दोन भेद असतात. यावरून समासांचे चार मुख्य प्रकार होतात.

१) दोन्ही पदे प्रधान म्हणजेच उभयपदप्रधान – दंद (द्वन्द्व)
२) पूर्व पद गौण व उत्तर पद प्रधान – तप्पुरिस (तत्पुरुष)
३) दोन्ही पदे गौण व तिसराच एखादा अर्थ प्रधान – बहुव्वीही (बहुव्रीही)
४) पूर्व पद प्रधान, उत्तर पद गौण व सामासिक शब्द अव्यय – अव्वईभाव (अव्ययीभाव)
(पूर्व-प्रथम येणारे, उत्तर-नंतर येणारे)

१) दंद (द्वंद्व) – (उभय पद प्रधान) –

दोन किंवा अधिक समान महत्त्वाची नामे एकत्र येऊन जो एक सामासिक शब्द तयार होतो, त्यास **द्वंद्व** असे म्हणतात. तो शब्द अनेकवचनी असून अंत्य पदाचे लिंग हेच जर संपूर्ण सामासिक शब्दाचे लिंग असेल तर त्याला **इतरेतर द्वंद्व** असे म्हणतात.

उदा. – बंभविण्हुमहेसा – बंभो अ विण्हू अ महेसो अ। (पुल्लिंगी)
जीवाजीवा – जीवा अ अजीवा अ। (पुल्लिंगी)
णरणारीओ – णरा अ णारीओ अ। (स्त्रीलिंगी)

समासातील प्रत्येक पदाला महत्त्व न देता त्या पदापासून तयार होणाऱ्या समूहाला जेव्हा महत्त्व दिलेले असते, तेव्हा त्या समासास **समाहारद्वंद्व** असे म्हणतात. समासाचा विग्रह करताना **'एआणं/एयाणं समाहारो'** असे सांगण्याची पद्धत आहे. समाहार द्वंद्व समास नेहमी नपुंसकलिंगी एकवचनात असतो.

उदा. – अण्णपाणं – अण्णं च पाणं च एआणं समाहारो ।
मंससोणियं – मंसं च सोणियं च एआणं समाहारो ।

दोन किंवा अधिक विशेषणे एकत्र येऊन झालेल्या समासास **द्वंद्व** म्हणतात.

उदा. – उच्चणीअं – उच्चं च णीअं च,
कल्लाणपावगं – कल्लाणं वा पावगं वा

काही द्वंद्व समासांचा विग्रह करताना 'वा' हे विकल्प सांगणारे उभयान्वयी अव्यय वापरले जाते.

उदा. – जयाजए – जओ वा अजओ वा।
लाभालाभे – लाभे वा अलाभे वा।

२) तप्पुरिस (तत्पुरुष) – (उत्तर-पद-प्रधान) –

तप्पुरिस समासाचे सात पोटभेद आहेत.

अ) विभत्ति-तप्पुरिस

यामध्ये दुसरे (उत्तर) पद मुख्य असते. पहिल्या पदाची योग्य ती विभक्ती वापरून त्या विभक्तिप्रमाणे विग्रह करून समासाचा अर्थ सांगितला जातो. दुसऱ्या पदाचे जे लिंग असते, तेच सर्व समासाचे लिंग बनते. ज्या विभक्तीने दोन पदांमधील संबंध दर्शविला जातो त्या विभक्तीचे नाव त्या समासास दिले जाते. प्रथमा व संबोधन सोडून इतर सर्व विभक्ती हा संबंध दर्शवितात.

उदा.	बिइया (द्वितीया) त. – आसारूढो – आसं आरूढो।	विरागसमावण्णो – विरागं समावण्णो।
	तइया (तृतीया) त. – विणयसंपण्णो – विणएण संपण्णो।	सुरवंदिओ – सुरेहिं वंदिओ।
	पंचमी त. – चोरभयं – चोराओ भयं।	संसारमुक्को – संसाराओ मुक्को
	छट्ठी (चतुर्थी/षष्ठी) त. – रुक्खमूले – रुक्खस्स मूले।	भोयणकालो – भोयणस्स कालो।
	सत्तमी (सप्तमी) त. – वणवासो – वणे वासो।	जुज्झणिउणो – जुज्झे णिउणो।

ब) कम्मधारय (कर्मधारय)

तत्पुरुष समासातील पूर्वपद आणि उत्तरपद एकाच विभक्तीत (प्रथमेत) असतील तर त्या समासाला **कर्मधारय** असे म्हणतात. कर्मधारय समासातील पदे सात प्रकारची असतात.

उदा.

पहिले पद	दुसरे पद	उदाहरण
विशेषण	विशेष्य	सीओदगं – सीअं उदगं।
		सुहकम्माइं – सुहाइं कम्माइं।
विशेष्य	विशेषण	पुरिसोत्तमो – उत्तमो पुरिसो।
		धम्माणुत्तरं – अणुत्तरं धम्मं।
विशेष्य	विशेषण	हिमधवलं – हिमं इव धवलं।
(विशेषणाला नामाची उपमा)		समुद्दगंभीरो – समुद्दो इव गंभीरो।
विशेषण	विशेषण	सीउण्हं – सीअं च उण्हं च।
		भुक्खिअतिसिआ– भुक्खिआ अ तिसिआ अ।
नाम	नाम	वडरुक्खो – वडो रुक्खो।
		अहिंसाधम्मो – अहिंसा एव धम्मो।
अव्यय (उपसर्ग)	नाम	सुगुरू – साहू गुरू।
		दुज्जणो – दुट्ठो जणो।
उपमेय	उपमान	चरणकमलं – चरणं कमलं इव।
		मुहचंदो – मुहं चंदो इव।

क) नञ् तप्पुरिस (नञ् तत्पुरुष) –

ज्या तत्पुरुष समासातील प्रथम पद नकारार्थी असते त्याला **नञ् तत्पुरुष** असे म्हणतात. समासातील उत्तरपदाचे पहिले अक्षर स्वर असेल तर **'अण'** आणि उत्तरपदाचे पहिले अक्षर व्यंजन असेल तर **'अ'** ही नकारार्थी पूर्वपदे दिसतात.

उदा. अणलसो – ण अलसो ।   अकज्जं – ण कज्जं।

ड) उववय तप्पुरिस (उपपद तत्पुरुष) –

ज्या तत्पुरुष समासातील उत्तरपद हे क्रियापदाचे रूप असते त्या समासाला **उपपद तत्पुरुष** समास म्हणतात. हे क्रियापदाचे अवशिष्ट रूप स्वतंत्रपणे वाक्यात उपयोगात आणता येत नाही. समासाचा विग्रह करताना क्रियापदाच्या रूपापुढे 'त्ति' हे अव्यय जोडतात.

उदा. कुंभआरो – कुंभं करेइ त्ति।   सुहदो – सुहं देइ त्ति।

इ) दिगु (द्विगु) –

कर्मधारय समासातील प्रथम पद जर संख्याविशेषण असेल तर त्या समासाला **द्विगु** असे म्हणतात. द्विगु समास नेहमी एकवचनी असतो आणि या समासाने समूहाचे ज्ञान करून दिले जाते.

उदा. तिहुयणं – तिण्हं भुवणाणं समाहारो।   दोमासं – दोण्हं मासाणं समाहारो।

फ) अलुय-तप्पुरिस (अलुक् तत्पुरुष) –

खरेतर समास होताना दोन पदांमधील विभक्ति-प्रत्ययांचा लोप झाला पाहिजे. परंतु काही तत्पुरुष समासातील पहिल्या पदाचे विभक्ति-प्रत्यय सामासिक शब्दातही राहिलेले आढळतात. त्यास **अलुक्** (लोप न होणे) **तत्पुरुष** असे म्हणतात. काही समासातील उत्तरपद एखादे कृदन्त (क्रियापदाचे रूप) असते.

उदा. अंतेवासी – अंते वसइ।   खेयरो – खे चरइ।

ग) मज्झमपयलोवी (मध्यमपदलोपी) –

समासात असणाऱ्या दोन पदांमधील संबंध जोडणारे एक पद संपूर्णच गाळलेले असते. ते पद घेतल्याखेरीज समासाचा विग्रहच होऊ शकत नाही. अशा समासास मध्यमपदलोपी समास असे म्हणतात. ह्या समासातील पहिले पद

सामासिक असून त्या सामासिक पदाचे मध्यमपद लुप्त असते. लुप्तपद हे विशेषण असते.

उदा. चिंतामणी – चिंतापूरओ मणी। गंधतेल्लं – गंधमिस्सियं तेल्लं।

३) बहुव्वीही (बहुव्रीही) – (अन्य पद प्रधान) –

समासातील दोन्ही पदे गौण असून त्यातील पदाच्या अर्थाहून वेगळा असा तिसराच एखादा अर्थ सूचित केला जात असेल व संपूर्ण समास जर त्या शब्दाचे विशेषण असेल तर त्याला **बहुव्रीही समास** म्हणतात. बहुव्रीही समासात विशेषणे व नामे येतात. त्यांचा विग्रह करताना 'ज' या संबंधवाचक सर्वनामाचा उपयोग करावा लागतो व त्याच्या विभक्तीवरून बहुव्रीही समासाला त्या विभक्तीचे नाव दिले जाते. विभक्ति-तत्पुरुषाप्रमाणे विभक्ति-बहुव्रीहीचेही पांच प्रकार आहेत.

अ) विभत्ति बहुव्वीही (विभक्ति – बहुव्रीही) –

१. द्वितीया बहुव्रीही – पत्तगंगो – पत्तो गंगं जो सो।
२. तृतीया बहुव्रीही – जिइंदिओ – जियाणि इंदियाणि जेण सो।
३. पंचमी बहुव्रीही – गयराओ – गओ राओ जाओ सो।
४. चतुर्थी/षष्ठी बहुव्रीही – मंदपुण्णो – मंदं पुण्णं जस्स सो।
५. सप्तमी बहुव्रीही – बहुधणं – बहुं धणं जम्मि तं।

ब) नञ् बहुव्वीही (नञ् बहुव्रीही) –

ह्या बहुव्रीही समासांतील पहिले पद नकारात्मक असते. नञ् तत्पुरुषाहून हा समास भिन्न आहे कारण नञ् बहुव्रीहीला स्वतंत्र अर्थ नसून ते अन्य शब्दाचे विशेषण असते.

उदा. अणंतो – अविज्जमाणो अंतो जस्स सो। अपुत्तो – ण पुत्तो जस्स सो।

क) सह बहुव्वीही (सह बहुव्रीही) –

यातील पहिले पद 'स' किंवा 'सह' तर दुसरे पद नाम असते.

उदा. सवयंसो – वयंसेहिं सह। सहोयरो – समाणं उयरं जस्स सो।

४) अव्वईभाव – (अव्ययीभाव) – (पूर्व-पद-प्रधान) –

अव्ययीभाव समासातील पहिले पद बहुधा एखादे अव्यय असून उत्तर पद नाम असते. संपूर्ण समास हा अव्यय असून अंत्यस्वर दीर्घ असल्यास तो ऱ्हस्व होऊन त्यावर अनुस्वार असतो.

उदा. – अणुरूवं – रूवं अणु। (योग्यताअर्थाने) जावज्जीवं – जाव जीवो ताव।
अणुदिणं – दिणे दिणे। (क्रमशः या अर्थाने) जहासुहं – जहा सुहं तहा।
पइवरिसं – वरिसे वरिसे। पइदिणं – दिणे दिणे।

अभ्यास

१. पुढील समास ओळखा –

१) जिणसासणं – जिणस्स सासणं।
२) चंदवअणा – चंदो इव वअणं जीसे सा।
३) दसदिणं – दसण्हं दिणाणं समाहारो।
४) अदीणो – ण दीणो ।
५) पाणिपायं – पाणिणो (पाणीओ) अ पाया अ।
६) देवदाणवा – देवा अ दाणवा अ।
७) वणयरो – वणे चरइ।
८) बंधमुक्को – बंधाओ मुक्को।
९) सहभिच्चो – भिच्चेण सह।
१०) णिद्दओ – णिग्गआ दया जाओ सो।

७) अव्यय

ज्या शब्दाच्या रूपांमध्ये काहीही बदल होत नाही त्याला **अव्यय** असे म्हणतात. जसा शब्द आहे तसाच अव्ययाचा वाक्यामध्ये प्रयोग केला जातो. अव्ययाला कोणतेही वचन अथवा विभक्ती लागत नाही. **काही अव्यये पुढीलप्रमाणे –** तं, आम, णवि, मिव, पिव, विव, व्व, व, विय, इव, जेण-तेण, णइ, चेअ, चिअ, च्चिअ, णवर, णवरि, अलाहि, अण, णाइं, माइं, हद्धि, वेव्व, मामि, हला-हले, हुं, हु-खु, थू, रे, अरे, ओ, अव्वो, अइ, वणे, मणे, अम्मो, अप्पणो, पाडिक्कं, पाडिएक्कं, उअ, इहरा, दर, इ, जे, र, पि, वि, अवि.

ह्या अव्ययांचे नियम पुढीलप्रमाणे –

१) **'तं'** हे अव्यय वाक्याच्या सुरुवातीला वापरले जाते. उदा. – तं तिअसबंदिमोक्खं ।

२) **'आम'** हे अव्यय 'स्वीकारणे, मान्य करणे, ठीक आहे' या अर्थाने वापरले जाते. उदा. – आम अहं भोअणं रंधेमि।

३) **'णवि'** हे अव्यय 'विपरीत' या अर्थाने वापरले जाते. उदा. – णवि हा वणे ।

४) **'मिव, पिव, विव, व्व, व, विअ, इव'** ही अव्यये उपमा दाखवण्यासाठी वापरली जातात. उदा. – कुमुअं मिव, चंदणं पिव, हंसो विव, सायरो व्व, खीरोओ व, कमलं विअ, भमरं इव.

५) **'जेण-तेण'** ही अव्यये लक्षण (अवस्था) दर्शवण्यासाठी वापरली जातात. उदा. – भमररुअं जेण कमलवणं। भमररुअं तेण कमलवणं।

६) **'णइ, चेअ / च्चेअ, चिअ / च्चिअ'** ही चार अव्यये 'निश्चय' या अर्थाने वापरली जातात. उदा. – गइए णइ, जं चेअ मउलणं लोअणाणं, अणुबद्धं तं चिअ कामिणी, ते च्चिअ धण्णा, ते च्चेअ सप्पुरिसा।

७) **'णवर'** हे अव्यय 'केवळ, मात्र, फक्त' या अर्थाने वापरले जाते. उदा. – णवर पिआइं चिअ णिव्वडंति।

७) **'णवरि'** हे अव्यय 'नंतर' या अर्थाने वापरले जाते. उदा. – णवरि अ से रहुवइणा ।

८) **'अलाहि'** हे अव्यय पुरे, या अर्थाने वापरले जाते. उदा. – अलाहि किं वाइएण लेहेण ?

९) **'अण, णाइं व माइं'** हे निषेध किंवा नाही या अर्थाने वापरले जातात. उदा. – अण चिंतिअममुणंती । णाइं करेमि रोसं । माइं काहीअ रोसं ।

१०) **'हद्धि, हद्धी'** हे अव्यय 'खेद किंवा मनस्ताप' या अर्थाने वापरले जाते. उदा.– हद्धि! हद्धी! इद्धि ।

११) **'वेव्व, वेव्वे'** ही अव्यये 'आमंत्रण' या अर्थी वापरली जातात. उदा.वेव्व माले। वेव्वे सउंदले वहसि पाणिअं।

१२) **'मामि, हला, हले, सहि'** ही अव्यये मैत्रिणीला बोलावण्यासाठी वापरली जातात. उदा. मामि, सरिसक्खाणंपि। पणवह माणस्स हला । हले हयासस्स । सहि, एरिसिच्चिअ गइ ।

१३) **'हुं'** हे अव्यय दान, चौकशी व निवारण या अर्थी वापरले जाते. उदा. – हुं (दानार्थे) गिण्ह अप्पणो च्चिअ। हुं (चौकशी) साहसु सब्भावं । हुं (निवारण) णिल्लज्ज समोसर ।

१४) **'हु-खु'** ही अव्यये निश्चय, वितर्क, शक्यता व विस्मय / आश्चर्य अशा अर्थाने वापरली जातात. उदा. – निश्चय – तं पि हु अच्छिण्णसिरि । वितर्क – ण हु णवरं संगहिया । एअं खु हसइ । संशय – जलहरो खु धूमवडलो खु । शक्यता – तरिउं ण हु णवर इमं । विस्मय/आश्चर्य – को खु एसो सहस्ससिरो ।

१५) **'थू'** अव्ययाचा 'निंदा' या अर्थाने वापर केला जातो. उदा. – थू णिल्लज्जो लोओ ।

१६) **'रे, अरे'** ही अव्यये संभाषण सुरू करण्यासाठी वापरली जातात. उदा. – रे/अरे हिअअ मडह सरिआ। अरे मं समं मा करेसु उवहासं ।

१७) **'अव्वो'** हे अव्यय 'सूचना, दु:ख, संभाषण, खेद, अपराध, विस्मय, आनंद, आदर, भय, विषाद, पश्चात्ताप' या अर्थाने वापरले जाते. उदा. – अव्वो (सूचना) दुक्करकारय ।

१८) **'अइ'** हे अव्यय लक्ष वेधून घेण्यासाठी वापरले जाते. उदा. – अइ दिअर ! किं ण पेच्छसि ?
१९) **'अम्मो'** हे अव्यय 'आश्चर्य' या अर्थाने वापरले जाते. उदा. – अम्मो कह पारिज्जइ ?
२०) **'अप्पणो'** हे अव्यय 'स्वत:' या अर्थाने क्वचित वापरले जाते. उदा. – विसयं विअसंति अप्पणो कमलसरा।
२१) **'पाडिक्कं, पाडिएक्कं, पत्तेयं'** ही अव्यये 'प्रत्येक' अशा अर्थाने वापरले जातात.
२२) **'उअ'** हे अव्यय 'पहा' या अर्थाने कधीतरी वापरले जाते. उदा. – उअ लोआ गच्छंति ।
२३) **'इहरा'** हे अव्यय 'अन्यथा' या अर्थाने वापरले जाते. उदा. – इहरा णिसामण्णेहिं ।
२४) **'दर'** हे अव्यय 'अर्ध व अल्प' या अर्थाने वापरले जाते. उदा. – दर विअसिअं ।
२५) **'इ, जे, र'** ही तीन अव्यये 'पादपूरणासाठी' वापरली जातात.
२६) **'पि, वि, अवि, अपि'** ही अव्यये 'सुद्धा' या अर्थाने वापरले जातात.

८) संख्याविशेषणे

आपण गेल्या वर्षी १ – ३० पर्यंत संख्या पाहिल्या आहेत. आता या वर्षी आपण त्यापुढील संख्या पाहूया.

३१ एयतीस, एअतीस	५६ छवण्ण, छप्पण्ण	८० असीइ
३२ बत्तीस	५७ सत्तावण्ण	८१ एगासीइ, एकासीइ
३३ तेत्तीस	५८ अट्ठावण्ण	८२ बासीइ, बाईसी
३४ चोत्तीस, चउतीस	५९ एगूणसट्ठि	८३ तेसीइ, तेयासी
३५ पणतीस	६० सट्ठि	८४ चोरासी, चउरासीइ
३६ छत्तीस	६१ एगट्ठि, एगसट्ठि	८५ पंचासीइ
३७ सत्ततीस	६२ बासट्ठि, बावट्ठि	८६ छलसीइ
३८ अट्ठतीस	६३ तेसट्ठि, तेवट्ठि	८७ सत्तासीइ
३९ एगूणचत्तालीस	६४ चउसट्ठि, चउवट्ठि	८८ अट्ठासीइ
४० चत्तालीस	६५ पणसट्ठि, पण्णट्ठि	८९ एगूणणउइ
४१ एगचत्तालीस, एकचत्तालीस	६६ छावट्ठि, छासट्ठि	९० णउइ
४२ बायालीस	६७ सत्तवट्ठि, सत्तसट्ठि	९१ एक्कणउइ
४३ तेयालीस	६८ अट्ठसट्ठि, अढसट्ठि	९२ बाणउइ, बेणउइ
४४ चोयालीस	६९ एगूणसत्तरि, अउणसत्तरि	९४ चउणउइ
४५ पणयालीस, पणयाल	७० सत्तरि	९५ पंचणउइ
४६ छायालीस	७१ एक्कसत्तरि, एगसत्तरि	९६ छण्णउइ
४७ सीयालीस, सत्तचत्तालीस	७२ बावत्तरि	९७ सत्तणउइ
४८ अट्ठयालीस	७३ तेवत्तरि	९८ अट्ठाणउइ, अट्ठणउइ
४९ एगूणपण्णास, एगूणपण्ण, अउणापण्ण	७४ चोवत्तरि	९९ णवणउइ
५० पण्णास	७५ पंचहत्तरि, पण्णत्तरि	१०० सय, सअअ
५१ एक्कावण्ण, एगावण्ण	७६ छावत्तरि	१००० सहस्स, सहस्सी
५२ बावण्ण	७७ सत्तहत्तरि	१०००० अयुत
५३ तेवण्ण	७८ अट्ठहत्तरि	१००००० सयसहस्स, सयसहस्सी, लक्ख
५४ चउवण्ण	७९ एगूणासीइ	१०००००० कोडी
५५ पणवण्ण		

अकरा ते नव्याण्णवपर्यंत जे सामासिक संख्यावाचक शब्द तयार होतात, त्यासंबंधी खालीलप्रमाणे सर्वसाधारण नियम सांगता येतील :

१) दो चा दु किंवा बे किंवा बा होतो. जसे - दुवालस, बावण्ण, बेणउइ इत्यादी

२) ति चा ते होतो. जसे - तेरस, तेवीस, तेत्तीस इत्यादी

३) चउ चा चो होऊन पुढील व्यंजनाचे द्वित्व होते. जसे - चोद्दस, चोत्तीस इत्यादी

४) पंच चे पण किंवा पण्ण होते. जसे - पण्णरस, पणवीस इत्यादी

५) छ च्या पुढे स्वर आल्यास छ चे छल होते व व्यंजन आल्यास त्याचे द्वित्व होते. जसे - छलसीइ, छव्वीस इ.

६) सत्त तसाच राहतो. जसे - सत्तरस, सत्ततीस

७) अट्ठ चे अट्ठा होते किंवा अट्ठ तसाच राहतो. उदा. अट्ठारस, अट्ठावीस, अट्ठतीस, अट्ठचत्तालीस

८) णव तसाच राहतो. णवणउइ वगैरे.

काही संख्यावाचक शब्द संस्कृतप्रमाणे एकोण किंवा अउण प्रत्यय लावून तयार होतात.

एक या गणनावाचक विशेषणाची तिन्ही लिंगी रूपे स्वतंत्र होतात. दो, ति, चउ ही तिन्ही विशेषणे स्वतंत्रपणे चालतात. परंतु त्यांची रूपे तिन्ही लिंगी एकच असतात.

पाचपासून अठरापर्यंतची गणनावाचके पंचप्रमाणे चालतात व सर्व लिंगी त्यांची रूपे एकच असतात. मात्र एकोणीस पासून अठ्ठेचालीस पर्यंतची गणनावाचके पुल्लिंगी व नपुंसकलिंगी, इकारान्त अकारान्त व स्त्रीलिंगी आकारान्त नामाप्रमाणे चालतात.

एकोणपन्नास ते नव्याण्णव पर्यंतची गणनावाचके प्रथमेत व द्वितीयेत, नपुंसकलिंगी इकारान्त नामाप्रमाणे व इतर विभक्त्यांमध्ये ईकारांत नामाप्रमाणे चालतात.

लिंगाप्रमाणेच वचनाबाबतही गणनावाचकात एकवाक्यता नाही. एकवचन, अनेकवचन याचा शब्दशः अर्थ घेतल्यास 'एअ'/एक'/'एग' हे एकच गणनावाचक एकवचनी व त्याव्यतिरिक्त सर्व अनेकवचनी असावयास हवी. परंतु तसे होत नाही.

'एअ'/एक'/'एग' हे एकवचनी चालते.

दोन ते अठरापर्यंतची गणनावाचके जरी अनेकवचनी विशेष्यांची विशेषणे असली तरी त्यांची रूपे मात्र एकवचनीच असतात.

एकोणपन्नास ते अठ्ठावन्न पर्यंतची गणनावाचके अनेकवचनी चालतात.

एकोणसाठ (एकूणसट्ठि/एगूणसट्ठि/एऊणसट्ठि) ते नव्याण्णव पर्यंतची सर्व गणनावाचके अनेकवचनी विशेष्य असले तरी फक्त एकवचनी चालतात.

शंभरापासून कोटी पर्यंतची गणनावाचके अंत्यस्वरानुसार निरनिराळ्या प्रकारे उभयवचनी चालतात.

पटवाचक :

संख्यावाचकांना **खुत्तो, हा, सो,** हे प्रत्यय लावून पटवाचके होतात. उदा. दुखुत्तो (दोनदा), तिखुत्तो (तीनदा), अट्ठखुत्तो (आठदा/आठवेळा), चउहा (चारवेळा), सयसो (शंभर वेळा), सहस्ससो (हजार वेळा). मात्र एकदा या अर्थाचे सइं असे रूप होते.

आवृत्तीवाचक :

संख्यावाचकांना 'विह' प्रत्यय लावला म्हणजे आवृत्तीवाचके तयार होतात. काही वेळा 'हा' प्रत्यय लागतो. उदा. एअविह/एकविह/एगविह, दुविह, तिविह, चउविह, अट्ठहा, सयहा, सहस्सहा.

अपूर्णांकात्मक :

जो अपूर्णांक हवा असेल त्याच्या पुढील पूर्णांकाच्या पूर्वी अपूर्णांकात्मक शब्द जोडला म्हणजे अपूर्णांकात्मक विशेषण तयार होते. उदा. अद्धट्ठम (साडेसात), अद्धपंचम (साडेचार), अद्धबारस (साडे अकरा) इ. मराठीमध्ये अपूर्णांकवाचक शब्द आधी येतो. परंतु पुढील पूर्णांक न घेता मागील पूर्णांक घेतला जातो. उदा. साडेआठ म्हणजे ८ + १/२, परंतु महाराष्ट्री प्राकृतात अद्धट्ठम मराठीत साडेआठ, पण याचा अर्थ ८ अधिक अर्धा =८ - १/२ तर महाराष्ट्री प्राकृतात ८ वजा अर्धा = म्हणजे ८ - १/२ = ७-१/२. काही वेळा अपूर्णांकवाचक शब्द नंतरही येतो. उदा. दिड्ढ, दिअड्ढ = १-१/२.

उदाहरणार्थ खालील गाथांमध्ये जैनधर्मविषयक काही कल्पना व्यक्त करणारी पदे आली आहेत. या उदाहरणातून आपणास संख्याविशेषण व विशेष्याची लिंग, वचन व विभक्ती एकच असते हे कळते.

एगा सत्ता दुविहो णओ य कालत्तयं गइचउक्कं।
पंचेव अत्थिकाया दव्वछक्कं च सत्त-णया।।
अट्ठेव य कम्माइं णव-तत्ताइं दसविहो धम्मो।
एगारस-पडिमाओ बारस-वयाइं गिहीणं च।।
वरगामाण सहस्सं सयं गइंदाणं विउलभंडारं।
पाइक्काणं लक्खं तुरयाणं दससहस्साइं।।

सत्ता – (सत् तत्त्व) – आत्म्याचे अस्तित्व.

णअ/णय – कोणत्याही वस्तूचे ती वस्तू जाणून घेणाऱ्यास होणारे अंशात्मक ज्ञान.
त्याचे मुख्य प्रकार दोन : (१) द्रव्यार्थिक नय, (२) पर्यायार्थिक नय.

कालत्तय – तीन काळ : (१) वर्तमानकाळ, (२) भूतकाळ, (३) भविष्यकाळ.

गइचउक्कं – आत्म्यास त्याच्या कर्मानुसार प्राप्त होणाऱ्या चार प्रकारच्या स्थिती किंवा गती : (१) नरकगती, (२) तिर्यक् (पशुपक्ष्याची) गती, (३) मनुष्यगती, (४) देवगती.

अत्थिकाय – विश्व व्यापून राहणाऱ्या पाच प्रकारच्या गोष्टी : (१) जीव, (२) अजीव, (३) धर्म, (४) अधर्म, (५) आकाश.

दव्वछक्कं – सहा प्रकारची द्रव्ये : (१) जीव, (२) अजीव, (३) धर्म, (४) अधर्म, (५) आकाश आणि (६) काल.

सत्तणय – नयाचे सात उपप्रकार : (१) नैगम, (२) संग्रह, (३) व्यवहार, (४) ऋजुसूत्र, (५) शब्द, (६) समभिरूढ, (७) एवंभूत.

अट्ठकम्म – आठ प्रकारची कर्मे : (१) ज्ञानावरणीय, (२) दर्शनावरणीय, (३) वेदनीय, (४) मोहनीय, (५) आयु, (६) नाम, (७) गोत्र, (८) अंतराय.

णवतत्त – नऊ तत्त्वे : (१) जीव, (२) अजीव, (३) आस्रव, (४) पुण्य, (५) पाप, (६) बंध, (७) संवर, (८) निर्जरा, (९) मोक्ष.

दसविहो धम्मो – दहा प्रकारचा धर्म : (१) क्षमा, (२) मार्दव, (३) आर्जव, (४) सत्य, (५) शौच, (६) संयम-इंद्रिय दमन, (७) तप, (८) त्याग, (९) अकिंचन, (१०) ब्रह्मचर्य.

एआरस/एगारस पडिमाओ – अकरा प्रकारच्या प्रतिमा- आत्मोन्नतीच्या अवस्था : (१) दर्शन, (२) व्रत, (३) सामायिक, (४) पोषध, प्रोषध (५) नियम, (६) ब्रह्मचर्य, (७) सचित्तत्याग, (८) आरंभत्याग, (९) प्रेष्यारंभत्याग, (१०) उद्दिष्टत्याग, (११) श्रमणभूत.

बारसवयाइं – बारा प्रकारची व्रते : (१) अहिंसा, (२) सत्य, (३) अचौर्य, (४) ब्रह्मचर्य, (५) अपरिग्रह, (६) दिग्व्रत, (७) देशावकाशिक, (८) अनर्थदंडत्याग, (९) भोगोपभोगपरिमाण, (१०) सामायिक, (११) प्रोषधोपवास, (१२) अतिथिसंविभाग.

अभ्यास

१. पुढील अंक महाराष्ट्री प्राकृतमध्ये (अक्षरामध्ये) लिहा.

४, ११, १२, १५, १९, ३३, ३६, ४०, ४७, ५६, ६२, ७४, ७९, ८४, ९३, ९९

२. मराठीत भाषांतर करा.

१) एको बुद्धिमंतो अमच्चपुत्तो अत्थि।
२) वाणारसीए णअरीए दो विप्पा भाअरो।
३) चत्तारि गोपालदारआ वणं गच्छंति।
४) अट्ठ विज्जाहर-धूयाओ दिट्ठाओ।
५) कुमारो चउद्दस-विज्जाओ गेण्हइ।
६) दसमे दिणे बालअस्स मेहो त्ति णामं कअं।
७) चउत्थो वरो तत्थेव ठिओ।
८) हत्थे पंचंगुलिआओ संति।

अवांतर वाचन

(१)

मध्ययुगातील पुरातन साहित्य म्हणून शिलालेख अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. शिलालेख सर्वप्रथम सम्राट अशोकाने प्रथमत: लिहवून घेतले. या शिलालेखांची भाषा प्राकृत आहे. हे शिलालेख म्हणजे प्राकृतभाषा राजदरबाराची भाषा होती याचा पुरावाच आहेत. त्यामुळे प्राकृत भाषेचे श्रेष्ठत्व स्पष्ट होण्यास मदत होते. तसेच सम्राट अशोकाच्या राज्याच्या सीमा समजण्यास ही मदत होते. हे शिलालेख भारताच्या विविध भागात आढळतात. यांची संख्या जवळजवळ ३० आहे. गिरनार येथे अशोकाचे १४ लेख आहेत. अशोकाप्रमाणेच वाकाटक राजांचे, सातवाहन राजांचे शिलालेखही सापडतात. हे शिलालेख म्हणजेच प्राकृत भाषेतील प्रथम लिखित साहित्य होय. विद्यार्थ्यांना या प्राकृत शिलालेखाचा परिचय व्हावा म्हणून गिरनार येथील एक शिलालेख येथे दिला आहे.

१) इयं धंमलिपी देवानं प्रियेन प्रियदसिना राञा लेखापिता
२) इधं न किं चि जीवं आरभित्पा प्रजूहितव्यं
३) न च समाजो कतव्यो
४) बहुकं हि दोसं समाजम्हि पसति देवानं प्रियो प्रियद्रसि राजा
५) अस्ति पि तु एकचा समाजा साधुमता देवानं प्रियस प्रियदसिनो राञो
६) पुरा महानसम्हि देवानं प्रियस प्रियदसिनो राञो अनुदिवसं बहुनि प्राण-सत-सहस्रानि आरभिसु सूपाथाय
७) से अज यदा अयं धंमलिपी लिखिता ती एव प्राणा आरभरे सूपाथाय द्वो मोरा एगो मगो सो पि मगो न ध्रुवो
८) एते पि त्री प्राणा पछा न आरभिसरे

सद्दत्था

इयं – ही, **धंमलिपी** – धर्मलिपी, शिलालेख (हे पूर्वी राजाच्या आज्ञा देण्यासाठी सुद्धा वापरले जात असत), **प्रियदसिना**– प्रियदर्शी, प्रिय असणाऱ्या, **लेखापिता** – लिहवून घेतले आहेत, **आरभित्पा** – मारून, हत्या करून, **प्रजूहितव्यं** – हवन करू (नये), **समाजो** – सामूहिक उत्सव, समारंभ (ही तांत्रिक संज्ञा आहे.), **कतव्यो** – करण्यास योग्य, **महानसम्हि**– स्वयंपाकघरात, **सूपाथाय** – रश्या(सूपा)साठी, **अज** – आज(पासून), **द्वो** – दोन, **एगो** – एक, **मगो** – मृग (हरिण प्राणी), **ध्रुवो** – निश्चित, **त्री** – तीन, **पछा** – नंतर, **न आरभिसरे**– मारू नये.

(२)

भगीरहेण बहुं तवं काऊण गंगा पुढवीअले आणिआ, अओ जणा तं भागीरहि त्ति कहेइ। एसा भगवई भागीरही। णईसु भागीरही अईव पवित्ता। भागीरहीए जलं णिम्मलं। 'पयागे' जउणा भागीरहीए मिलइ। भागीरहीए जलं सेअं, जउणाए अ सामलं। अत्थ गंगा-जउणा-सरस्सईणं संगमो होइ। अओ जणा एत्थ गंगं तिवेणी वयंति। भागीरहीए तीरे वाणारसी णअरी अत्थि। सा 'कासी' णामेण वि पसिद्धा।

पइ-वरिसं, पइ-दिणं बहवे जणा पावं पक्खालिउं, पुण्णं अज्जिउं च भागीरहीतीरे आगच्छंति ण्हाणं च करेंति। लोगाणं विविहेहिं सुद्धिकज्जेहिं पयइ-पवित्ता वि भागीरही अज्ज दूसिआ दीसइ। अओ गंगाजलस्स सुद्धीकरण-कज्जं पज्जावरण-विउसेहिं अहुणा एव आरद्धं। गंगाए महिमा अम्हाणं पोराण-गंथेसु सुपसिद्धो –

सरीरे जज्जरीहूए वाहिग्गत्थे कलेवरे।
ओसहं जण्हवी-तोयं वेज्जो णारायणो हरी।।

सद्दत्था

पुढवीअले – भूतलावर, **भागीरही –** गंगा नदी, **सेअं –** पांढरे शुभ्र, **जउणा –** यमुना नदी, **तिवेणी –** त्रिवेणी, **वाणारसी–** वाराणसी, काशी, बनारस नगरी, **पक्खालिउं –** धुण्यासाठी, **सुद्धिकज्जेहिं –** शुद्धीकरणासाठी, **दूसिआ –** अशुद्ध, **दीसइ–** दिसून येते, **पज्जावरणविउसेहिं –** पर्यावरणशास्त्रज्ञांनी, **पोराण –** पुराण (ग्रंथ), **जज्जरीहूए –** क्षीण झाल्यावर, **कलेवरे –** देह, **वाहिग्गत्थे –** रोगपीडित, **ओसहं –** औषध, **जण्हवीतोयं –** गंगेचे पाणी, **णारायणो/हरी –** विष्णू

(३)

एयंमि जंतालए दससहस्सा जणा कज्जं कुणंति। एगआ सो जंतालओ सहसा णिस्संचारेण थिरो जाओ। कहं पि ण चलेइ। तआ जंतालअसंचालओ जंतालअ-चालण-णिण्हाअं सिप्पिं बोल्लावेइ। सो आगओ जंतालयं पासेइ, पासिऊण कहेइ। दससहस्सं रूवअं गिण्हिऊण एअं जंतालअं संचालिस्सं। अंगीकुणंते समाणे सिप्पिणा बुद्धीए जत्थ थले, जेण कारणेण खलिओ अहेसि, तं कारणं णाऊण तद्वाणं मोग्गरेण पहरिअं। तओ, सो जंतालओ चलिउं लग्गो। तेण सिप्पिणा दससहस्सरूवअं मग्गिअं। तआ जंतालयाहिवो कहेइ। ''ताडणस्स उ एगं चिअ रुप्पअं, दससहस्सं अजुत्तं मम भाइ, ताडणं तु मम किंकरो वि कुणेज्जा।'' सो सिप्पी कहेइ ''सच्चं मए मोग्गरपहारस्स रूवगमेक्कमेव गहिअं, किंतु एगूणं दससहस्सं तु सो मोग्गरो पहारो ''कत्थ कीइ जुत्तीए दायव्वो, तं बुद्धीए जाणिऊण गहिअं, णण्णहा।''

सद्दत्था

जंतालओ – कारखाना, यंत्रालय, **णिस्संचारेण –** (ते यंत्र) काम करत नसल्याने, त्या यंत्राचे काम थांबल्याने, **णिण्हाअं–** निष्णात, हुशार, पारंगत, **सिप्पिं –** अभियंत्याला, यंत्र दुरुस्त करणाऱ्याला, **संचालिस्सं –** सुरू करेन, **अंगीकुणंते समाणे–** ते मान्य केल्यावर, **खलिओ –** चूक, दोष, **अहेसि –** होता, **णाऊण –** जाणून, **मोग्गरेण –** हातोडीने, **भाइ –** मला वाटते की, **एगूणं दससहस्सं** – रु. ९९९९/-, **णण्णहा –** ण+अण्णहा- उगीच (घेतले) नाही

(४)

अत्थि एगम्मि णअरे चाउव्वेदो बंभणो। दुवे छत्ता तं विण्णवेंति- ''तुम्हे अम्हाणं वेयंतं वक्खाणह''। बंभणो भणइ- ''अहं तुब्भे वेयंतं सिक्खावेमि। किंतु तत्थ विहाणमत्थि''। तओ एओ छत्तो बीअं भणइ- ''तुमं आअरिअं पुच्छ केरिसं तं विहाणं ति''। सो बंभणं पुच्छइ- ''भयवं, वयं तुब्भेहिंतो सोउं इच्छामो केरिसं तं विहाणं ति''। आयरिओ भणइ- ''तुमए कालचउद्दसीए सेओ छालओ मारेयव्वो जत्थ ण कोइ पासइ। तत्थ तस्स मंसं भुंजिअव्वं। तओ वेयंतसुणण-जोग्गो होसि''। एओ छत्तो पडिभणइ- ''मए एअम्मि जत्तो किज्जइ। तुम्हे आसीसं देह''। बंभणो भणइ- ''मम आसीसा तुज्झाणं कए अत्थि एव । किंतु तुम्हाणं बुद्धीए परिक्खा अत्थि''। छत्ता भणंति- ''अम्हे गच्छामो''। आयरिओ आसीसं देइ भणइ अ- ''तुम्हेसुं जो विहाणं सम्मं करेइ, सो मज्झ पट्टसीसो''।

तओ एगो छत्तो सेयछालगं गेण्हइ, कालचउद्दसीरत्तीए सुण्णरत्थाए अ गच्छइ। छगलअं मारेइ। तस्स मंसं भुंजइ, पडिणियत्तइ अ । उवज्झाओ जाणइ- 'अजोग्गो, ण किंचि परिणयमेयस्स' त्ति । ण वक्खाणेइ तस्स वेअ-रहस्सं। दुइओ वि तहेव सुण्णरत्थाए गच्छइ। चिंतेइ अ- 'एत्थ तारआ पेच्छंति'। तओ देव-उलं गच्छइ, चिंतेइ य- 'एत्थ देवो पेच्छइ'। तओ सो सुण्णागारे गच्छइ, तत्थ वि चिंतेइ- 'एत्थ अहं, एस छगलओ अइसअणाणी अ पेच्छंति'। 'जत्थ ण कोइ पासइ तत्थ मारेअव्वो' त्ति उवज्झाय-वअणं। ता एस भावत्थो- 'एसो ण मारेयव्वो' त्ति। पडिगच्छइ उवज्झायस्स पायमूले। साहेइ तं जं तस्स परिणमिअं। संतुट्ठो उवज्झाओ भणइ- ''तं बुद्धिमंतो, अज्जप्पहुइ मम पट्टसीसो तुमे'' त्ति।

सद्दत्था

चाउव्वेदो – चार वेद जाणणारा, **दुवे –** दोन, **छत्ता –** शिष्य, विद्यार्थी, इथे दोन विद्यार्थी, **वेयंतं –** वेदातील शेवटचा भाग, तत्त्वज्ञान, **वक्खाणह –** विवरण करावे, शिकवावे, **बंभणं –** ब्राह्मणाला, द्विजाला, **सिक्खावेमि –** शिकवतो, **विहाणं –** विधी, शास्त्रानुसार सांगितलेली पद्धत, **आअरिअं –** (आचार्याला) आचार्यांना, **सोउं –** ऐकण्यासाठी, **कालचउद्दसीए–** कृष्णपक्षातील चतुर्दशीला, **सेओ –** पांढरा, **छालओ –** बकरा, **मारेअव्वो –** मारावा, **पासइ –** पाहतो, **मंसं –** मांस, **भुंजिअव्वं –** खाल्ला जावा, **जोग्गो –** पात्र, **जत्तो –** प्रयत्न, **आसीसं –** आशीर्वाद, **सम्मं–** योग्य, **पट्टसीसो–** मुख्य शिष्य, **सुण्णरत्थाए –** निर्मनुष्य, ओसाड जागेत, कोणतीही रहदारी नाही अशा रस्त्यावर, **अजोग्गो –** अयोग्य, **परिणयं–** (आशय) समजलेला, लक्षात आलेला, **वेअरहस्सं –** वेदांचे रहस्य, वेदांचे ज्ञान, **तारआ –** तारे, चांदण्या, **देवउलं–** देऊळ, **सुण्णागारे –** रिकामी, ओसाड जागा तिथे, **अइसअणाणी –** सर्वज्ञ, **उवज्झाओ –** गुरु, शिक्षक, **भावत्थो –** सारांश, आशय, **पडिगच्छइ –** परत जातो, **साहेइ –** सांगतो, **अज्जप्पहुइ –** आजपासून.

(५)

रामायणे वि सुव्वइ सीआ–हरणे जडाउ–गिद्धु त्ति ।
पंखाउहो महप्पा जुज्झेणं रावणस्स ठिओ ।।
तेण वि से रुट्ठेण चंदाहासेण लूडिआ पंखा ।
तो लुअ–पंखो पडिओ मंदर–सिहरो व्व महिवट्ठे ।।
सीआ सो भणिओ सीलवईणं सईण तेएणं ।
दट्ठूण रामदूअं होहिंति पुणो वि ते पंखा ।।
कस्स वि कालस्स तओ तओ हणुमंतो राहवेण आणत्तो ।
सीया–पउत्ति–हेउं हिंडंतो आगओ तहियं ।।

सद्दत्था

सुव्वइ – ऐकले आहे, **सीआ–हरणे –** सीताहरणामध्ये, **जडाउ–गिद्धु –** जटायु नावाचे गिधाड, **पंखाउहो –** पंखांच्या शस्त्राने, **महप्पा –** महान असा तो, **जुज्झेणं –** युद्धासाठी, **ठिओ –** थांबला/उभा ठाकला, **चंदाहासेण –** चंद्रहासाने, चंद्रहास या नावाच्या खड्गाने/तलवारीने, **लूडिआ –** तोडले, **लुअ–पंखो –** पंख तुटलेला, **मंदर–सिहरो व्व –** मेरू पर्वताच्या शिखराप्रमाणे, **महिवट्ठे –** जमिनीवर, **दट्ठूण –** पाहून, **रामदूअं –** रामाच्या दूताला, **सीया–पउत्ति–हेउं –** सीतेच्या हकीकतीसाठी, सीतेची हाल हवाल विचारण्यासाठी

(६)

संतेहि असंतेहि य परस्स किं जंपिएहिं दोसेहि ।
अत्थो जसो ण लब्भइ सो वि अमित्तो कओ होइ ।।
अप्प–हिअं काअव्वं जइ सक्कइ पर–हिअं च काअव्वं ।
अप्प–हिय–पर–हियाणं अप्प–हियं चेव कायव्वं ।।
सीलं वरं कुलाओ, दालिद्दं भव्वयं च रोगाओ ।
विज्जा रज्जाउ वरं, खमा सुट्ठं वि तवाओ ।।

जं जि खमेइ समत्थो, धणवंतो जं ण गव्वं उव्वहइ ।
जं च सविज्जो णमिरो तिसु तेसु अलंकिआ पुहवी ।।
छंदं जो अणुवट्टइ मम्मं रक्खइ गुणे पआसेइ ।
सो णवरि माणुसाणं देवाणं वि वल्लहो होइ ।।

सद्दत्था

संतेहि – असणाऱ्या, **असंतेहि** – नसणाऱ्या, **किं जंपिएहिं** – बोलून / बोलल्याने काय उपयोग?, **अत्थो** – पैसा, **ण लब्भइ**– मिळत नाही, **अमित्तो** – शत्रू, **अप्प–हिअं** – आपले हित, **काअव्वं** – करावे, **सक्कइ** – शक्य असेल तर, **पर–हिअं**– दुसऱ्याचे हित, **सीलं** – चारित्र्य, **वरं** – श्रेष्ठ, **कुलाओ** – कुळापेक्षाही, **दालिद्दं** – दारिद्र्य, **भव्वयं** – उत्तम, **रोगाओ**– रोगांपेक्षाही, **रज्जाउ** – राज्यापेक्षा, **सुट्ठु वि तवाओ** – उत्तम तपापेक्षाही, **जं** – जो, **जि** – खरोखर, **खमेइ** – क्षमा करतो, **समत्थो** – प्रबळ, बलवान, सामर्थ्यवान, **गव्वं** – गर्व, **(ण) उव्वहइ** – धारण करत नाही, **सविज्जो** – विद्यावान, **णमिरो** – नम्र, **तिसु** – तीन, **छंदं** – (समोरच्या व्यक्तीच्या) बोलण्याप्रमाणे, **अणुवट्टइ** – वागतो, **मम्मं** – मर्म, रहस्ये, गुपिते, **रक्खइ**– दडवतो, सांभाळतो, **पआसेइ** – प्रकाशित करतो, सर्वांसमोर प्रकट करतो, **णवरि** (अव्यय) – खरोखर, **वल्लहो** – प्रिय

(७)

तुच्छं पि सुपत्तंमि उ दाणं णिअमेण सुहफलं होइ ।
जह गावीए दिण्णं तिणं पि खीरत्तणमुवेइ ।।
सअलाणं पि णईणं उअहिं मोत्तूण णत्थि आहारो ।
तह जीवदयाए विणा धम्मो वि ण विज्जए लोए ।।
जो कुणइ परस्स दुहं पावइ तं चेव अणंतगुणं ।
लब्भंति अंबयाइ ण हि णिंबतरुम्मि ववियम्मि ।।

सद्दत्था

खीरत्तणं – दूध देण्याचा स्वभाव, **उवेइ** – देते, **उअहिं** – पाण्यामध्ये, **मोत्तूण** – सोडून, **विज्जए** – असते, **लब्भंति** – मिळतात, **अंबयाइ** – आंबा इत्यादी, **णिंबतरु** – लिंबोणीचे झाड, **ववियम्मि** – लावले असता

(८)

लोहाविट्ठो णरो वित्तं, पासइ णेव आवअं।
दुद्धं पासइ मज्जारो, दंडाघाअं ण देक्खइ।।१।।
पोत्थगत्था उ जा विज्जा, पर–हत्थ–गअं धणं।
कज्ज–काले समुप्पण्णे, ण सा विज्जा ण तं धणं।।२।।
गंगा पावं ससी तावं, दालिद्दं कप्प–पायवो।
पावं तावं च दालिद्दं, णासेंति सुयणा सआ।।३।।
विएसेसु धणं विज्जा, वसणेसु धणं मई।
पर–लोए धणं धम्मो, सीलं हु सव्वदा धणं।।४।।
पओसे दीवओ चंदो, पच्चूसे दीवगो रवी।

तेल्लोक्के दीवओ धम्मो, सु-पुत्तो कुल-दीवगो।।५।।
अप्पणो मुह-दोसेण, बज्झंति सुग-सारिआ।
बगा तत्थ ण बज्झंति, मोणं सव्वत्थ-साहणं।।६।।
सव्व-णासे समुप्पण्णे, अद्धं चयइ पंडिओ।
अद्धेण कीरए कज्जं, सव्व-णासो हि दूसहो।।७।।
माया सत्तू पिआ वेरी, जेण बालो ण पाढिओ।
ण सोहइ सहा-मज्झे, हंस-मज्झे बगो जहा।।८।।
दुस्सीलो य सढो मित्तो, भिच्चो आणा-परम्मुहो।
स-सप्पे य गिहे वासो, मच्चू एव्व ण संसओ।।९।।
सहावो णोवएसेण, तीरए काउमण्णहा।
सुतत्तं पि जलं पेच्छ, पुणो हवइ सीअलं।।१०।।

सद्दत्था

लोहाविट्ठो – लोभाने ग्रासलेला, **वित्तं** – धन, पैसा, **आवअं** – संकट, **दंडाघाअं** – सोट्याचा प्रहार, **देक्खइ** – पाहतो, **पोत्थगत्था** – पुस्तकात असलेली, पुस्तकी, **विज्जा** – शिक्षण/ज्ञान, पांडित्य, **कज्ज-काले** – वेळप्रसंगी, **समुप्पण्णे**– उपस्थित झाल्यावर, **परहत्थगअं**– दुसऱ्याच्या हातातील, **पावं** – पाप, **तावं** – उष्णता, ताप, **दालिद्दं** – गरिबी, **कप्पपायवो**– कल्पवृक्ष, **सुयणा** – सज्जन, **विएसेसु** – परदेशात, **मई** – बुद्धी, **पओसे** – सायंकाळी, **पच्चूसे** – सकाळी, **दीवओ/दीवगो** – दिवा, **तेल्लोक्के** – त्रिभुवनामध्ये, **अप्पणो** – स्वतःच्या, **मुहदोसेण** – बडबडण्याने, वाचाळपणाने, **बज्झंति** – बद्ध होतात, बंधनात पडतात, **सुगसारिआ** – पोपट व मैना, **बगा** – बगळे, **मोणं** – मौन, गप्प बसणे, **सव्वत्थसाहणं**– सर्व गोष्टी मिळवण्याचे साधन, **सव्वणासे समुप्पण्णे** – सर्वनाशाच्या वेळी, **अद्धं** – अर्धा भाग, निम्मे, **चयइ** – सोडतो, **कीरए** – केले जाते, **दूसहो** – सोसण्यास कठीण, **माया** – आई, **पिआ** – वडील, **वेरी** – शत्रू, **पाढिओ**– शिकवले, **सोहइ**– शोभतो, **सहामज्झे** – सभेत, **दुस्सीलो** – दुराचारी, दुष्ट, **सढो** – धूर्त, कपटी, **आणापरम्मुहो** – आज्ञा न पाळणारा, **ससप्पे गिहे** – सर्पासहित घरात, **मच्चू** – मरण, **संसओ** – संशय, **भिच्चो** – नोकर, **सहावो** – स्वभाव, **तीरए** – शक्य असणे, **णोवएसेण**– (ण+उवएसेण) उपदेशाने नाही, **काउमण्णहा** – (काउं + अण्णहा) अन्य करणे, **सुतत्तं** – चांगले तापवलेले, **पेच्छ** – पहा, **पुणो** – पुन्हा, **सीअलं** – थंड

परिशिष्ट २

लेखन कौशल्य

२.१ संवाद लेखन

अ) आवण-वण्णणं

रामो– रे मित्त ! आगच्छ।

पराओ – आगच्छामि । तुमं गामो बहुसुंदरं अत्थि। रे, किं विसेसं अत्थि तुज्झ गामे अज्ज ?


रामो – आम। अज्ज अम्हाणं गामे अट्ठाहआवणं वट्टइ। एयंसि आवणे जत्ता अवि अत्थि। जत्ताए बहवा आवणिआ आगच्छंति।

पराओ – किं गच्छामो वयं आवणे ?

रामो – आम। चलउ। अहं दंसेमि तुमं सव्वं आवणं/हट्टं।

पराओ – जत्ता तु बहु विसाला अत्थि।

रामो – उअ, विविहा आवणिआ बहूणि वत्थूणि तहा साकं वि विक्किणेउं आणेंति । जत्ताए विविहाणि मणोरंजणसाहणाणि संति।



पराओ – पस्स, एसो आवणिओ। किं विक्किणेइ ?

रामो – एअस्स समीवे णूअणाणि वत्थूणि संति। एआणि वत्थूणि केवलं णअरंसि मिलेंति। अओ सव्वे जणा कोऊहलेण ताणि ताणि वत्थूणि पासंति।

पराओ – राम, इमेण आवणिकेण सह किमत्थं कलहं ?

रामो – रे पराअ, जणा सव्वाणि वत्थूणि अप्पमुल्लेण एव इच्छंति। आवणिकस्स कए तं ण सक्कं। अओ तत्थ कलहं।

पराओ – आवणस्स समीवे मंदिरं अत्थि किं ?

रामो – अत्थि गणेसस्स मंदिरं। आवणिआ अण्णजणा अ मंदिरे वीसमंति।

पराओ – आवणे सव्वाणि गिहोवओगाणि वत्थूणि एव दीसंति।

रामो – ण पराअ, किसीवलाणं कए, घरणीणं कए, जुवईणं कए, सव्वाणं कए वत्थूणि संति। बहवा अलंकारा वि संति जुवई-बालिआणं कए।

पराओ – अण्णगामाओ वि जणा एत्थ वत्थूणि साकं च कीणेउं आगच्छंति किं ?

रामो – आम। साहारणजणेहिं सह वावारीजणा वि अण्णगामाओ आगच्छंति।

पराओ – सुट्ठु तुमं आवणं/हट्टं। पुणो आगच्छामि अहं तुमं गामे। अहुणा अहं कंचि कंचि वत्थूणि कीणामि । अलंकारा वि कीणामि बहिणीए कए। ताहे ममं साहेज्जं करे सु। चलउ।

ब) क्रियाविशेषणे

१) एत्थ, अत्थ, इह – अहं एत्थ वसामि। रामो अत्थ खेलइ। तुमं इह गच्छ। सो अत्थ झत्ति आगओ।
२) तत्थ, तहिं – सीमा तत्थ उवविसिऊण मालं गुंफेइ । लक्खणो तहिं कीलइ।
३) जत्थ, तत्थ – जत्थ धूमो, तत्थ अग्गी अत्थि।
४) जहिं, तहिं – जहिं सुहिजणा, तहिं पुत्थआणि संति । जहिं केत्तिला मुक्खा संति। तेण सद्धिं तुमं तहिं गच्छ।
५) कत्थ, कहिं – तुमं कत्थ गओ सि?। रामो कहिं पि ण दीसइ।
६) इओ, तओ, जओ – तुमं जओ आगओ तत्थ चेअ गच्छ । णअरं इओ अइदूरं णत्थि। तुमं तओ णाणं लह।
७) एत्तो, तत्तो – भरहो एत्तो पस्सइ, तत्तो अंबं दीसइ।
८) अण्णत्थ – सीया अत्थ णत्थि। सा अण्णत्थ गआ।
९) सव्वत्थ – वाऊ सव्वत्थ पसरइ।
१०) उड्ढं – मम उड्ढं वीअणं चलइ।, रुक्खस्स उड्ढं विहगा उड्डेंति।
११) बाहिं – घराओ बाहिं पुप्फाणि विअसंति।
१२) अग्गओ – विज्जालए मम अग्गओ मम मित्तो चिट्ठइ।
१३) पच्छा – अहं पढामि, पच्छा तुमं पढ। भोअणस्स पच्छा सो सोअइ/सुवइ।
१४) कआ – महुमक्खिआ जणा कआ पीडेइ ?
१५) जाव.....ताव – जाव तुमं ओअणं पाअअसि ताव अहं सुवेमि।
१६) इआणिं – इआणिं मम समीवे बहुधणं अत्थि।
१७) जाहे, ताहे – जाहे सिप्पी मुत्तिं करेइ ताहे एव सिप्पी धणं लहेइ।
१८) कल्लं – मया कल्लं पाढं सिक्खाविअं।
१९) सिग्घं – मोहण, सिग्घं हट्टं गच्छ।
२०) सुट्ठु – सुट्ठु कअं तुमं।

क) प्रसंगानुरूप वाक्यप्रचार व म्हणी

१) नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा –	णववरिसस्स सुहेच्छा।
२) दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा –	दीवुच्छवस्स सुहकामणाओ।
३) शुभेच्छा –	सुहेच्छा / कल्लाणं होउ।
४) सफलतेबद्दल अभिनंदन –	सहलयाए अहिणंदणं।
५) कार्यक्रम यशस्वी होवो –	कज्जक्कमो जसस्सी होउ/हवउ।
६) जीवेत् शरद: शतम् –	जीवेज्ज सरओ सयं।
७) वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा–	जम्मदिणस्स/जम्मदिवसस्स सुहासयाओ/सुहकामणाओ।
८) शुभास्ते पन्थान: सन्तु –	सुहा ते पंथाणो हवंतु।
९) गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा –	गणेसूसवस्स हद्दिआ सुहेच्छा।
१०) नाताळच्या हार्दिक शुभेच्छा –	एसुजम्मस्स (येशुजन्म) हद्दिआ सुहेच्छा।
११) परीक्षेसाठी शुभेच्छा –	सोहग्गं ते परिक्खत्थं।
१२) हातच्या काकणाला आरसा कशाला –	हत्थे कंकणं किं दप्पणेण?
१३) धावत्या घोड्याला साक्षीची काय गरज –	तुरयस्स सिग्घत्तणे किं सक्खिं पुच्छिज्जं?
१४) करावे तसे भरावे –	जं करिज्जइ तं भरिज्जइ।

१५) बळी तो कान पिळी –	जो बलिट्ठो सो कण्णं पीलेइ।
१६) जोवरी पैसा तोवरी बैसा –	जाव धणं ताव आसणं।
१७) शितावरून भाताची परीक्षा –	ओअणकणेणं भत्तस्स परिक्खा।
१८) सोनाराने कान टोचावेत –	सुवण्णकारेण एव कण्णं विंझिअव्वं।
१९) अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे –	अद्धहलद्दिआए पीइकअं।
२०) मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार? –	मज्जारिआए गले को घंटं बंधेइ ।

२.२ पत्र लेखन

१) पिउणो / पिउकए पत्तं –

राहिआ मणोहर टोपे
सेणिईसाला विज्जालअस्स वसहिगिहं,
कक्खकमंको ५, सेणिई-साला, पुणे.
दि. २०/१०/२०१९

परमपुज्जणीओ पिआ,

अहं अज्ज पभाए सुहेण अत्थ पुण्णणअरीए पत्ता । मम सहीओ वि पभाए एव आगच्छिंसु। एत्थ सव्वं सुंदरं अत्थि। वसहिगिहे सव्वा सुविहा एव अत्थि। वसहिगिहस्स समीवं विसालं आवणमवि अत्थि। तत्थ सव्वाणि वत्थूणि मिलेंति। अओ मम चिंता मा करउ। कल्लाओ ममं साला पभाए एव। वयं सव्वा मिलिऊण कल्लाओ सालं गच्छिस्सामो।

अज्ज पढमदिवसो अम्हाणं। अओ दसवायणे अहं सालं गच्छित्था। सव्वे छत्ता, अज्झावआ वि दसवायणे आगच्छिंसु । अम्हाणं सव्वा अज्झावअ-अज्झाविआओ बहु सरला संति। सव्वे अज्झावआ पेमिल्ला एव। अहुणा अस्सिं वरिसे वयं बहवाणि विसयाणि पढिस्सामो। इमेसु विसएसु मरहट्ठी भासा, सक्कयभासा तहा पाइयभासा वि अत्थि। पाइयभासाए अज्झाविआ कहेंति – एसा भासा बहु सरला सुलहा च त्ति। तुम्हे जाणह किं एसा भासा? कहं अत्थि सा? एसा णूअणा भासा अहं कोऊहलेण पढामि।

तुम्हे अप्पप्पणो आरुग्गं पयत्तेण रक्खिअव्वं। अहं सज्झाए चित्तेकग्गयाए पयत्तामि ।

तुम्हाणं पिआ पुत्ती
राहिआ

२) मित्तस्स / मित्तकए पत्तं –

रमेसो सुहासो काळे
कसबा पेठ,
इअलअरंजी

पिअमित्त सुरेस,

मित्तवज्ज, कहं अत्थि तुमं? कल्लमेव मम परिक्खा समत्ता। सव्वविसयाणं परिक्खा उत्तमा जाआ। अहं मण्णे, तुम्हं परिक्खा वि उत्तमा हवित्था।

सुवे मम विज्जालए दीआलिआए विरामो पणरसदिअहाणं हवइ। अहं अम्हाणं गामं कए दुवे दिअहाणंतरं णिग्गच्छामि । तुम्ह विरामो कआ आरद्धेइ? जओ हं गामे आगच्छामि तओ तुमं उवलद्धो सि अहवा ण?

मम आगमणाणंतरं वयं मिलिऊण ऊसवो करेमो। विविहाइं भोयणपआराइं आसाएमो। दीआलिआणिमित्तं जे जे

असणपाणसाइमखाइमं संति ते ते खाइउं मह अईव रोअंति। तवेव वि अईव रुएइ। दीवुच्छवे फोडयाणं कए वि अईव उस्साहो वट्टए मम। वयं विविहाणि फोडयप्पयाराणि फोडिस्सामो।

अत्थु। कहं ते माआपिअराइं? तेसिं साअरं णमणं।

मिलामो सिग्घं ।

तुज्झ मित्तो
रमेसो

---

३) पमुहज्झावअस्स पत्तं –

सिवाणी धणंजओ कुलअण्णी
एगारह–कक्खा
पुणे
दि. ०५/०७/२०१९

पइ,
पमुहज्झावओ,
स. प. कणिट्ठ–महाविज्जालओ

विसओ – पाइयभासज्झावगाणं ववत्था करणत्थं

महाभागो,

मम णाम सिवाणी धणंजओ कुलअण्णी। अहं अस्सिं स. प. कणिट्ठ–महाविज्जालए एआरहम्मि कक्खाए पढामि। अहं सक्कयभासाए सह पाइयभासा वि पढिउं इच्छामि। किंतु अम्हाणं कणिट्ठ–महाविज्जालए पाइयभासाए अज्झावओ णत्थि। तहा परिक्खत्थं वि पाइयभासाविसओ णत्थि। तओ बहवा छत्ता इच्छंता वि पाइयभासा पढिउं असमत्था। अओ किवया पाइयभासज्झावगाणं ववत्था सिग्घं करेंतु त्ति वयं सव्वे छत्ता विण्णवेंति।

भवईया
सिवाणी धणंजओ कुलअण्णी

---

४) णिमंतणपत्तं–

गरवारे कणिट्ठ–महाविज्जालओ, पुणे

सिरिमंतो,

अम्हाणं पमुहज्झावओ सिरी असोओ काळे–महोदओ अस्सिं मासंते कज्जणिव्वुत्ता भविस्संति। ते सव्वभासाविसए पारंगओ त्ति सव्वे जाणंति एव। ते बहुकालाओ अम्हाणं पमुहज्झावगरूवेण कज्जरआ। अओ णिव्वुइदिणे तेसिं सम्माणिउं वयं एकं सम्मेलणं आयोजिअं अत्थि। अस्सिं सम्मेलणे सव्वे विज्जज्जणा छत्ता अ पमुहज्झावयं पइ मणोगअं पअडिस्संति। तयाणंतरं अप्पोवहारं गहिऊण कज्जक्कमो समत्तेइ।

तुम्हे बहुकालाओ काळेमहोदआणं सहआरीओ संति। अओ वयं सव्वे तुम्हाणं सव्वाणं णिमंतेउं हरिसिआ । वयं सव्वे मिलिऊण काळेमहोदआणं कज्जकालस्स अंतिमं दिणं सुमरणीअं करेज्जामो।

दिणंको – ३०/१०/२०१९
कज्जक्कमस्स ठाणं – कणिट्ठ–महाविज्जालअस्स सहागिहं
समयं – १०.०० वायणाओ

भवईया
सव्वे अज्झावगा छत्ता अ

२.३ निमंत्रण लेखन

सिवाई कणिट्ठ-महाविज्जालओ, पंढरउरं
वस्सिअ-णेहसंमेलणं
अंकुरं २०१९
सुक्कवासरो, दि. २० डिसेंबर २०१९, साअं ०५.०० वाअणे

अज्झक्खा
मा. सुणीआ रावो
(सिक्खणाहिआरी)

पमुहाइही
मा. विअयरावो विहुए
(पसिद्धो अहिवत्ता)

पमुहातिही

सिरी ताणाई लोहंडे
अज्झक्खो

सिरिमई सोणाली जाहवो
सइवो

सिरी हणमंतो कअमो
कोसज्झक्खो

एआणं मणवराणं उवत्थिइम्मि कज्जक्कमो संपण्णो भविस्सइ । तण्णिमित्ते अहोलिहिया कज्जक्कमा आयोजिया।

१) साअयं तहा सक्कारसमारंभो
२) पारिओसिअविअरण-समारंभो
३) आदंस-छत्ताणं सम्माणो
४) मणवराणं मणोगयं
५) समारोवो

सायं - ६.०० - ६.३० - कसाअपेअपाणं
छत्ताणं विविहाणि गुणदंसणकज्जक्कमा
(सायं ०६.३० - ०८.०० वाअणपज्जंतं)

ठाणं
महाविज्जालअस्स सहागिहं

णिमंतओ
पमुहज्झावओ

सिवाई कणिट्ठ-महाविज्जालअं

२.४ बातमी

णूअण-मराठी विज्जालअस्स सम्मेलणं संपुण्णं -

अज्ज डिसेंबरमासस्स दसमे दिणंके णूयणमराठी विज्जालए सव्वे जणा सम्मेलणत्थं सम्मिलिआ। पसिद्धो वेज्जो तहा जोसी-चिकिच्छालअस्स पमुहवेज्जो पयासो जोसी पमुहातिहिरूवेण पत्तो। सम्मेलणस्स आरंभे विज्जालअस्स छत्तेहिं अइहीणं तहा पमुहज्झावगाणं सागयगीएण सागयं कअं । तयाणंतरं पाढसालाए अज्झाविआहिं पुप्फेहिं पमुहातिहीणं आअरसक्कारं कअं। अणंतरं मुक्खज्झावएहिं विज्जालअस्स परिचयं दत्तं। विज्जालअस्स विआसो वि कहिओ। तहा छत्ताणं उवएसो वि कओ।

अणंतरं पमुहातिहीहि वेज्जो पयासो जोसी महोदएहिं विज्जालअस्स अहिणंदणं कयं। अप्पाणं खेत्ते के के पज्जाया संति, ते कहं संति, तेसिं कए किं कत्तव्वं, के अणुभवा संति त्ति सव्वं कहियं। एसो छत्ताणं कए बहूवओगो उवएसो। जोसी महोदएहिं सरलतया कहियं। अओ सव्वे छत्ता वि आणंदिआ। भासणाणंतरं छत्तेहिं विविह-कज्जक्कमा कआ। णच्चं, णाडअं, गीयगायणमाइ विविहा-कज्जक्कमा वि हूआ। कज्जक्कमाणंतरं जोसीमहोदएहिं विज्जालअस्स कए दससहस्स-रूवगाणि दाणरूवेण दिण्णं। सम्मेलणस्स अंते सव्वाणं कए भोअणं पि आसी। सव्वे अईव संतुट्ठा होऊण संमेलणाओ णिग्गआ ।

परिशिष्ट ३

निबंध लेखन

१) पज्जावरणं/रुक्खपज्जावरण-संबंधो/रुक्खसंवड्ढणं अवस्सकरणीयं

पुढवीए रूवं अईव मणोहरं। पुहवीए अंगे अणेआ णईओ, पव्वआ, वणा, पसुपंछीओ इच्चाइणो विराअंति। ते सव्वा पुढवीए अलंकारा एव। इमाणं रक्खणं अम्हाणं करणिज्जं।

पुढवीए अणेगा उउणो संति। एए उउणो पुढवीए रूवपवत्तणे महत्तपुण्णा। एअम्मि रूवपवत्तणम्मि रुक्खावि अत्तणो सरूवं पवत्तंति। पुढवीए सुंदरत्तणे रुक्खाणं भूमिआ वियारणीआ। रुक्खा पुढवीए पज्जावरण-रक्खणत्थं आवस्सआ एव। रुक्खा वसुंधरालल्णाए णासिआ एव। एयाए णासियाए साहेज्जेण एव वसुंधरा/धरा/मही सासुच्छवासं करेइ। सासुच्छवासं जीवधारणत्थं अईव आवस्सयं। सासणिस्सासणत्थं पाणवाउणो केत्तियं महत्तं वयं सव्वे जाणामो एव।

पाणवाउणो णिम्माणं ण सुलहं। एअट्ठं रुक्खाणं संवड्ढणं महत्तपुण्णं। सुज्जप्पयासे रुक्खा पाणवाऊणं उस्सज्जणं करेंति। तेण पाणवाऊणमेव भूमीए जीवजंतूणं जीवणं पअलइ। रुक्खा पसुपंछीणो आलओ वि संति। पंछीओ रुक्खे चिट्ठंति। तेहिं सह रुक्ख-बीआणि इओ तओ पसरंति। अओ णूअणं रुक्खाणं उप्पत्ती हवेइ। तेण महीए पाणवाउणो संतुलणं वि होइ।

रुक्खा धराए धूवं अवि रोहेइ। तेण पुढवीए सुहलत्तं वड्ढेइ अहिआइं सस्साइं वि लहेइ। रुक्खाओ पाउसमाणमवि जोग्गत्तमेइ। तेण दुब्भिक्खं दुक्कालवसणं पि दूरं भवइ।

णअरविआसे मणुजेण अणेगा रुक्खा छिण्णा। तेण पज्जावरणस्स संतुलणं आवइगत्ते पडिअं। रुक्खसंवड्ढणेण अम्हेहिं पज्जावरणं संतुलिउं पयत्तं अवस्समेव करणिज्जं। तेण अम्हाणं पुढवीए सुंदेरं वड्ढिउं रक्खणं च करेउं सक्केमो।

२) मम विज्जालओ / विज्जालअं

एसो मम विज्जालओ। अहं कण्णासालाए पढामि। अहं पइदिणं विज्जालअं गच्छामि। मम सव्वा आयरिआ वि इत्थीओ संति। मम विज्जालए विसालं कीलंगणं पि अत्थि। मम विज्जालओ णअर-पमुहमग्गे एव। विज्जालए सहागेहं तहा विसालं पुत्थआलयं पि अत्थि। छत्ता पुत्थआणि घेत्तूण पढंति। सहागिहे छत्ता विविहा कज्जक्कमा करेंति । सव्वे छत्ता अणुसासणप्पिआ। अम्हाणं पमुहज्झाविआ बहुणाणी तहा सव्वछत्ताणं पिअअरा अत्थि। सा अईव णेहिल्ला। पइवासे विज्जालअस्स वड्ढावणदिणे समारोहो होइ। पाढसालाए अज्झाविआ अम्हाणं बहवा विसआ पाढयंति। विज्जालए दिणारंभे पत्थणा होइ। पाढसालाए भोयणावआसे सव्वे छत्ता भोयणं कुव्वंति। विज्जालअस्स परिसरे सुंदरं उज्जाणं पि अत्थि । बहवा बालिआओ सायंकाले तत्थ कीलंति । मम विज्जालओ ममं अईव पिओ।

३) उज्जाणं

उज्जाणप्पएसं अइरमणीअं। तम्मि अणेगाओ लआओ बहवे रुक्खा संति। लआसु रुक्खेसु य हरियाणि पण्णाणि विविह-वण्णाणि पुप्फाणि अ संति। पुप्फाणि लआओ अ रुक्खेसु विहूसेंति। रुक्खा फलाणि वि धारेंति। रुक्खाण आहारेण लआओ वड्ढंति फुल्लंति अ। विविहा विहंगमा रुक्खेसु वसंति। सूरोदए ते गाएंति। उज्जाणे पुक्खरिणी वि अत्थि । तीए पोक्खरिणीए कमलेसु भमरसमूहो गुंजारवं करेइ। पभाए आबालवुड्ढा उज्जाणे हिंडंति योगासणाणि करेंति अ। संझासमए इत्थीओ, बालाओ बालिआओ अ उज्जाणे रमंति। संझाए बाला-बालिआ उज्जाणे कीलंति। पोक्खरिणीए समीवं एगं मंदिरंपि अत्थि। जणा पइदिणे वंदणत्थं मंदिरं आगच्छंति। उज्जाणाओ बहिं विविहाणि भोअणगिहाणि वि अत्थि। जणा भोइउं सआ तत्थ आगच्छंति।

४) महापुरिसो

सुपुरिसो लोए सुअणो, सप्पुरिसो, महापुरिसो त्ति पसिद्धो। कइणा भणियं –

''छिज्जउ सीसं अह होउ बंधणं चयउ सव्वहा लच्छी।
पडिवण्णपालणे सुपुरिसाण जं होइ तं होउ।।''

महापुरिसो दप्पणु व्व सुद्धसहावो। सो ण कुप्पइ ण मंगुलं चिंतइ फरुसं च ण भासइ। सो परं ण हसइ, अप्पयं च ण थुणइ। सो सआ पिअं चिअ भासइ। सो परावयारं ण इच्छइ, परोवआरं च णिच्चं करेइ। सो दीणाणाहाणं अब्भुद्धरइ, सरणागयस्स हिअं करेइ, अवरद्धेसु वि खमइ। पडिवण्णपालणे सुयणो मरणेवि अण्णहा ण होइ। गुरुवसणपडिपेल्लिओ वि महापुरिसो णिअजीहं खंडिऊण मरइ परं अण्णं ण पत्थेइ। सुअणो चंदणतरु व्व णिअसरीरेण परहिअं करेइ। णमो एवंविहाणं महापुरिसाणं।

५) मम गामो

मम गामस्स णामो कोल्हाउरो त्थि। कोल्हाउरं पंचगंगाणई तीरे परिवसइ। कुंभी, कासारी, भोगावई, तुलसी तहा लुत्ता सरस्सई णईओ मिलिऊण पंचगंगा होइ। विसालं रेलयाणठाणअं वि अत्थि। गामे महालच्छीए पसिद्धं विसालं देऊलं अत्थि। सव्वे जणा महालच्छीए वंदणत्थं कोल्हाउरं आगच्छंति। मंदिराओ बहिं विसालं आवणं पि अत्थि। आवणे सागं, वत्थं, पत्तं तहा सुवण्णालंकारा मिलेंति। अलंकारे 'कोल्हापुरी साज' बहु पसिद्धा। गामस्स मज्झे एगो महासरो वि अत्थि। 'रंकाळा' ति तस्स णामं। सराओ बहिं उज्जाणं अत्थि। बाला बालिआओ अ उज्जाणे खेलिउं आगच्छंति। कोल्हाउरे संकरायरियाणं पसिद्धं करवीरपीढं पि अत्थि। संकरायरियाणं विसालो मढो त्थि णईसमीवे । कोल्हाउरे दिअंबर-जइणाणं जिणमंदिराणि संति तहा एगो मढो वि अत्थि। मम गामे पहाणरूवेण इक्खुसस्सं होइ। अओ कोल्हाउरस्स गुडो लोए पसिद्धा। 'मिसळ' वि बहु पसिद्धा। अओ सव्वत्थ 'कोल्हापुरी मिसळ' णामा फलआ संति। गामे बहवा उज्जाणा संति। अणेआ विज्जालआ-महाविज्जालएहिं सह सिवाई विज्जापीढं पि अत्थि। गामस्स समीवे बहवा जंतालआ संति। मम गामं बहु सुंदरं अत्थि।

६) जलस्स महत्तणं

जलं एव जीवणं। जलस्स बिइयं नाम 'जीवणं' एव। भारहदेसे जलस्स समस्सा अईव गहीरा अत्थि त्ति अम्हे सव्वे जाणामो। अम्हाणं मरहट्ठरज्जो महंतो, तहवि रज्जम्मि अज्जवि पाणियस्स अभावो दीसइ। सरीर-गिहसुद्धि-रंधणकज्जे णिच्चकम्मम्मि य जलस्स उवओओ अत्थि। परं जणा जलस्स महत्तणं ण जाणंति, जलं णासेंति। विण्णाणजाणमाणेहिं सोहणकज्जेहिं उग्घडिअं 'पुढवीतले जलस्स मत्ता अईव णीअं गच्छंती दीसइ' त्ति विहाणं सच्चं। तम्हा सव्वे जणा जलस्स रक्खणट्ठं पयत्तं करेज्जा। सव्वे जणा अम्हाणं भाउबहिणीओ संति, ता ताण कए जलसमस्साविसए चिंता करणीआ। पुणो अम्हारिसा इअरा जीवा वि जलं इच्छंति, तम्हा पओअणेण विणा जलस्स णासं ण करेयव्वो। तहा जलसंचयकरणत्थे विविहउवाआ जोइअव्वा। वासारत्ते आगासाओ विउलं जलं वरिसंति। तं जलं अणुऊल-ठाणे संठवियव्वा। जलं रुंधिअव्वं संठिअव्वं च। एएहिं उवाएहिं जलस्स मत्ता वड्ढइ। जइ पत्तेगजणो जलस्स मोल्लं जाणेइ तओ सोहणं होज्जा। सव्वजीवाण सुहस्स मूलं जलम्मि एव।

निबंधासाठी काही विषय –

१) गणेसूसवो	२) दीवुच्छवो	३) भारहदेसो	४) दूरदंसणं
५) णईओ	६) समायारपत्तं	७) मम पिओ णेया	८) मम पिओ पसू

प्राकृत साहित्य प्रकार

प्राकृत भाषेमध्ये अनेक विषयांवरील साहित्य रचले गेले. जसे - तत्त्वज्ञानविषयक साहित्य, शिलालेखीय साहित्य, शास्त्रीय महाकाव्ये, चरित काव्ये, मुक्तक काव्ये, सट्टक व नाटक साहित्य व कथा साहित्य. याच बरोबर पुराण, इतिहास, ज्योतिष, भूगोल, खगोल आदी विषयांवर प्राकृत भाषेमध्ये विपुल साहित्य दिसून येते. त्यापैकी आपण कथासाहित्य आणि त्यातील महत्त्वाचे चार कथाग्रंथ यांची माहिती घेणार आहोत.

१) प्राकृत कथा साहित्य

संपूर्ण जगामध्ये प्रत्येक देशाचे प्रत्येक भाषेमध्ये कथासाहित्य सापडते. या कथांचे उद्देश्य वेगवेगळे असतात. काही वेळा केवळ मनोरंजन हाच उद्देश असतो तर काही वेळा काही उपदेश देणे व तात्पर्य सांगणे हा उद्देश असतो. प्राकृत साहित्यामध्ये जे कथासाहित्य आहे त्याचा मूळ उद्देश कथांच्या द्वारे धर्मोपदेश आणि आत्मकल्याण करणे हाच आहे.

प्राकृत कथा साहित्यामध्ये कथांचे तीन मुख्य प्रकार सांगितले आहेत. ते म्हणजे अकथा, विकथा व कथा. जी कथा, एखादा अज्ञानी माणूस चुकीच्या समजुतीने सांगतो, स्पष्ट करतो, त्यामुळे या संसारात परिभ्रमण करण्याचे कारण ठरते, ती अकथा होय. ज्या कथेमुळे, समाज विकृत होतो समाजामध्ये वाईट गुण वाढीला लागतात, ती कथा विकथा होय. ज्या कथेमुळे समाजामध्ये तप, संयम, दान शील सारखे चांगले गुण वाढीस लागून समाजकल्याण साधले जाते, ती कथा किंवा सत्कथा होय.

कथांचे विश्लेषण विषयांच्या दृष्टीने अर्थकथा, कामकथा, धर्मकथा आणि मिश्रकथा असे ही केलेले आढळते. या कथांमध्ये अनुक्रमे पैशाअडक्याशी संबंधित, गृहस्थजीवन, धर्माचरण व हे सर्व विषय एकत्र असे चार प्रकारचे विचार येताना दिसतात. कथेतील पात्रानुसारसुद्धा कथांचे प्रकार ठरविले आहेत. म्हणजे दिव्य, मानुषी आणि दिव्यमानुषी. ज्या कथांमध्ये दिव्य किंवा दिव्य/देवलोकातीलच पात्रे असतात, ती कथा दिव्य कथा होय. ज्या कथेमध्ये दिव्यलोकातील तसेच मानवी पात्रे असतात, ती कथा दिव्यमानुषी. तर ज्या कथेमध्ये फक्त माणसेच असतात, ती कथा मानुषी होय.

याशिवाय कथांचे इतरही पाच प्रकार सांगितले आहेत. ते असे - सकलकथा, खंडकथा, उल्लापकथा, परिहासकथा व संकीर्णकथा. ज्यामध्ये शेवटी सर्व ईप्सित गोष्टी प्राप्त होतात, ती सकल कथा होय. खंडकथेचा आत्मा अगदी छोटा असतो आणि ती आपल्या जीवनातील एखाद्याच अनुभवावर आधारित असते. उल्लावकथा ही एक प्रकारे साहसकथा असून त्यामध्ये समुद्रयात्रा, विविध साहसकथा यांचा समावेश केलेला असतो तर परिहासकथा ही व्यंगात्मक असून जीवनातील प्रसंगावर मार्मिक टीका करणारी असते. संकीर्णकथा ही या चारही कथांचे मिश्रण असून, शेवटी धर्मकथेच्या स्वरूपात असते.

प्राकृत साहित्यामध्ये या सर्व प्रकारच्या कथा सापडतात, उदा. हरिभद्रसूरिविरचित - समराइच्चकहा, उद्योतनसूरिविरचित- कुवलयमालाकहा, विविध रामकथा इत्यादी. आपण या पुस्तकामध्ये तरंगलोला, कुवलयमालाकहा इ. कथांचे विषय व त्यांची हाताळणी पाहिली आहे.

---

२) कुवलयमालाकहा

कुवलयमालाकहा हा ग्रंथ उद्योतनसूरी यांनी लिहिला आहे. उद्योतनसूरी यांना दाक्षिण्यचिह्न अशी पदवी देखील होती. उद्योतनसूरींचा काळ इ.स. ७७८ मानला जातो. कुवलयमालाकहा ही एक कथा आहे. प्राकृत साहित्यामध्ये कथा हे माध्यम धर्मोपदेशासाठी वापरले जाते. या कथांचे स्वरूप प्राकृत साहित्यामध्ये कसे सांगितले आहे, ते आपण पाहिले आहे. कुवलयमालाकहा हे नाव नायिकेच्या नावावरून दिले आहे.

कथावस्तू – मध्य देशामध्ये विनीता नावाची नगरी असते. तिथे दृढवर्मा नावाचा राजा राज्य करत असतो. त्याची पट्टराणी प्रियंगुश्यामा असते. एकदा दृढवर्मा राजाचा सेनापती सुषेण मालवदेश जिंकून येतो. तेंव्हा मालवदेशाच्या पाच वर्षाच्या राजपुत्रालासुद्धा आणतो. दृढवर्माराजाने त्याला जवळ घेतल्यावर तो राजपुत्र रडू लागतो. त्या राजकुमाराचे पालनपोषण राजा दृढवर्मा करू लागतो. यथावकाश दृढवर्मा राजाला प्रियंगुश्यामा राणीपासून मुलगा होतो. त्याचे नाव कुवलयचन्द्र असे ठेवले जाते. कुमार मोठा झाल्यावर समुद्रकल्लोल नावाच्या घोड्यावर स्वार होतो. तेंव्हा तो घोडा कुवलयचंद्राला घेऊन जंगलाकडे पळून जातो. त्याचवेळेस एका अदृश्य शक्तीकडून प्रहार होऊन घोडा मरून पडतो व आकाशवाणी राजकुमाराला दक्षिण दिशेला जायला सांगते. दक्षिण दिशेला असलेल्या विंध्य पर्वताच्या जंगलात गेल्यावर कुवलयचन्द्राला एक साधू दिसतात त्यांच्या एका बाजूला सिंह बसलेला असतो. ते मुनी कुवलयचंद्राला आकाशवाणी विषयी माहिती देतात. तसेच घोड्याने पळवून नेण्याचे रहस्य सांगतात. मुनी म्हणतात की वत्सदेशामध्ये कौशांबी नगरीमध्ये पुरंदरदत्त नावाचा राजा व वासव नावाचा प्रधान आहे. त्याच उद्यानात धर्मानंद आचार्यदेखील आपल्या शिष्यांसहित आलेले असतात. महाराज पुरंदरदत्त मुनींना विरक्तीचे कारण विचारतो तेव्हा ते सांगतात की क्रोध, अभिमान, माया, लोभ, मोह हे पाच कषाय हेच संसार परिभ्रमणाचे प्रमुख कारण आहे. या कषायांमुळे परिभ्रमण करणाऱ्या चंडसोम, मानभट, मायादित्य, लोभदेव व मोहदत्त यांच्या अनेक जन्मांच्या कथा कुवलयमालाकथा या ग्रंथामध्ये सांगितल्या आहेत. हे पाचहीजण संयमाचे पालन करून मरण पावल्यानंतर सौधर्म नावाच्या स्वर्गात उत्पन्न होतात व एकमेकांना मोक्षासंदर्भात आठवण करून देण्याचे ठरवतात/निश्चय करतात.

यानंतर त्यांचा जन्म अनुक्रमे वणिक्पुत्र, राजपुत्र, सिंह, कुवलयमाला व कुवलयचन्द्र यांच्या रूपात होतो. कुवलयमाला ही दक्षिणापथातील विजया-नगरीतील विजयसेन राजाची कन्या असते. ती पुरुषांचा द्वेश करणारी असते. तिचा विवाह अयोध्यानगरीचा राजकुमार कुवलयचंद्राशी होण्याचे भाकित केलेले असते. या भाकिताप्रमाणेच सर्व गोष्टी होतात. तसेच एकमेकांना भेटल्यानंतर आत्मकल्याणाची आठवण करून देऊन प्रबोधित करतात.

कुवलयमालाकथा ही मुख्यत्वेकरून क्रोध, मान, माया इ. पाच कषायांचा परिणाम दाखविण्यासाठी लिहिली आहे. या कथेमध्ये चमत्कार, साहस, अद्भुतता इ. सर्व घटकांचा समावेश असल्यामुळे कथा रंजक झाली आहे. या रंजकतेबरोबरच कथा उपदेशप्रधानसुद्धा आहे. साहित्यशास्त्रीयदृष्ट्यासुद्धा ही कथा सुंदर दृष्टांत, अलंकार, काव्य यांनी नटलेली आहे.

३) लीलावती कहा

काव्यशास्त्रज्ञांच्या मतानुसार 'लीलावतीकहा' ही पद्य-कथा आहे. रुद्रटाने केलेल्या व्याख्येप्रमाणे या काव्यात महाकाव्याचे लक्षण दिसतात. महाकवी कुतूहल हा या महाकाव्याचा कवी आहे. आपल्या वंशाची ओळख करून देताना तो सांगतो की त्याच्या आजोबांचे नाव बहुलादित्य होते व वेदविद्येमध्ये पारंगत होते. ते इतके यज्ञ करीत होते की त्या धुरामुळे चंद्र देखील काळ्या रंगाचा झाला होता असे म्हटले जाते. याचप्रमाणे त्यांनी त्यांचे वडील भूषणभट्ट हे चारही वेदांचे महान पंडित होते असेही सांगितले. या पंडित-परंपरेतील कुटुंबात लीलावती-कथेचा लेखक कवी कोऊहल (कुतूहल/कौतूहल) याचा जन्म झाला होता. जरी त्याने स्वत:ला अज्ञानी, काव्यक्षेत्रात मतिमंद म्हटले असले तरी यामध्ये कवीचा विनय, निरहंकार व पूर्वकवींच्या विषयाची आदर भावना व्यक्त होते. प्रस्तुत काव्याची रचना कोठे व केव्हा झाली याचा स्पष्ट उल्लेख सापडत नाही. काही इतर पुराव्यांवरून कोऊहलाचा काळ इ. स. ७५० से ८४० मध्ये सिद्ध होतो.

प्रस्तुत कथेत प्रतिष्ठान (वर्तमान पैठण) चा राजा सातवाहन (अथवा शालिवाहन) व सिंहलद्वीप (वर्तमान श्रीलंका) ची राजकुमारी लीलावती यांच्या प्रेमकथेचे रसभरित वर्णन आलेले आहे. यामध्ये प्रासंगिक उपकथांच्या धागेदोऱ्यांची वीण अत्यंत आकर्षक आहे. एक प्रसंग असा आहे की, राजर्षी विपुलाशयाला रंभा नावाच्या अप्सरेपासून झालेल्या मुलीचे नाव कुवलयावली होते. संधी साधून तिने गंधर्वकुमार चित्रांगदाबरोबर प्रेम-विवाह करतो. यामुळे विपुलाशय खूप क्रोधित झाला

व त्याने चित्रांगदाला शाप दिला. त्यामुळे चित्रांगद भीषणासन नावाचा राक्षस झाला. कुवलयावली दु:खाने आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाली. परंतु रंभेने तिला धीर दिला व नलकूबर यक्षाच्या आश्रयाला ठेवले.

नलकूबराचे लग्न वसंतश्री नावाच्या विद्याधरीशी झाले होते. त्यांच्या मुलीचे नाव महानुमती होते. महानुमती व कुवलयावली या दोघींमध्ये घनिष्ठ मैत्री झाली. एकदा त्या दोघी विमानात बसून मलयपर्वतावर गेल्या. तेथे महानुमतीचे माधवानल नावाच्या सिद्धकुमारावर प्रेम जडले. तेथून परत आल्यावर ती त्याच्या विरहाने दु:खी राहू लागली. नंतर त्या दोन्ही मैत्रिणी गोदावरीच्या तटावर भवानीची पूजा करीत राहू लागल्या.

लीलावती-कथेत सिंहलाची राजकन्या लीलावती हिचा जन्म शारदश्री विद्याधरीपासून झाला होता. एके दिवशी लीलावती प्रतिष्ठानचा राजा (सातवाहन-हाल)चे चित्र बघून त्याच्या प्रेमात पडली. ती आपल्या आई-वडिलांची आज्ञा घेवून त्याच्या शोधार्थ बाहेर पडली. रस्त्यात गोदावरीच्या तटावर महानुमतीशी तिची भेट झाली. महानुमतीने तेथेच तिला कुवलयावलीचाही परिचय करून दिला. आता तिन्ही विरहिणी धर्माराधना करीत काळ घालवू लागल्या.

प्रतिष्ठानचा राजा सातवाहन प्रतापी सम्राट होता. त्याने सिंहलद्वीपावर आक्रमण करण्याचे ठरविले. तेव्हा त्याच्या सेनापतीने त्याला युद्ध न करण्याचा सल्ला दिला. राजाने सेनापतीला सिंहलराजाच्या जवळ दूत म्हणून पाठविले. दुर्दैवाने त्याची नाव फुटल्यामुळे तो गोदावरीच्या काठावरच थांबला. सेनापतीला समजले की लीलावती आपल्या मैत्रिणींबरोबर तेथे राहत आहे. त्याने परत जाऊन सातवाहनाला सूचना दिली. सातवाहन राजा सैनिकांबरोबर तेथे पोहोचला व लीलावतीला मागणी घातली. लीलावती म्हणाली, महानुमतीचा प्रियकर माधवानल जो पर्यंत तिला मिळत नाही तो पर्यंत ती लग्न करणार नाही.

लीलावतीची प्रतिज्ञा ऐकून राजा सातवाहन पाताळलोकात गेला व तेथून माधवानलाची सुटका करून त्याला घेऊन आला. त्यानंतर त्याने भीषणानल राक्षसावर आक्रमण केले. युद्धात झालेल्या जखमांमुळे तो परत राजकुमार झाला.

याप्रमाणे कर्मधर्मसंयोगाने नलकूबर, विद्याधर हंस व सिंहलद्वीपाचा राजा सर्वच एकत्र आले. त्यांनी आपल्या मुलींची लग्ने त्यांच्या इच्छेप्रमाणे समोर उपस्थित वरांशी लावून दिली. त्या प्रसंगी विद्याधर, किन्नर, सिद्ध, यक्ष, राक्षस व मनुष्य यांनी आनंद व्यक्त करीत वर-वधूंना विविध सिद्धी प्रदान करून आशीर्वाद दिला.

लीलावतीकथा एकसंधपणे लिहिलेली आहे. तिचे भाग पाडलेले नाहीत. संपूर्ण कथा विविध अलंकार, छंद यांनी नटलेली असून विविध रस, निसर्गसौंदर्य, पर्वत, नद्या, वन-उपवन, सूर्योदय-सूर्यास्त यासारखी वर्णनेही आली आहेत.

४) समराइच्चकहा

समराइच्चकथेचे प्राकृत साहित्यात महत्त्वपूर्ण स्थान आहे. ही धर्मकथा आहे. या कथेचे लेखक आचार्य हरिभद्रसूरी हे आहेत. ते विद्याधरगच्छातील साधू होते. गच्छपती आचार्यांचे नाव जिनभट्ट, दीक्षागुरूंचे नाव जिनदत्त व पालनपोषण करणाऱ्या मातेचे नाव साध्वी याकिनी महत्तरा असे होते. त्यांचा जन्म राजस्थानातील चित्तोडनगरमध्ये झाला होता. हरिभद्रसूरी हे जन्माने ब्राह्मण होते. त्यांच्या विशेष पांडित्यामुळे तेथील राजा जितारी याचे ते राजपुरोहित होते. दीक्षा घेतल्यानंतर जैन साधू म्हणून त्यांचे आयुष्य राजपुताना व गुजरात प्रांतात विशेषकरून व्यतीत झाले.

आचार्य हरिभद्रांच्या जीवनात बदल घडवणारी घटना त्यांच्या धर्म परिवर्तनाची आहे. त्यांची अशी प्रतिज्ञा होती की 'ज्या विद्वानाचे वचन मी समजू शकणार नाही त्याचे शिष्यत्व मी पत्करेन.' एके दिवशी राजाचा मदोन्मत्त हत्ती त्याला बांधलेला खांब उचलून नगरात पळू लागला. हत्तीने अनेक लोकांना चिरडून टाकले. हरिभद्र जीव वाचविण्यासाठी एका उपाश्रय (साधू साध्वी विहार करतात ते स्थान) मध्ये आले. तेथे याकिनी महत्तरा नावाच्या साध्वीला खालील गाथेचे वाचन करताना ऐकले -

चक्कीदुगं हरिपणगं पणगं चक्कीण केसवो चक्की।
केसव चक्की केसव दु चक्की केसव चक्की य।।

या गाथेचा अर्थ त्यांना समजला नाही म्हणून त्यांनी साध्वीला त्याचा अर्थ विचारला. साध्वीने त्यांना आचार्य जिनदत्ताजवळ पाठविले. आचार्यांनी स्पष्ट केलेले अर्थ ऐकून त्यांनी तेथेच त्याक्षणी दीक्षा घेतली. नंतर त्यांची विद्वत्ता व सदाचरण बघून आचार्यांनी हरिभद्रांना आपले पट्टशिष्य केले. हरिभद्रसूरींनी त्यांच्या धर्मपरिवर्तनास कारणीभूत साध्वी याकिनी महत्तरा यांना आपली धर्ममाता मानले. ते स्वतःला याकिनीसूनु असे म्हणवीत असत. आचार्य हरिभद्रांचा काळ सामान्यत: इ.स. ८५७ मानला जातो.

आचार्य हरिभद्रसूरी जैन साहित्यातील अत्यंत प्रज्ञावान व विचारवंत लेखक आहेत. धर्म, दर्शन, न्याय, कथासाहित्य व योगसाधना इत्यादी विषयी अनेक विषयांवर गंभीर व पांडित्यपूर्ण रचना उपलब्ध आहे. 'अनेकांतपताका' सारखा कठीण न्यायग्रंथ लिहिणारे हरिभद्र समराइच्चकहा व धूर्ताख्यानासारखे सुरस मनोरंजक कथाप्रधान ग्रंथांची रचना करतात ही आश्चर्याची गोष्ट आहे. एकीकडे हृदयाची सरलता व बुद्धीची प्रौढता दिसून येते. आचार्य हरिभद्रांनी एकूण १४४४ ग्रंथ लिहिले असे मानले जाते.

'समराइच्चकहा' या ग्रंथाचा मुख्य विषय जन्मोजन्मींच्या कर्मांचा परिणाम आहे. समरादित्य उज्जैनीचा राजकुमार होता. पूर्वजन्मात समरादित्याचे नाव गुणसेन होते व त्याच्या प्रतिस्पर्धी नायकाचे नाव अग्निशर्मा होते. जंबुद्वीपावर असणाऱ्या विदेह देशात क्षितिप्रतिष्ठित नावाचे नगर होते. तेथे पूर्णचंद्र नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या मुख्य राणीचे नाव कुमुदिनीदेवी असे होते. या दांपत्याला गुणसेन नावाचा मुलगा झाला. या राजाच्या पुरोहिताचे नाव यज्ञदत्त होते. यज्ञदत्ताला अग्निशर्मा नावाचा मुलगा झाला. तो कुरूप होता. कुतूहलाने कुमार गुणसेन मुलांच्या घोळक्याबरोबर अग्निशर्माला गाढवावर बसवून, त्याच्या डोक्यावर तुटक्या सुपाचे छत्र ठेवून, ढोल, मृदंग, बासरी इत्यादी वाद्य वाजवित नगराच्या रस्त्यांवर मिरवित असे. राजकुमाराच्या या वागण्यामुळे अग्निशर्मा खूप दुःखी होई. दररोज त्याला अपमान सहन करावा लागत असे. म्हणून तो अशा आयुष्याला कंटाळला होता. त्यामुळे अग्निशर्मा गुणसेनाचा अधिकाधिक द्वेष करू लागला व कौंडिन्य नावाच्या तापस कुलपतीच्या जवळ जाऊन अग्निशर्म्याने तापस-दीक्षा घेतली. परंतु दीक्षा घेऊनही अग्निशर्मा सतत गुणसेनाशी असणारे वैरच चिंतित असे. त्यामुळे या दोघांचे वैर नऊ जन्मे सुरू राहिले. म्हणून राजकुमार गुणसेन व अग्निशर्मा यांचे नऊ जन्म या कथेत वर्णिले आहेत.

नायक शुभकर्मांच्या फळामुळे शाश्वत सुख प्राप्त करतो व प्रतिनायक किंवा खलनायक हा त्याच्यामधील शत्रुत्वामुळे अनंत संसारात भ्रमण करतो. या कथेत गुणसेनाचे व्यक्तित्व सद्गुणी व त्या उलट अग्निशर्माचे व्यक्तित्व वाईट भावांच्या अभिव्यक्तीचे आहे. गुणसेनाचे जीवन मोक्षमार्गाकडे जाणारे व अग्निशर्माचे जीवन अधोगतीला जाणारे होते.

५) वसुदेवहिंडी

भारतीय साहित्यातच नव्हे तर विश्वकथासाहित्यातही वसुदेवहिंडीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. वसुदेवहिंडीमध्ये संघदासगणींनी प्राकृत भाषेमध्ये वसुदेवाच्या भ्रमणाचा वृत्तांत लिहिला आहे. हे वासुदेव कृष्णाचे पिता होते म्हणून या कथाकृतीला 'वसुदेव-चरित' असेही म्हणतात. 'वसुदेवहिंडी' हा ग्रंथ इ.स.च्या ६ व्या शतकात किंवा तत्पूर्वी लिहिला गेला असावा असे मानले जाते. या ग्रंथात मुख्यत्वाने हरिवंशाची महती सांगितली आहे व त्याबरोबर कौरव पांडवांच्या कथा देखील गुंफल्या आहेत.

हा ग्रंथ गद्य-पद्य मिश्रित आहे. ग्रंथाची भाषा प्राचीन महाराष्ट्री प्राकृत आहे. भाषा, साहित्य, इतिहास इत्यादी विविध दृष्टिंनी या ग्रंथाचे महत्त्व आहे. या ग्रंथाचे प्रथम आणि द्वितीय असे दोन खंड आहेत. पहिल्या खंडात २९ लंबक (अध्याय) असून त्यामध्ये अकरा हजार श्लोकप्रमाणात विस्तार आहे. दुसऱ्या खंडात ७१ लंबक आणि सतरा हजार श्लोकप्रमाणात विस्तार आहे. संपूर्ण ग्रंथात १०० लंबक आहेत. प्रथम खंडाचे रचनाकार संघदासगणी व दुसऱ्या खंडाचे रचनाकार धर्मदासगणी आहेत.

वसुदेवहिंडीत कथानकाचे सहा भाग केले आहेत. कथोत्पत्ती प्रकरणानंतर व पीठिका या भागामध्ये ५० पृष्ठांचे धम्मिल्लहिंडी नावाचे एक स्वतंत्र व महत्त्वपूर्ण प्रकरण आहे. या धम्मिल्लहिंडी प्रकरणात धम्मिल्ल नावाच्या सार्थवाहपुत्राची कथा आलेली आहे. त्याने देश विदेशात भ्रमण करून बरेच विवाह केले. कुरंगपुरामध्ये जितशत्रू राजा आपली पत्नी धारिणी हिच्या बरोबर राहत होता आणि राज्य करीत होता. या नगरात सुरेंद्रदत्त नावाचा अत्यंत श्रीमंत सार्थवाह सुखाने राहत होता. त्याच्या पत्नीचे नाव सुभद्रा होते. गर्भावस्थेत तिला धर्माचरणाविषयी डोहाळे लागले. म्हणून मुलाचे नामकरण धम्मिल्ल असे केले. या 'धम्मिल्लहिंडी' नावाच्या या स्वतंत्र कथानकात धम्मिल्ल हा नायक प्रथम धार्मिक वृत्तीचा असतो. मित्रांकडून त्याला रसिक बनविण्याचा खटाटोपात तो वसंततिलका नावाच्या गणिकेच्या प्रेमात पडून तिच्याच घरी राहू लागतो. तो निर्धन झाल्यावर गणिकेची माता धम्मिल्लाला हाकलण्याचा प्रयत्न करते. धम्मिल्ल किती निरुपयोगी आहे, हे विविध उदाहरणांनी पटवते असे हे कथानक आहे.

शीलमती, धनश्री, विमलसेना, ग्रामीण गाडीवान, वसुदत्ताख्यान, रिपुदमन, नरपती, चारुदत्त इत्यादी आख्यानके, या खूपच सुंदर लोककथा आहेत. या कथांमध्ये लोककथांची सर्व लक्षणे व गुण आहेत. शेवटी धम्मिल्लाच्या सुनंदभव आणि सरहभव हे आख्यानकांचाही समावेश आहे. वसुदेवहिंडी हे प्राकृतमधील अनेक चरित्र, कथा इ.चा स्रोत आहे. यामध्ये तत्कालीन समाज, संस्कृती, चालीरीती इ. विषयी माहिती मिळते. मनोरंजनाबरोबरच कुतूहल आणि ज्ञानवर्धनाचाही विचार केला आहे. असे असूनही धर्मोपदेशाचीही गुंफण सुंदर पद्धतीने केलेली दिसते.

परिशिष्ट ५


काही नित्योपयोगी व आवश्यक प्राकृत क्रियापदे

अडवितो – रुंधइ/रोडइ/रोहइ	अतिक्रमण करतो – अइक्कमइ	अनुकरण करतो – अणुकरइ, अणुकरेइ
अनुग्रह करतो – अणुग्गहइ	अपमान करतो – अवगणइ	आक्रमण करतो – अक्कमइ
आक्रोश करतो – अक्कोसइ	आचमन करतो (हात धुतो)– आचमइ	आटोक्यात ठेवतो, दमन करतो – दमइ
आठवतो – सुमरेइ	आडवे पडतो/झोपतो – लुढइ	आणतो – आणेइ
आदर देतो – आयरेइ	आदेश देतो – आइसइ	आनंदित करतो – तिप्पइ
आनंदित होतो – हरिसइ	(एखाद्या कामाचा) आरंभ करतो–आरंभइ	आश्रय घेतो – अवलंबेइ
आवडतो – रुच्चइ	इच्छा करतो – इच्छइ, वंछइ	उठतो – उट्ठइ, उट्ठेइ
उडतो – उड्डेइ	उडी मारतो – कुद्दइ	उत्पन्न होतो – उप्पण्णइ
उद्धार करतो – उद्धरइ, उद्धरेइ	उपदेश देतो – उवइसइ	उमलतो – विअसइ
उलटे लोंबकळतो – ओणल्लइ	ऐकतो – सुणइ	ओढतो – करिसइ, कड्ढइ
ओलांडतो – लंघइ, उल्लंघइ	करतो – करइ, कुणइ	करू शकतो – सक्कइ
कापतो – कप्पइ, लुअइ, छिंदइ	कीव करतो – अणुकंपइ	कुटतो – कुट्टइ
केशरचना करतो–केसाणं विवरइ	कोमेजतो – पमिलायइ	क्षमा करतो – खमइ
खणतो – खणइ, खणेइ	खाजवतो – कंडूअइ	खातो – खाअइ, भुंजइ, अणुगिलइ
खिजवतो – खिज्जइ	खेचतो – लुंचइ, कड्ढइ	खेळतो – खेलइ, कीलइ, लीलायइ
खोकतो – खासइ	गर्जना करतो – गज्जइ	गातो – गायइ
गाळतो – गालइ	गिळतो – गिलइ	गुंफतो – गुंथइ, गुंफेइ
गोळा करतो – चिणइ	घाबरतो – वज्जइ, बीहइ	घुसळतो – घुसलइ
घेतो – गिण्हइ, घेत्तइ, लेइ	घोषणा करतो – घोसइ	चमकतो – विलसइ
चाखतो – चक्खइ	चाटतो – लिहइ, चट्टइ	चालतो – चलइ
चित्र काढतो – चित्तेइ	चुकतो – पमाइ	चुंबन घेतो – चुंबइ
चोरतो – चोरेइ, मुसइ	छापला जातो – ओमीलइ	जन्म देतो – जणेइ
जन्माला येतो – जायइ	जप करतो – जवइ	जळतो – जलइ, दहइ, डहइ
जागा होतो – जग्गइ	जाणतो – जाणइ	जातो – गच्छइ
जिंकतो – जयइ, जिणइ, जीयइ	जिवंत असतो – जीवइ	जीर्ण होतो – जरइ
झाकतो – पिंधई, ढक्कइ	झिरपतो – झरइ	झोपतो – सयइ, लोट्टइ, सुवइ
टाकतो – उक्खिवइ	टीका करतो – अक्खिवइ	ठेवतो – ठवइ / ठावेइ
तडफडतो – तडप्फडइ	तयार होतो – सज्जइ	तरून जातो – तरइ
तर्क करतो – तक्कइ	तुटतो – तुट्टइ, भंजइ	तुलना करतो – तोलइ
तोडतो – विद्धइ, तुट्टेइ	त्याग करतो – चयइ, पजहइ	त्रासतो – तवइ

त्रास देतो – पीडइ	थकून जातो – थक्कइ	थांबतो – ठाइ, चिट्ठइ, थंभइ
थुंकतो – थुक्कइ	दळतो – पीसइ	दाखवतो – दरिसइ, दंसेइ
दाबतो – चंपइ	दु:ख करतो – जूरइ	दूध काढतो – दुहइ
दूषण देतो – दूसइ	देतो – देइ	धरतो – धारइ, धरइ
धारण करतो – परिहइ, परिहाइ	धावतो – धावइ, पलायइ	धिक्कार करतो – धिक्कारइ
धुतो–धावइ,धोवइ,धुत्तेइ,सम्मज्जेइ	ध्यान करतो – झाइ	नमस्कार करतो – णमइ, वंदइ, पणमेइ
नाच करतो, नाचतो – णच्चइ	नाश होतो – णस्सइ	निंदा करतो– जुउच्छइ, दुगुच्छइ, णिंदइ
निमंत्रण देतो – णिमंतेइ	निर्माण करतो – णिम्मइ	निवडतो – वरइ
निवेदन करतो – विण्णवइ	निषेध करतो / अडवितो – णिसेहइ	पडतो – पडइ
परत फिरतो – विणिवट्टइ	परत येतो – पडिवच्चइ	पराभूत होतो – पराजयइ
परित्याग करतो – उम्मुंचइ	पवित्र करतो – पुणइ	पसरतो – पत्थरइ
पळून जातो – पलाएइ	पाठवतो – पेसइ	पार करतो – पारइ
पालन करतो – पालइ	पाहतो – पेच्छइ, पासइ	पितो – पिवइ, पिज्जइ
पिंजतो – पिंजइ	पूजा करतो – अच्चइ	पूर्ण होतो – संपज्जइ
(बी) पेरतो/रोवतो – रुय्यइ	पोषण करतो – पोसइ	पोहोचतो – पहुच्चइ
प्रकट होतो – फुडइ	प्रकट करतो – पागडइ	प्रतिबोध देतो – पडिबोहइ
प्रयत्न करतो – उज्जमइ	प्रवेश करतो – पविसइ	प्रशंसा करतो – पसंसइ
प्रहार करतो – पहरइ	प्रार्थना करतो – पत्थइ	फसवतो – पयारेइ, वंचइ
फाटतो – फट्टइ	फाडतो – फाडइ	फिरतो – अडइ, भमइ, हिंडइ
फुलतो – पुप्फइ, फुल्लइ	फेकतो – खिवइ, विउसइ	बसतो – अच्छइ, चिट्ठइ
बहरतो, फळतो – फलइ	बाजूला होतो – णीसरइ	बांधतो – बंधइ
बाहेर काढतो – विरेअइ	बुडतो – बुड्डइ	बोलतो – कहइ, भणइ, बोल्लइ, जंपइ, रवइ, रटइ, साहइ
बोलावतो – सद्देइ, हुक्कारइ	भांडण करतो – कलहइ	भिजतो – तिम्मइ
भुंकतो – बुक्कइ	मनोरंजन करतो – रंजइ	मागतो – मग्गइ
मातीचा लेप देतो – खरडइ	मारतो – ताडइ, हणइ, घायइ	मार्गदर्शन करतो – ओगाहइ
मिटतो – णिमइ	मिळवण्याची इच्छा करतो – लंभइ	मूर्च्छित होतो – मुच्छइ
मोजतो – गणइ	मोडतो – मोडइ	मृत्यू पावतो – मरइ
युद्ध करतो – जुज्झइ	येतो – आगच्छइ	रडतो – रोवइ, रुवइ
रमतो – रमइ	राहतो – वसइ	रुसतो – कुज्झइ, रूसइ
लपतो – लुक्कइ	लपवतो – गोवेइ	लाजतो – लज्जइ
लाजवतो – लज्जावइ	लांछन देतो / कलंक लावतो – लंछइ	लिंपतो – लिप्पइ, लिंपइ
लिहितो – लिहइ	लुटतो – लुट्टइ, लुंटइ	लोप करतो – लोवेइ

लोभ करतो/हाव करतो –लुब्भइ	वर्णन करतो – वण्णइ	वर्षाव करतो – वरिसइ
वाचतो – पढइ	वाढतो – बड्ढइ	वाद घालतो – वायइ, वाएइ
वास घेतो – जिंघइ	वाहून नेतो – वहइ, वाहइ	वाळतो – सूसइ
विकत घेतो – कीणइ	विकतो – विक्कीणइ	विकसित होतो – उल्लसइ
विचार करतो – चिंतइ, विअप्पइ	विचारतो – पुच्छइ	विरोध करतो – बाहइ
विवाह करतो – विवहइ, परिणेइ	विसकटतो – विक्खरइ	विसरतो – पम्हरइ, भुल्लइ
विहार करतो – विहरइ	वेगळा होतो – विरमइ	वेगळे करतो – विओजइ
व्यवहार करतो – ववहरइ	शंका घेतो – आसंकइ	शाप देतो – सवइ
शिकवतो – सिक्खइ	शिंकतो – छिक्कइ	शिजवतो – पचइ, रंधइ
शिंपडतो – सिंचइ	शिवतो – सिव्वइ	शोधतो – गवेसइ
शोभतो – विलसइ, सोहइ	श्रद्धा ठेवतो – सद्दहइ	समर्थ असतो – सक्कइ
सज्ज होतो – सज्जइ	सटकतो, घसरतो – फेल्लुसइ	समजतो – जाणइ , बुज्झइ, बोहइ
संपन्न होतो – संपज्जइ	सरकतो – सरइ	साठा करतो – चिणइ, संचयइ
सुगंधित करतो – सुरहइ	सुटतो – छुट्टइ	सेवा करतो – अणुचरइ, सेवइ, पडिचरइ
सोडतो – मुंचइ, मोत्तइ	स्तुती करतो – थुणइ	स्नान करतो – ण्हाइ
स्पर्श करतो – फासइ	स्फुरतो – फुरइ	स्मरण करतो – सुमरेइ
स्वच्छ करतो – पमज्जइ	स्वीकारतो – अंगीकरइ	हसतो – हसेइ
हरतो – हरइ	हिंसा करतो – हिंसइ	होतो – हवइ, होइ

https://www.ncertbooks.guru/



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

महाराष्ट्री प्राकृत, इयत्ता बारावी

किंमत:- ₹ १०२.००

https://www.ncertbooks.guru/